


# माणूस

१५ ऑगष्ट १९६५ : किंमत ३० पैसे




साखर कारखान्यास यंत्रसामग्री, बॉयलर्सची जोडणी, उभारणी व विद्युतीकरणाची कामे स्वीकारतो, उत्तम प्रकारे पार पाडतो. लोखंडी खिडक्या, दारे, सरकती दारे व 'विश्वास' रोल अप शटर्स व रोल अप ग्रिल्स यांचे उत्पादक.

# नायक्रोम मेटल वर्क्स

४६ वेलस्ली रोड, संगम, पुणे १

फोन : २४२८७ तार : नायक्रोम, पुणे.




**वर्ष पाचवे : अंक सहावा : १५ ऑगस्ट १९६५**

★

**संपादक : श्री. ग. माजगावकर**

★

**पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९**

नाझी भस्मासुराचा अंतकाल जवळ येत चालला. जगाचा श्वास रोधून धरणाऱ्या ज्या विलक्षण गतीने अवघा युरोपखंड नाझींनी आपल्या पायदळी तुडवला, ती गती आता मंदावली, थांबली, जवळजवळ जमीनदोस्त झाली. रशियन भूमीवर नाझी सैनिकांच्या रक्ताचे सडे पडू लागले आणि नाझींच्या अंतिम पराभवनाटयाची नांदी गर्जू लागली. चालून येणारा नाझी सैनिक रशियन सैनिकाच्या गोळीला बळी पडून खाली कोसळत असल्याचे दृश्य रशियन आघाडीसोबत असलेल्या एका छायाचित्रकाराने टिपले आणि तेच 'माणूस'च्या या अंकाच्या मुखपृष्ठावर देऊन नाझी भस्मासुराच्या अस्तकालाच्या कथेची सुरवात आत केली आहे.

योगायोगाने ही अस्तकालकथा आणि १५ ऑगस्ट अंक या दोन्ही वेळा जमून आल्या. सेनापती बापट म्हणत असतात–(विनोदाने की खऱ्या अर्थाने, कोणास ठाऊक)–'हिटलरमुळेच हिंदुस्थानला स्वातंत्र्य लाभले.' हिटलर न होता तर महायुद्ध न होते, महायुद्धात इंग्लंड खिळखिळे न होते, तर हिंदुस्थानातून त्यांनी काढता पाय कशाला घेतला असता ? खरे आहे. दोन हजार वर्षांपूर्वी रोमन साम्राज्यात बजबजपुरी माजल्यामुळे ज्युलियस सीझरला ब्रिटानिका बेट सोडून रोमकडे धाव घ्यावी लागली नसती, तर इंग्लंड तरी स्वतंत्र कसे होऊ शकत होते ? शत्रू अडचणीत सापडला तरच बहुधा स्वातंत्र्ययुद्धे यशस्वी होतात, असे इतिहासात अनेकवेळा दिसून येते. म्हणून काही स्वातंत्र्ययुद्धाची व त्यात लढलेल्या सर्व पक्षोपपक्षांच्या, मतमतांतरांच्या स्वातंत्र्यवीरांची योग्यता कमी होत नसते. भारतीय स्वातंत्र्ययुद्धात लढलेल्या अशा सर्व वीरांना प्रणाम—

**– संपादक.**

★ ★ ★

**किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## भगवान टिळक

मुसळधार पाऊस पडत असतानाही दिल्लीचे महापौर श्री. नुरुद्दिन अहमद, टिळक पुतळ्याला दिल्लीच्या नागरिकांतर्फे पुष्पमाला अर्पण करण्यासाठी यंदा दि. १ ऑगस्टला सकाळी आले होते. या कार्यक्रमासाठी येत असताना वाटेतील पाण्यामुळे त्यांची मोटार 'फेल' झाली होती, तरी ते येऊन पोहचले होते, ही नमूद करण्याजोगी आनंदाची घटना आहे. अशा ऐन अडचणीच्या प्रसंगी राजधानीतील रिक्षावालेही प्रवाशांना कसे नाडतात, याचा कटु अनुभवही त्यांना लाभल्याचे कळले. बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रतिवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या या कार्यक्रमाला बहुधा महापौर उपस्थित असतातच. यंदा योगायोग चांगला होता त्यामुळे महाराष्ट्र मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांचीही उपस्थिती या प्रसंगी लाभली होती. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. प्र. व. गजेंद्रगडकर, योजना आयोगचे नवे सदस्य श्री. स. गो. बर्वे आदि प्रमुख मराठी मंडळीही उपस्थित होतीच. [ संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण याच शुभमुहूर्तावर कारगिल येथे ज्या जवानांनी अतुलनीय साहस व कर्तबगारी प्रकट करून भारतीय सेनेचे नाव उज्ज्वल केलेले आहे, त्यांची पाठ थोपटून शाबासकी देत होते असे कळले ]. राजधानीतील काही दैनिकांनी यंदा टिळक पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करण्याच्या कार्यक्रमाचे वृत्त देताना मुद्दाम उल्लेख केला आहे, की तेथे जमलेल्या मंडळींत महापौर श्री. नुरुद्दिन अहमद हे एकटेच अ-मराठी भाषी होते ! वास्तविक उत्तर भारतात 'भगवान तिलक' या नावानेच लो. टिळक यांचा नेहमी उल्लेख केला जातो. ही भक्तिभावना ध्यानी घेऊन जर पद्धतशीर प्रयत्न होईल, तर पुढील वर्षापासून 'अमके तमके एकटेच अ-मराठी भाषी' उपस्थित होते, असे म्हणण्याची पाळी येणार नाही, असा विश्वास वाटत असल्यानेच यंदाच्या या कार्यक्रमाचा सविस्तर उल्लेख केला आहे. [ असा विश्वास वाटण्याचे कारण म्हणजे येथील वृत्तपत्रांत प्रसिद्ध न झालेली एक घटना. दिल्लीच्या महापौरांच्या उपस्थितीत बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फेचा कार्यक्रम चालू असताना एक पंजाबी तरुण मोठा हार घेऊन बाजूला उभा होता. मुख्य कार्यक्रम संपल्यानंतर थोड्याच वेळाने भारतीय जनसंघाचे प्रा. बलराज मधोक आपल्या निवडक अनुयायांसह पावसात तेथे येऊन पोहोचले. पूर्वीपासून उभा असलेला तरुण त्यांच्यात मिसळून गेला. सर्वांनी मिळून मोठ्या भक्तिभावे पुष्पमाला अर्पणविधी पार पाडला. या मंडळींना जेव्हा कळले, की तत्पूर्वी थोडा वेळ आधीच मुख्य कार्यक्रम पार पडला आहे, तेव्हा त्या सर्वांनी बोलून दाखविले, की पुढील वर्षापासून एकच आणि भव्य प्रमाणावर हा कार्यक्रम झाला पाहिजे. लोकमान्यांना 'भगवान' मानणाऱ्यांचा हा संकल्प असल्यानेच आशा वाढीस लागलेली आहे. ] वास्तविक भारताच्या

राजधानीत प्रतिवर्षी याच कार्यक्रमाला जोडून टिळक स्मारक व्याख्याने (Tilak Memorial Lectures) घडवून आणून चांगली प्रथा पाडण्यास प्रत्यवाय नसावा, असा विचारही यानिमित्ते मनात आल्यावाचून राहात नाही.

## □ चीनची पाच बोटे

भारताच्या राजधानीत या सुमारासच नेपाळ व भूतानमधून ज्या वार्ता येऊन थडकलेल्या आहेत, त्यांची नीट छाननी केली असता अशी लक्षणे दिसू लागली आहेत, की कपटी चीन आपले ' मायाजाल ' फार कौशल्याने भारताच्या या सीमा-भागांत पसरवीत आहे. भूतानचे नरेशांवर जो निघृण हल्ला करण्याचा असफल प्रयत्न नुकताच उघडकीस आला आहे, त्यावरून येथे अशी साधार शंका प्रकट होऊ लागली आहे, की ' चीनमध्ये प्रशिक्षण घेऊन परतलेल्या भूतानी युवक पुढाऱ्यांचाच हात या दुष्ट कटामागे असावा.' लाल चीनचे सूत्रधार ' माओ ' यांच्या तत्त्वज्ञानानुसार ' भूतान, नेफा, सिक्कीम, लडाख व नेपाळ ' ही चीनची पाच बोटेच आहेत ! तेव्हा या बोटांवर कबजा प्रस्थापित करण्यासाठी चीन काहीही करू शकेल, असा अभि-प्राय व्यक्त होत आहे.

भूतानचे पहिले पंतप्रधान श्री. जिगमी दोरजी यांची हत्यामुद्धा राजकीय स्वरू-पाचीच होती, याचे स्मरण यावेळी झाल्याविना राहत नाही. हे गृहस्थ चीनप्रेमी वा चीनचे समर्थक बनू पाहण्यास सिद्ध झालेले होते, तरी अगदीच चिनी पावलावर पाऊल टाकून चालण्यास सिद्ध नव्हते आणि बहुधा यांमुळेच शेवटी त्यांचा ' काटा ' काढण्याचे कार्य बिनबोभाट पार पाडण्यात आलेले असावे, असा संशय दृढ होऊ लागतो. गेल्या काही महिन्यांपासून जे ४–५ प्रमुख भूतानी ' लष्करी ' अधिकारी भूतानमधून परागंदा होऊन नेपाळमध्ये प्रश्रय (Asylum) घेऊन ठाण मांडून बसलेले आहेत, त्यांना नेपाळस्थित (काठमांडूस्थित) चिनी दूतावासाकडून वेळो-वेळी बराच सल्ला मिळत असतो, अशी वार्ताही येथे येऊन थडकलेली आहे. भूतान सरकारचे प्रतिनिधी बनून आजपर्यंत भारत सरकारच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील भूतानचे दौत्यसंबंध ( Diplomatic relations ) सांभाळीत असे. परंतु चीनने याकडे पूर्वीपासून मुद्दामच दुर्लक्ष केलेले आहे आणि चीनचा कित्ता गिरविण्यास उत्सुक असलेले पाकिस्तानही त्याच मार्गाने पावले टाकण्यास प्रारंभ करणार असे दिसू लागले आहे. भारताच्या विदेशमंत्रालयात सध्या याविषयी विशेष चिंता व्यक्त होत असल्याचे कळले. कारण भूतान नरेशांवरील निघृण हल्ल्याची वार्ता कळल्यानंतर पाकिस्तानचे अध्यक्ष पठाण आयूबखान यांनी भूतानला परभारे ' संवेदना संदेश ' पाठवून भारताला अगदी सहजपणे बाजूस सारलेले आहे ! भूतानमध्ये जी दुर्घटना घडली, त्याविषयी " भारताच्या विदेशमंत्रालयात मात्र अद्याप विस्तृत विवरण प्राप्त झालेले नाही,' असे (आज दि. ६ ऑगस्ट) अधिकृत-

रीत्या सांगण्यात आले. ते ऐकून अनेक देशीविदेशी पत्रकारांना आश्चर्याचा धक्का बसला ! कारण दुर्घटना होऊन एक सप्ताह लोटण्याची वेळ येऊन ठेपली तरी आपले विदेशमंत्रालय मात्र 'समाधी' लावून बसल्यागत वावरते आहे की काय, अशी दाट शंका येऊ लागली आहे ! नेपाळच्या सीमेवरही चीनच्या कोणत्या कारवाया चालू झालेल्या आहेत, याची दखल घेण्यास भारताचे विदेशमंत्रालय अद्याप सिद्ध नाही, असे अनुभवास येत आहे. काटमांडू ते ल्हासा (तिबेटची राजधानी) या सडकेची बांधणी चीनने केलेली आहे व त्यामुळे या सडकेवरील सुरक्षितता हा विषय चीनच्या जिव्हाळयाचा केव्हाही बनू शकतो, अशी धास्ती माहीतगार मंडळींना पूर्वीपासूनच वाटत होती. या धास्तीचा पाठपुरावा करणारी वार्ता राजधानीत नुकतीच येऊन थडकलेली आहे. अद्याप तिला दुजोरा मिळालेला नसला, तरी या वार्तेनुसार **चीनने ल्हासा ते नेपाळ सरहद्दपर्यंतची सडक या मार्गावर सुमारे दर दहा पावलांवर एक चिनी सैनिक सिद्ध अवस्थेत आणून ठाण मांडून बसविला आहे. सैनिकांची ही अशी मांडणी करण्यापूर्वी नेपाळ सरकारला चीनने कोणतीही पूर्वसूचना दिली नसल्याचे कळते.** एकूण भूतान व नेपाळ या दोन्ही भूभागांवर ( म्हणजेच पाचपैकी दोन बोटांवर ) चीनचे प्रेम (?) एकदम वाढणार की काय, असा प्रश्न येथे गंभीरपणे विचारात घेतला जाऊ लागला आहे. भारत सरकार मात्र यामुळे 'जागृत' होण्याची लक्षणे दिसू लागलेली आहेत.

## □ गोवाप्रकरणी विलंब

लो. टिळकांचे पुण्यस्मरण करून आज नेपाळ व भूतानपर्यंत मजल मारून आपण पुन्हा दिल्ली दरबारात आलो आहोत. म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा सध्या येथे असून "गोव्याचे भविष्य" याविषयी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, पंतप्रधान श्री. शास्त्रीजी आदि प्रमुख राष्ट्रनेत्यांच्या भेटीगाठी घेण्यात गर्क आहेत. 'निदान नवी निवडणूक सत्वर नको,' एवढीच मागणी ते आग्रहपूर्वक सर्व नेत्यांना करीत आहेत असे कळले. दिल्लीच्या दरबारातील वातावरण केव्हा व का अनुकूल होते वा अचानक प्रतिकूल होते, याचा अंदाज आगाऊ करणे कठीणच आहे. परंतु एवढे मात्र राजधानीतील माहीतगारांना वाटू लागलेले आहे की गोवा नवी निवडणूकप्रकरणी अंतिम निर्णय घेण्यास जेवढा विलंब लावला जाईल, तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्रविरोधी वातावरण वाढीस लागण्यास अधिक वाव मिळणार आहे. त्याचप्रमाणे असेही कळले, की आपले दिल्ली-दरबारातील सर्व वजन वापरून संरक्षणमंत्री श्री. य. ब. चव्हाण कॉंग्रेसश्रेष्ठींना बजावीत आहेत, की संसदेच्या बैठकीपूर्वी (दि. १६ पूर्वी) जर या प्रकरणाची तड न गाठली गेली, तर संसदेतील विरोधी गटाचे खासदार या प्रश्नाचे सरकारविरोधी भांडवल बनविल्याविना राहणार

नाहीत. एकूण काय पंतप्रधान श्री. शास्त्रीजींची गोवा निवडणूकनिमित्ते पुन्हा नव्याने अग्निपरीक्षाच होणार आहे !

## □ महाराष्ट्र–गुजरातचा पुढाकार

संसदेच्या आगामी पावसाळी बैठकीची पूर्वतयारी राजधानीत सध्या जोराने चालू आहे. मराठी भाषिकांच्या दृष्टीने जसे गोमंतक विलीनीकरण, महाराष्ट्र–म्हैसूर सीमाविवाद या विषयांना महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व उत्तर भारतीय मंडळी (राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश व दिल्लीच्या जवळचा पंजाबचा प्रदेश यांतील मंडळी) राजभाषा विधेयक व भारत सरकारचे धोरण याला महत्त्व देत आहेत. राजभाषा हिंदीला ' राष्ट्रभाषा ' हे अभिमानाचे व आपुलकीचे स्थान प्राप्त करून घेण्यासाठी अद्याप बरीच तपश्चर्या करावी लागणार आहे, अशी लक्षणे दिसू लागली आहेत. हिंदीविषयी ज्यावेळी भावनावेगात विचार प्रकट केले जातात, त्यावेळी असे वाटू लागते, की या मंडळींची मातृभाषा हिंदी (वा तिची पोटभाषा) नसती, तर या मंडळींनी इतक्या पोटतिडिकीने हा भावनावेग व्यक्त केला असता का ? या दृष्टीने विचार करता संपूर्ण देशात सध्या फक्त गुजरातीभाषी व मराठीभाषी मंडळींतर्फेच जे काही हिंदीविषयी सांगितले जाईल, ते ऐकून घेण्यास अन्यभाषिक तयार असतात. सध्याचा भाषिक गोंधळ पाहता असे खरेच वाटू लागते, की ना उत्तरेचे ना दक्षिणेचे असे जे हे गुजरातीभाषी वा मराठीभाषी आहेत, त्यांनीच या आघाडीवर अग्रेसर झाल्याविना हा गोंधळ संपणार नाही. उत्तर प्रदेशातील एका ज्येष्ठ व अनुभवी सनदी सरकारी नोकराशी (I. C. S.) या विषयावर अनौपचारिकरीत्या गप्पागोष्टी करण्याची संधी लाभली असता ते विचारी गृहस्थ म्हणाले की ' नेहरू सरकारने अगदी प्रारंभापासूनच जी घोडचूक करून ठेवली आहे, ती शास्त्री सरकारला बरीच किंमत देऊन निस्तरावी लागणार आहे ! ' या अनुभवी गृहस्थाने पुढे सांगितले, की सातासमुद्रापलीकडून येणारा इंग्रज आवश्यकतेनुसार भारतातील कोणतीही भाषा आत्मसात करीत असे. [ धर्मप्रचारार्थ बायबलसारखा धर्मग्रंथही बंगाली वा मराठी आदि भाषांत अनुवादित करण्यात कमीपणा मानीत नसे. ] त्यावेळचे आम्ही जे जुने सनदी नोकर आहोत, तेसुद्धा इंग्रजीसोबत आणखी एखादी भारतीय भाषा शिकतच असू. तेव्हा आजही केंद्र सरकार ठाम निश्चय व निर्धार प्रकट करील, की इंग्रजीबरोबरच सर्वांना हिंदी प्रारंभी तोडके-मोडके व वर्ष-सहा महिन्यांत चांगले आले पाहिजे, असा ' जी. आर् ' (गव्हर्न्मेंट रूल, काढील, तर भाषिक आघाडीवर तत्काळ कायापालट झाल्यागत अवस्था निर्माण होऊ शकेल. परंतु असे धैर्य शास्त्रीसरकार प्रकट करील का, हाच आजचा मुख्य यक्षप्रश्न आहे. शास्त्री सरकार वेळीच हे करणार नाही, तर पुढील पिढी त्यांस दोषी ठरविल्याविना राहणार नाही.

● ● ●

होच ती पवित्र रणभूमी



# पावनखिंड

ब. मो. पुरंदरे

उन्हाळयात पार पडलेल्या 'पन्हाळा ते खेळणा' या पावनयात्रेचा वृत्तांत गो. नी. दांडेकर यांच्या शैलीत किर्लोस्कर मासिकात आपण वाचलाच असणार. हे ऐन पावसाळीयात्रेचे कथन....

आषाढाच्या शुद्ध चौदशीची सांज. पाऊस धो धो कोसळत होता. दाट दाट धुक्याने सारा पन्हाळगड झाकळून गेला होता. झाडाझुडपांच्या पानांवर पावसाच्या धारा सडसडत होत्या. गडाच्या कडेकपाऱ्यांतून पाण्याचे लोट खळाळत होते. दिशा अंधारल्या होत्या. धुक्यामुळं दहा हातांवरचं माणूस ओळखता येत नव्हतं. पन्हाळगड आषाढी पावसात धुंद झाला होता. मधूनच वारा जोराची फुंकर घालीत होता. त्या वाऱ्याने धुक्याचे लाट घुसळून उसळत होते. पाणी खळाळा वाहात होतं. त्या पाण्यात पावलं चुबुक् चुबुक् वाजत होती. बालेकिल्ल्याकडून तीन दरवाजाकडे आमची पावलं पडत होती. पायांत हंटर बूट होते. त्यांतही पाणी शिरून पावलांचा गमतीदार आवाज होत होता. अंगावरचे काळेभोर रेनकोट आणि शिरस्त्राणं निथळत होती. वाऱ्याने रेनकोट फडफडत होते.

धुक्याच्या धावत्या लोटामागे अस्पष्ट दिसत होता गडाचा तो दख्खन दरवाजा. प्रचंड! चिरेबंदी! रुबाबदार! दरवाजाच्या कमानीतून आम्ही पुढे जाऊ लागलो. आतल्या बाजूस दोन्ही अंगाला असलेल्या त्या भव्य कमानदार देवड्या अंधारलेल्या होत्या. आमच्या पावलांचे आवाज घुमत होते. ते डौलदार आणि टोलेजंग बांधकाम न्याहाळीत क्षणभर आम्ही थबकलो. असं वाटलं, ह्या अंधारलेल्या देवडीतून एखादा धिप्पाड सिद्दी हिलाल रप् रप् पावलं टाकीत अन् डोळे वटारीत पुढं येईल अन् दरडावील, ' ठय्‌रो! कौन हो तुम?'

" आम्ही महाराजांची माणसं! "

केवळ कल्पनेने मनश्चक्षूंपुढे आलेल्या त्या अदृश्य सिद्दी हिलालाला मी नकळत खरोखरच मोठ्याने जवाब दिला, ' आम्ही महाराजांची माणसं! ' आवाज घुमला अन् निमिषात मी भानावर येऊन मोठ्याने हसलो. हाऽहाऽहाऽहाऽ! हे हसणंही घुमलं. माझ्या मित्रांना वाटलं, हे सारं प्रतिध्वनींची मजा पाहण्यासाठीच! तेही हसले! त्या प्रचंड कमानींनी पडसाद दिला.

आम्ही दरवाजाच्या तोंडाशी आलो. समोर पाहिलं, वर पाहिलं. काहीही दिसत नव्हतं. फक्त ऐकू येत होती पाण्याची खळखळ. नंतर ह्या उत्तुंग दरवाजाच्या कडेला असलेल्या पायऱ्या चढून आम्ही दरवाजाच्या माथ्यावर आलो. धुक्याने आणि पावसाने सारा गड काबीज केला होता. काळ्या रेनकोटातल्या आमच्या काळ्या आकृती न्याहळीत होता गडाचा पायथा. पण व्यर्थ! अखेर भास होत होता, की आपणच अथांग अंतराळात तरंगणाऱ्या चिरेबंदी काळ्या चबुतऱ्यावर उभे आहोत.

अन् तरीही राम डिमळेने मला पुसलं,

" उद्या आपण जाणार, ती पावनखिंड कुणीकडं? "

" ती ऽऽ तिकडे! "

एखाद्या सेनापतीच्या थाटात मी अलगद उजव्या हाताचं बोट आणि नजर टवकारीत म्हणालो. रामने आणि साऱ्यांनी तिकडे पाहिलं. काहीही दिसत नव्हतं. दिसत होतं माझं टवकारलेलं बोट आणि त्याच्या टोकावर डुलत असलेला पावसाचा थेंब !

पण अशा महाभयंकर पावसातच उद्या आम्ही वीस सौंगडी पन्हाळगडावरून बाजीप्रभू देशपांड्यांच्या पावनखिंडीत जाणार होतो. तसेच पुढे थेट विशाळगडावरही जाणार होतो. पन्हाळगडाच्या वायव्येला चाळीस मैलांवर, डोंगरातल्या आणि घनदाट जंगलातल्या आडवाटेने ! तुफान वाहणाऱ्या ओढ्यानाल्यांतून, चिखलातून, कडेकपाऱ्यांतून ! रानपशूंनी, अजगरांनी आणि रक्त शोषणाऱ्या जळवांनी गजबजलेल्या भयंकर किर्रर अरण्यातून ! जेथे रस्तेच नाहीत, धुक्यामुळे जेथे दिशा उमजत नाहीत, धो धो वाहणाऱ्या ओढ्यांत जेथे लहान-मोठे धोंडे वाहत येत आहेत अन् जेथल्या पाऊलवाटा पार धुऊन, बुजून गेल्या आहेत, अशा यमवाटेने आम्ही उद्या पन्हाळगडावरून विशाळगडाकडे जायचं ठरवलं होतं.

हा आमचा मनसुबा पुण्या-मुंबईत ज्यांना समजला होता, त्यांनी आम्हांला निरोपाची चांगलीच शेलापागोटी दिली होती. कुणी काही म्हणत होतं, कुणी काही म्हणत होतं. त्यांतले काही नमुने—

" ही नसती अवदसा कुठून रे आठवली तुम्हाला ? "

" आम्हाला एकदा ओंकारेश्वरी पोहोचवा अन् मग कुठं खिंडीत जा, नाही तर दिंडीत जा ! "

" मावशी सीरियस आहे, म्हणून रजा पाह्यजे काय ? तुमची मावशी त्या पावनखिंडीत राहते होय ? माहीत आहे सारं ! त्या गो. नी. दांडेकरांबरोबर उनाडायला जायचंय तुम्हाला ! —बरं जा ! "

" परत आलात तर भेटूच ! "

" शुद्ध येडपट आहात ! "

" मरा ! "

असे असंख्य अहेर गोळा करीत करीत शिवराय मंडळाचे आम्ही दहा शिलेदार, पुण्यातील आठ तरुण आणि कोल्हापूर जिल्ह्यातले दोघेजण मिळून वीसजण पन्हाळगडावर दाखल झालो. या सहलीची योजना आणि नेतृत्व शिवराय-मंडळाकडे होतं. ही सहल अशा धो धो पावसात आणि भयंकर बिकट मार्गाने पायी पायी करण्यामागं हेतूही विशेष होता. तीनशेपाच वर्षांपूर्वी दि. १२ जुलै १६६५ रोजी, म्हणजे आषाढ शुद्ध पौर्णिमेच्या रात्री शिवाजी महाराज आणि बाजीप्रभू देशपांडे हे सहाशे मावळ्यांच्या पायदळानिशी पन्हाळगडावरून निघाले. गडाभवती त्यावेळी सिद्दी जौहरच्या अफाट फौजेचा वेढा पडलेला होता. त्या वेढ्यातून अतिशय सावधपणे व सफाईने महाराज निसटले आणि विशाळगडाकडे झपाट्याने निघाले. नेमक्या त्याच

दिवशी, त्याच आडवाटेने पायी पायी आम्ही पावनखिंडीत जाणार होतो. महाराज जेव्हा निघाले, तेव्हाची नैसर्गिक परिस्थिती आणि मार्गातील अडचणी यांची कल्पना यावी, तो खडतर आनंद आपणही अनुभवावा, अशी हौस शिवराय मंडळाच्या शिलेदारांच्या मनात उमटली आणि आषाढाच्या शुद्ध चतुर्दशीच्या दिवशी आम्ही पन्हाळ्यावर येऊन सायंकाळी सहज गडावरती फेरफटका करण्यास निघालो. गडाच्या तटाबुरुजावरून आम्ही पावसात भटकत होतो. पन्हाळगडावरचे तरुण इतिहास-संशोधक मुरलीधरराव गुळवणी हे आमच्यात सामील झाले होते. त्यांना ह्या गडाची नस न् नस माहीत आहे. वाघदरवाजा, अंधारबाव, पुसाटी बुरूज, काली बुरूज, चार दरवाजा, सज्जाकोठी, राजदिंडी असे टेहळत टेहळत आम्ही चाललो होतो. पावनखिंडीच्या प्रवासाला उद्या, म्हणजे आषाढी पौर्णिमेला आम्ही निघणार होतो. प्रारंभी पन्हाळा पाहून जाणीव घेत होतो, की सिद्दी जौहरचा वेढा केवढा मोठा असेल ? कसा अव्वळ असेल ? महाराज आणि त्यांची माणसं कसा चिवट आणि तिखट प्रतिकार करीत असतील ?

दोनच महिन्यांपूर्वी १९ मे, ६५ रोजी श्री. गोपाल नीलकंठ दांडेकर, राजाभाऊ कुलकर्णी आणि मी असे तिघेजण याच वाटेने पावनखिंडीत गेलो होतो. ते दिवस उन्हाळ्याचे होते. चिखलाचा, ओढ्यानाल्यांचा किंवा जळवांचा त्रास त्यावेळी नव्हता; पण आता मात्र सर्व तऱ्हेच्या विकट अडचणींतून मोठ्या कष्टाने हे चाळीस मैल अंतर पायी तोडावयाचे होते. पाठीवर वजन राहणार होते. त्या वद्य चतुर्दशीच्या सांजेला मी आणि अप्पासाहेब दांडेकर सर्वांसह पन्हाळगडावर हिंडत होतो, पण दोघांच्याही मनात एकच गंभीर विचार चालू होता, की ही दिंडी सुखरूपपणे शेवटपर्यंत जाईल का ? वाटेत विषारी सापानागांचं, अजगरांचं, रानरेड्यांचं, वाघांचं, अस्वलांचं, लांडग्यांचं आणि बेफाम वेगाने वाहणाऱ्या मोठमोठ्या ओढ्यांचं राज्य आहे. कसं होईल ? काय होईल ?

बालेकिल्ल्यात आम्ही गेलो. तेथील प्रचंड अंबरखान्याच्या इमारती मी सर्वांना दाखवीत होतो. श्री. गुळवणी माहिती सांगत होते. बालेकिल्ल्याच्या एका बुरुजाकडे बोट करून ते त्या बुरुजाचा इतिहास सांगत होते. ती कथा मोठी रोमांचकारी होती. आपल्या कलदार शब्दांत ते सांगत होते.

" तो बुरुज आहेना, तिथं सातशे वर्षांपूर्वी एक बाई आणि तिचं मूल भोज शिलाहार नावाच्या राजाने जिवंत पुरून बळी दिलं अन् वर बुरुज बांधला ! "

सर्वांच्या नजरा रोखल्या गेल्या होत्या. मीही त्या बुरुजांकडे बघत होतो, पण डोक्यात विचार चालला होता उद्याच्या प्रवासाचा. गुळवणी सांगत होते,

" ती बाई जातीने तेली होती. ती स्वत: होऊन तयार झाली बळी जायला. त्याबद्दल तिच्या घराण्याला इनाम मिळणार होते. तिच्या घराचं दरिद्र्य कायमचं संपणार होतं. ती बळी गेली. बुरुज बांधून झाला. इनाम मिळालं. त्याच बाईचा

आजचा वंशज महादवा तेली म्हणून आहे. तो उद्या आपल्याबरोबर वाटाड्या म्हणून पावनखिंडीकडे येणार आहे ! ”

महादवा तेली आमच्याबरोबर येणार होता. वाटेचा चांगला माहीतगार, पण गडी आता वयानं थकलाय. झपाझपा चालणं आता होत नाही.

आम्ही बालेकिल्ल्यातून परतलो. सर्वांच्या डोळ्यांपुढं ती तेलीणच दिसत असावी. मला मात्र दिसत होते उद्याच्या प्रवासात भेटणारे ओढे ! ते पार कसे करायचे ? अन् लगेच डोक्यात विचार आला, की याच वाटेने तीनशेपाच वर्षांपूर्वी गेलेले बाजी-प्रभू आणि त्यांचे मावळे हे ओढे ओलांडून कसे गेले असतील ?

पन्हाळगडावर त्या रात्री मुक्काम होता. रात्र दाटत गेली. सारे झोपले. मी मात्र जागा होतो. झोपच येत नव्हती. मन सिद्दी जौहरच्या वेढ्यात फिरत होतं. मुंगीही वेढ्यातून आरपार जाऊ शकणार नाही, असा चिरेबंदी वेढा सिद्दीने घातला होता. अहोरात्र चोवीस तास तोफाबंदुकांचे मोर्चे डोळ्यांत तेल घालून गस्त घालीत होते. असाच धो धो पाऊस पडत होता. धुकेही असेच दाटत असेल. शिवाजीराजांची शिकार साधण्यासाठी सिद्दी गेले साडेचार महिने ठाण मांडून बसला होता. ह्या असल्या पिसाट पावसाचा त्यालाही काय कमी त्रास होत असेल ! पण जिद्द भयंकर. प्रतापगडच्या युद्धात झालेला पराभव धुऊन काढण्याचा चंग शाहीफौजेने बांधला होता. ईस्ट इंडिया कंपनीवाले इंग्रज आपल्या दारूगोळ्यासह आणि एका प्रचंड तोफेसह गडाखाली सिद्दी जौहरच्या मदतीला होते. त्यांचा दारूगोळा महा-राजांविरुद्ध पन्हाळ्यावर आग पाखडत होता. पन्हाळगडही जिद्दीने झुंजत होता. साडेचार महिने उलटत आले होते, तरीही जौहरच्या चाळीस हजार फौजेला साव-जाची चाहूलही लागत नव्हती.

ही अशीच ती आषाढाच्या शुद्ध चतुर्दशीची रात्र होती. महाराज गडावर शय्ये-वर पहुडले होते. चिंता चित्त जाळीत होती. तिकडे पुण्यात शाएस्ताखान येऊन बसला होता. आता काहीही करून पन्हाळगडावरून निसटायलाच हवे होते. काहीही करून. काहीही करून. नाही तर सारं स्वराज्य शत्रूच्या टाचेखाली गवसणार होतं. पावसाळा संपल्यावर शत्रूला अहीमहीचं बळ चढणार होतं. महाराज विचार करीत होते गडावरून निसटण्याचा. सारी रात्र चिंतेत गेली. पहाट झाली अन् महाराजांना जरा डोळा लागला. चिंतेचं वादळ शांत झालं. अगदी अलगद ते निद्रेच्या प्रशांत गाभाऱ्यात प्रवेशले. शांत शांत साखरझोप अन् क्षणार्धातच ते एकदम जागे झाले. त्यांना काहीतरी स्वप्न पडलं होतं. त्यांची नजर वायव्येच्या दिशेला वळली. ते पुटपुटले,

“ विशाळगड ! विशाळगड ! ”

आणि कोंबडा आरवला. मी जागा झालो. झटकन् उठून बसलो. बघतो तो अप्पा-साहेब दांडेकरही उठून बसले होते. पलीकडे वसंतराव पेंढारकर आणि माधवराव

ताम्हणे यांचीही कुजबूज चालली होती, हसत हसत अप्पासाहेबांनी सुरात म्हटलं,

" उठा उठा हो सकळिक ! वाचे स्मरावा गजमुख ... "

बाहेर उजाडलं होतं. एकापुढं एक एक गोड गोड अभंग, भूपाळचा, गौळणी ते म्हणत होते. बाहेर झाडांवर पाखरं किलबिलत होती. ती सकाळ होती आषाढ शुद्ध पौर्णिमेची.

ह्याच तिथीला, अशा सकाळी महाराज गडावर आपल्या जिवलगांच्या कोंडाळ्यात बसून बेत ठरवीत होते, सिद्दी जौहरच्या चिरेबंदी गराड्यातून निसटून विशाळगड गाठण्याचा. काय करायचं, कसं कसं करायचं हा सारा तपशील ठरला. फार फार अवघड मनसुबा होता. नाजूक सुतावरून चालत जायचं होतं. तोल सांभाळायचा होता. सूत तुटून द्यायचं नव्हतं. गडावरून सिद्दी जौहरकडे तहाची बोलणी करण्यासाठी वकील पाठवायचा आणि बिनशर्त शरणागतीची बोलणी करून जौहरला आणि त्याच्या साऱ्या छावणीला गाफील करावयाचा बेत महाराजांनी आखला होता. महाराज समोर बसलेल्या गंगाधरपंतांकडे हात करून म्हणाले,

" पंत, आजची ही वकिली तुम्हाकडे ! "

पंत मुजऱ्याला झुकले. तयारी सुरू झाली.

गंगाधरपंत नजराण्याच्या ताटातबकासह निघाले. गडाचा दरवाजा कर्रकन् उघडला गेला. शेला सावरीत पंत गड उतरू लागले. छावणीची नजर पंतांवर गेली.

सहज एक फेरफटका मारण्यासाठी आम्ही सारे बाहेर पडलो. गुळवणी बरोबर होतेच. रामचंद्रपंत अमात्यांच्या समाधीला उजवी घालून आम्ही नायकिणीच्या सज्जात आलो. बादशाही अमलात इथं एकतीस नायकिणी नांदत होत्या ! आता तिथं नृत्य चाललं होतं जलधारांचं. धुकं नव्हतं. गडाचा तळ स्वच्छ दिसत होता. जिकडे तिकडे हिरवी राई आणि मातट पाणी दिसत होतं. तुडुंब !

अशाच सकाळी गंगाधरपंत जौहरच्या शामियान्यात बोलणी करीत होते आर्जवाची, नम्रतेची. केवढी नम्रता ! केवढा गोडवा ! सतरा गुणाच्या लेकीचं लगीन ठरवायला गेलेल्या बापासारखं पंत बोलत होते अन् अखेर त्यांनी जौहरला बनवलंच ! 'उद्याच शिवाजीराजे बिनशर्त जातीने तुमच्या छावणीत येऊन तुमच्यापुढे दाखल होतील !' अशी थाप वकिलाने दिली. गारुडी नागाला भुलवायला आला होता. अखेर गारुडीच भुलला !

न कळत सारी छावणी गाफील बनत गेली ! महाराजांनी त्याच दिवशी रात्रीच्या पहिल्या प्रहरात, म्हणजे रात्री १० वाजण्यापूर्वी पन्हाळ्यावरून गुपचूप त्या गाफील मोर्च्यातून निसटून जाण्याचा धाडसी बेत योजला. पौर्णिमा होती, पण ढगाळ आकाशात चंद्र लुप्त झाला होता. अंधार दाट होता. पाऊस पडत होता. ढग गडगडत

होते. आपल्या सहाशे पायदळी मावळ्यांच्या तुकडीनिशी बाजीप्रभू महाराजांना पालखीतून नेणार होते.

मी आणि अप्पासाहेबांनी पन्हाळा ते विशाळगड ही वाट पायी तुडविलेली होती. आता भर पावसाळ्यात ही वाट कशी असेल, याचं चित्र डोळ्यांपुढं चक्क उभं राहत होतं. अशा वाटेने दिवसा जाणं अती कष्टाचं; मग रात्रीचं जाणं केवढं कठीण ? अशक्यच होतं. महाराज रात्रीच्या पहिल्या प्रहरात गडातून राजदिंडीच्या बाजूने गडाबाहेर पडले होते. आम्ही ठरवलं दुपारीच निघावं !

दुपारी बरोबर साडेतीन वाजता आम्ही सारे सज्ज झालो. आमच्यापैकी तेरा-जणांच्या अंगावर रेनकोट व शिरस्त्राणं होती, पण सातजणांनी काहीही आणलं नव्हतं. ही सात पोरं तश्शी धो धो पावसात चार दिवस भिजत होती. त्यांच्या सामानाच्या पिशव्या मात्र त्यांनी प्लॅस्टिकमध्ये गुंडाळलेल्या होत्या, पण ही पोरंच शहाणी ठरली, कारण आमचे रेनकोट निव्वळ शोभेचे ठरले. पाऊस इतका अखंडपणे आणि भयंकर जोरात कोसळत होता, की कोटांच्या आत पाणी शिरून आम्हीही चार दिवस असेच भिजत होतो. वाल भिजत घालावेत, तसे आम्ही संतत धारेखाली चार दिवस भिजत होतो. 'कडवे' वाल होते हे !

छत्रपतींच्या जयजयकारात आम्ही गडातून बाहेर पडलो. प्रत्येकाच्या पाठीवर रेग्झीनच्या पिशव्यांत निदान नऊ–दहा किलो वजनाचं सामान होतं. वाट विलक्षण खराब होती, चिखल फार होता, असेना का ! वाट उमगत होती, हे काय कमी झालं. पुढच्या प्रवासात तर वाटाच नव्हत्या ! वाटाडे नेतील ती वाट ! आणि आमचे सारे वाटाडेच वाटा चुकले ! दिवसा उजेडी ही माहीतगार वाटाड्यांची गत. रात्रीच्या अंधारात ह्या डोंगरांत अन् जंगलांत कसं व्हायचं ?

झाडीने वेढलेला गडाचा उतार आम्ही उतरलो आणि म्हसाईच्या पठारावर चढू लागलो. दाट हिरव्या झाडीतून आणि धुक्यातून ही आमची तुकडी नागमोडी वळसे घेत डोंगर चढताना फार छान दिसत होती. एका बाजूने वरून पाणलोट खळाळत येत होता. पोरं मोटमोठ्याने गाणी म्हणत होती. अगदी आघाडीला अप्पासाहेब होते. अगदी शेवटी मी आणि भरतराव मळेकर असे होतो. हा डोंगर चढून गेल्यावर म्हसाईचं पठार सुरू झालं. हे पठार पन्हाळ्याच्या वायव्येस आहे. असं छान पठार ! अगदी सपाट. बारीक हिरवळ पसरलेली आहे. जागोजाग पाणी पसरलेलं आहे. ह्या पठारावर झाडी फारशी नाहीच. सायकलीवर बसून जावं अशी ही पाच मैलांची सपाटी आहे. पावलं झपझप पडत होती. आमच्यातली सुरेश परचुरे, राजा खरे, प्रकाश सापते, मनोहर भागवत आणि सुरेश खरे ही मुलं मोठी गुणी होती. यांचा आवाज खणखणीत. कवाल्या, पोवाडे, गाणी (अन् लावण्याही !) तोंडपाठ. म्हणण्याचा ढंगही ऐटीचा, ह्या पोरांत कला होती. बाकीचे सारे उगीच अनघड डाग होते. त्या पठारावर गाणी–पोवाडे चालता चालता रंगू लागले. ते पाच मैल

कसे संपले, ते समजलंच नाही. हे एवढेच काय ते सुखाचे पाच मैल. काहीच त्रास नाही. अगदी राजमार्ग. अवघ्या एक तासात हे पाच मैल संपले. म्हसाईदेवीचं देऊळ आम्ही मागे टाकलं आणि सुखाची वाट संपली. यातना सुरू झाल्या. झाडी, दरड्या, कपाऱ्या आणि उलटा वारा! संध्याकाळचे सहा वाजले, अंधारू लागलं. बांदिवड्या-जवळची डोंगराची भयंकर दरड उतरायलाच अर्धा तास लागला. खाली उतरलो तर अतोनात चिखल. धडपड करूनही पावलं पटापट पडेनात. वास्तविक आमची इच्छा होती, की पहिला मुक्काम करपेवाडीला, म्हणजे सतरा मैलांवर करावा; पण इथंच इतका अंधार पडला. अखेर बांदिवडे गावात गणपतराव पाटलांच्या वाड्यात आम्ही तळ दिला. या सर्व भागात, या दिवसांत प्रत्येकाच्या घरात शेकोटी अहोरात्र पेटलेली असते. ह्या शेकोटीला म्हणतात 'परसा.' पावसात चिंब भिजून आम्ही आलो होतो. आम्ही तेथे पेटलेल्या परसाच्याभवती जमलो. केवढा गोड उबारा तो. जेवणखाण तिथेच. आम्ही खाण्यासाठी बरोबर गच्च शिदोऱ्या घेतल्या होत्या. जेवणानंतर परसाच्या उबाऱ्यात सुरेश पुरचुरे आणि पार्टीचे वग-पोवाडे रंगले. नंतर मग अशी गाढ झोप लागली—मंत्रिमंडळासारखी.

रात्रीचे दहा वाजले. वास्तविक याचवेळी बाजीप्रभू आणि महाराज पन्हाळ्याहून निघाले होते. रात्री दोनच्या सुमारास मी जागा झालो. महाराज निसटल्याची खबर जौहरला गस्तीच्या हेरांकडून मिळाली, तेव्हा अशाच वेळी सिद्दी मसूद हजारो हशम घेऊन महाराजांच्या पाठलागावर दौडत निघाला होता. काय भयंकर वातावरण असेल त्या वेळी? उजेडात आम्हाला एक कडेकपाऱ्याची दरड उतरायला अर्धा तास लागला!

दुसऱ्या दिवशी आम्ही उजेडताच पावणेसहाला पुढे निघालो. भातखाचरांतून चिखल तुडवीत चाललो होतो. आमचा वाटाड्या महादबा तेली फार थकला होता. आम्ही त्याला तेथूनच पन्हाळ्याला परतवला आणि नवा वाटाड्या बांदिवड्यातून घेतला. हा वाटाड्या सत्तरी ओलांडलेला होता, पण फारच चिवट होता. तो आणि अप्पासाहेब दांडेकर आघाडीला होते. अप्पासाहेब आमच्यात सर्वात वडील. वय वर्षे पन्नास; पण त्यांच्या म्हातारपणाचा अजून फारसा बोभाटा झालेला नाही.

कुंवारीची खिंड ओलांडली. खोताची वाडी मागे टाकली. आभाळ सतत गळतच होतं. आता एक एक ओढे भेटू लागले. तरी जरा लहानच होते. डाव्या हाताला डोंगरांची रांग. पाण्याचे लोट. पायाखाली भारी चिखल. उजव्या हाताला भाताची अन् नाचणीची शेतं. मी सतत घाई करत होतो झपझप चला म्हणून; पण अशक्य होतं. आमचा वेग होता ताशी दीड मैल! सतत चालतच होतो, पावसात न्हातच होतो. घसरून पडतही होतो. दुपारचे बारा वाजले होते, तरी वाटत होतं, पहाटच झाली आहे. सारं धुकाळलेलं, अंधारलेलं. अजून पावनखिंड पंधरा मैल दूर होती.

आम्ही करपेवाडी ओलांडली आणि भातखाचरं संपून जंगली भाग सुरू झाला. आता डोंगराच्या तीन मोठ्या रांगा दाट जंगलातून ओलांडायच्या होत्या. आम्ही घाई करीत होतो. राजा खरे, राम डिमळे, मुकुंदा गोंधळेकर इत्यादी वाटाण्यासारखी पोरंही त्या रस्त्यापुढं वेग चढव शकत नव्हती. वाट तुडवीत होतो आणि आमचा वाटाड्या वाट चुकला ! आता वाट कोण दाखवणार ? मी आणि वसंतराव पेंढारकर मागे होतो. आम्ही तसेच तो डाव्या हाताचा डोंगर चढून वर गेलो. बुटांत पाणी आणि चिखल शिरला होता. तसेच आम्ही घसरत-निसरत डोंगर चढलो. मागोमाग बाकीचे येऊ लागले. त्या डोंगरावर काही अंतर जंगल ओलांडल्यावर झाडांच्या दाटीत चार-दोन झोपड्या दिसल्या. मोठा आनंद झाला. वाट दाखवणारं कुणी भेटेल, या आशेनं मी एकटा पुढं गेलो. सारी सामसूम होती. पुढं गेलो. एका झोपडीत लहान लहान मुलं खेळत होती, पण मला पाहून ती पळूनच गेली ! मला कुणी भ्याल्याचं हे पहिलंच उदाहरण. मी त्यांना हाक मारू लागलो; तेवढ्यात पलीकडून एक जख्ख म्हातारी व मुलगी पुढं आली अन् थबकली. म्हातारीनं भित्र्या मुद्रेनं मला पुसलं,

"कोन ? मिलट्रीवालं ? "

"नाही नाही, मिलटरीवाले नाही. आम्हाला विशाळगडाकडे जायचंय्. रस्ता चुकलो. पाटेवाडीची वाट दाखवता का ? "

"आन् मंग हकडं कुनीकडं आला ? ही तं कळकवाडी. चला, मी वाट दावतो ! "

म्हातारी अन् ती मुलगी माझ्याबरोबर निघाली. म्हातारीने असा तिरपा हात करीत म्हटलं,

"असंच जावा संबूर नाकाम्होरं ! "

कपाळ ! नाकाम्होरं दिसत होतं जंगल फक्त. वाट नेमकी नव्हतीच. तेव्हा तिनं त्या मुलीला आमच्याबरोबर दिलं वाकणापर्यंत. वसंतराव पेंढारकर त्या मुलीबरोबर पुढे चालले होते. वसंतरावांचा क्षणात तिच्यावर जीव जडला. मोठी गोड बाई होती ती. नाजूक हसायची अन् लाजायची, मुलीचं वय होतं सहा सात वर्षांचं.

अर्धा मैल असेच चाललो. पुन्हा वाट चुकलो ! त्या डोंगराच्या उतरणीवर नाचणीची शेतं होती. म्हणजे चिखल. वाट नव्हेच. पुन्हा चुकलो ! आता ? तसेच चालत राहिलो. तेवढ्यात एका वावरात दोन इरली दिसली. दोन बायका नाचणीची लावणी करीत होत्या. मायलेकी होत्या त्या. मी बाईला म्हटलं,

"बाई, पाटेवाडीची वाट सुधारेना. तेवढी दाखवता का ? "

आम्ही किती चुकलो आहोत, हे त्या बाईने अस्सा लांववर हाताचा फेरा फिरवून सांगितलं आणि चटकन् म्हणाली, 'मी दावतो वाट तुमाला, चला ! '

इकडची वायामाणसं वाप्यावाणी पुरुषार्थी भाषा वापरतात. त्या बाईने आम्हाला त्या उतरणीवरून नेलं. आम्ही चिखल तुडवीत, पडत, कोसळत पाटेवाडीकडे चाललो. मीच असा एकटा होतो, की जो आपटलो नाही. वाटेत एका शेतात काम करीत असलेल्या तीन–चार बायकांनी घाबऱ्या पण स्पष्ट शब्दांत आमच्या वाटाड्या बाईला इशारा दिला. त्या म्हणाल्या,

"मागं फीर ! तू कशाला जातोस त्येंच्यासंगं ? त्ये मिलटरीवालं हैती !"

"अग न्हाई ! चांगली मानसं हैत ! मिलटरीवालं न्हाईत ! वाटा चुकल्याती. इशाळगडाला जायाचीत. वाट दावतो यानला."

पाटेवाडीच्या शिवारात तिने आम्हाला आणून सोडलं. आमच्यातल्या काही मंडळींनी निरोप घेताना नकळत शहरी पद्धतीने मोठ्या कृतज्ञतापूर्वक तिला नमस्कार केला. मी तिच्या हातावर काही पैसे ठेवले. दुधात-केशराचा रंग मिसळत जावा, तसा तिच्या चेहऱ्यावर आनंद उमलला. या भागातील लोक अतिशय गरीब आहेत. पोटभर खायचीही त्यांना वाण आहे; पण ते फार प्रामाणिक आहेत. कष्टाळू आहेत, हसतमुख आहेत. माणुसकी फार मोठी आहे त्यांच्यात.

आम्हाला भेटलेल्या सर्व वाड्या आठ–दहा खोपटांच्या होत्या. आम्ही वांदिवड्याहून घेतलेल्या म्हाताऱ्या वाटाड्याला निरोप दिला. पाटेवाडीच्या तोंडावरच आम्हाला एक माणूस भेटला. तो आपल्या शेतावर निघाला होता. फार मोठ्या मनाचा माणूस होता तो. वय असेल चाळीस–बेचाळीस. प्रसन्न स्मित कायमचंच त्याच्या मुखावर नांदत होतं. आम्ही त्यांना पुढची वाट विचारली. म्हटलं, 'आम्हाला पांढऱ्या पाण्यावर जायचंय !' अन् आम्ही पुढं पावनखिंडीतून विशाळगडावर जाणार आहोत हे त्यांना सांगितल्यावर त्यांना आमचं कौतुकच वाटलं. त्यांनी लगेच म्हटलं,

"थांबा, मी तुम्हाला पांढऱ्या पाण्यापर्यंत पोहोचवतो !"

आम्हाला आनंद झाला. त्या गृहस्थांचं नाव होतं केशवराव माने. ते पाटेवाडीतील आपल्या घरी गेले आणि आपली बंदूक घेऊन आमच्याबरोबर निघाले.

आतापर्यंत आम्हाला जळवांचा त्रास झाला नव्हता. कळकवाडीजवळ फक्त एकच जळू वासुदेवराव भिड्यांच्या पायाला लागली होती. इकडच्या जंगलात माणसाचं रक्त शोषणारा 'कानट' नावाचा जळूसारखा प्राणी अतिशय मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात असतो. मुळात तो दिसतो विटकरी रंगाच्या गांडुळासारखा. भराभर ही कानटे माणसाच्या अंगाला बिलगतात आणि आपल्या तोंडाने तेथे छिद्र पाडून सपासपा रक्त पिऊ लागतात. आपल्या अंगाला कानट लागलंय हे माणसाला समजतही नाही. अगदी बिनबोभाट ती रक्त पीत असतात. रक्त पिऊन टंच होतात, तेव्हा आपल्या हाताच्या अंगठ्यासारखी जाड आणि जवळजवळ चार इंच लांब होतात. त्यांचं पोट टंच भरलं, की ती आपोआप गळून पडतात. कानटे रक्त फारच झपाट्याने पितात. कानट गळून पडलं किंवा ओढून काढून टाकलं, तरी त्याने



आमच्यात लेचापेचा एकही नव्हता....

आपल्या अंगाला पाडलेल्या छिद्रातून थोडा वेळ रक्त वाहत राहते. वेदना मात्र होत नाहीत.

पाटेवाडीनंतर निसर्गाचा रौद्रावतार दिसू लागला. पाऊस तर अखंड कोसळत होताच. पण आता त्याच्या धारा फारच मोठ्या आणि वेगवान येऊ लागल्या. मोठे मोठे ओढे भेटू लागले. पाण्यात पाऊल घातलं, की पाण्याच्या तुफानी गतीने झोक जायचा. मांडीइतके पाणी असले तरी एकट्याला ओढा पार करणं जड जाऊ लागलं. उंच डोंगरांवरून ओढे खळाळत येत असल्यामुळे त्याचा वेग साहजिकच राक्षसी होता. वेगही भयंकर आणि त्यांचा आवाजही भयंकर. आमच्यात भित्रा किंवा लेचा-पेचा एकही नव्हता. माधवराव ताम्हणे, गुप्ते, रानडे ही माणसं जरी देहाने किरकोळ होती, तरी चिवट विलक्षण. अप्पासाहेबांच्या पायांत गमबूट होते. ह्या बुटांचा त्यांना इथं त्रासच झाला. ओढ्यात उतरल्यावर त्या गमबुटांत पखालीसारखं पाणी शिरायचं! एका मोठ्या थोरल्या ओढ्यात राम डिमळेने त्यांना पाठीवर घेऊन पैलतीर गाठला. प्रत्येकाच्या पाठीवर आठ ते दहा किलो वजनाच्या पिशव्या

होत्याच. रेनकोटांच्या खिशांतही पाणी शिरत होतं.

आता डोंगरांच्या रांगा ओलांडताना जंगल अगदी घनदाट लागलं. वर बघितलं तर आकाश दिसत नव्हतं. कानटी चटाचटा पायाला चिकटत होती. दोन दोन, चार चार! टंच फुगून पोटऱ्यांवर शेंगासारखी लोंबत होती. तोडून काढण्यासाठी थांबलं, की पुन्हा पुन्हा नवी चिकटत होती. जो तो वारंवार स्वत:चे पाय न्याहाळीत होता, पण वसंतराव पेंढारकरांच्या मानेला आणि मुकुंद गोंधळेकरच्या मांडीला कानटे लागलेली पाहिल्यावर मग मात्र लक्षात येईना, की ही कानटे मानेपर्यंत कशी गेली? बहुतेकांना कानटे लागली. मला मात्र अजीबात लागले नाही. तेव्हा मी गर्जून निर्वाळा दिला, की फक्त पापी माणसांनाच कानटे लागतात! पण घात झाला. थोडयाच वेळात मला एकदम तीन कानटांनी पकडले! तेव्हा मग मी जाहीर केले, की पुण्यवान माणसांनाही लागतात हो!

आता जोराचा वारा वाहू लागला. हे अरण्य कराकरा लवत होतं. ओढे गर्जत होते. सारं रान धुंद झालं होतं. आम्ही डोंगर चढत होतो अन् उतरत होतो. घनदाट झाडींतून प्रचंड पाणलोट वाहत येत. ते दिसत फार रम्य-भीषण. गर्द हिरव्या गुहेतून ते बाहेर येत अन् गर्द हिरव्या गुहेत घुसून अदृश्य होत. आम्ही चाललो होतो तिला ‘ वाट ’ म्हणायचं कारण आम्ही केशवराव मानांच्या मागोमाग चाललो होतो. ह्या अरण्यात अजगर भयंकर आहेत. असं वाटे, की गवतांत लपलेल्या एखाद्या अजगरानं विळखा घातला तर? कुठंही पावलं पडताहेत. एखाद्या नागाच्या वेटोळयावर पाऊल पडलं तर? झाडीत लपलेला एखादा गवा बिथरून घुसफुसत अंगावर आला तर? दीड महिन्यापूर्वी ह्याच बाजूच्या रानात एका शेतकऱ्याला एका गव्याने मुसंडी मारून फाडलं होतं. वाघ, चित्ते तर नेहमीचेच. आमच्यापाशी हत्यारेही नव्हती. सारा भरवसा केशवराव मान्यांच्या बंदुकीवर होता. पण हे भयंकर किर्र्रर काळोखी अरण्य आम्ही ओलांडलं. कानटाशिवाय आम्हाला कसलाही त्रास झाला नाही. आमच्या आरोळयांनी आणि मोठमोठयानं बोलण्यानं सारं रान गजबजून जात होतं. झुडपं, रानवेली, खाचखळगे-धबधबे, धुके आणि ओढे यांच्यातून वाट काढताना आमचा वेग अतिशय कमी पडत होता. अशी ईर्ष्या होती, की पावनखिंडीत सायंकाळी साडेचारपर्यंत पोहोचायचेच, पण अजून आम्ही पांढरेपाणी या गावापर्यंतही पोहोचलेलो नव्हतो. अजून पांढरे पाणी तीन मैल दूर होतं. तेथून पुढं पावनखिंड अडीच मैल आणखी दूर! अन् वाजले होते दुपारचे साडेतीन! मैलोमैल चिखल आणि जंगल तुडवत आलो होतो. वाटेत ओढे किती भेटले, त्याची मोजणी करायचं मी पुढं सोडूनच दिलं. असा आचरटासारखा पाऊस आणि त्याच्या जोडीला वादळी वारा मी कधीही पाहिला नव्हता.

आम्हाला भेटलेल्या अरण्यापेक्षा कितीतरी पटीने विस्तीर्ण अरण्य पूर्वी इथं होतं, पण कोळशाच्या धंदेवाल्यांनी आणि खेडुतांनी साफ फन्ना मांडला आहे. आहे हेही

यापुढ उरेल असे वाटत नाही.

आम्ही दिवसा पावनखिंडीकडे चाललो होतो, तरी ही आमची गती. महाराज, बाजीप्रभू आणि त्यांचे सहाशे मावळे ह्याच भयंकर वाटेने गेले, ते कसे गेले असतील ? त्यांच्या पाठीवर शत्रू पाठलाग करीत येत होता. वेळ रात्रीची. आम्हाला येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याच्या वेळी मला बाजीप्रभूंची आठवण होत होती. ते पन्हाळ्यावरून निघाले तेव्हा वाघांच्या डरकाळ्या उठत होत्या असा उल्लेख आहे. चिखल, पाऊस आणि वादळ असल्याचीही नोंद आहे. रात्रीच्या घोर अंधारातून हे जंगल, ओढे आणि चिखल कसा पार केला असेल त्यांनी ? शत्रू पाठीवर असल्याने त्यांच्या जिवाची केवढी उलघाल झाली असेल ?

मला जो तो विचारत होता, ते तुमचं पांढरंपाणी अजून किती दूर आहे ? मी दुपारपासून सारखं, 'तीन मैल दूर आहे !' असं म्हणत होतो ! पावणेपाच वाजायला आले तरी पांढरं पाणी आलं नव्हतं. आता सर्वांचा माझ्यावरचा विश्वास उडाला होता. बापूसाहेब गणपुले तर खटयाळपणे हसून म्हणाले,

"तुम्ही आम्हाला पांढऱ्या पाण्यावर नेताय, की काळ्या पाण्यावर नेताय ?"

अखेर आम्ही पांढऱ्या पाण्यानजीकच्या टेकडावर येऊन पोहोचलो. झाडांच्या फांद्यांतून पांढऱ्या पाण्यातली झोपडी–खोपटी दिसू लागली. बाजीप्रभूंना सिद्दी मसूदच्या टोळ्यांनी प्रथम गाठलं याच पांढऱ्या पाण्यापाशी. पहिली चकमक इथेच झडली. आनंदाच्या भरात सर्वजण उड्या टाकीत धावत निघाले. त्यांत अनेकजण गुडघा गुडघा चिखलात पडले. अहो, कानांत सांगतो तुमच्या, हे प्रसिद्ध साहित्यिक गो. नी. ऊर्फ अप्पासाहेब दांडेकरही पडले ! दाढीसकट चिखलाने नखशिखांत भरले ! अन् मग राम डिमळेनं त्यांना ओढ्यात उभे करून धुऊन काढले. पडलो नाही कुठंही फक्त मी. रमेश जुन्नरकर एके ठायी असा पडला की बस्स् ! तेही दृश्य प्रेक्षणीयच ! रमेश जुन्नरकर, राम डिमळे, गुळवणी व सुधाकर देशपांडे यांनी हा संपूर्ण प्रवास अनवाणी केला. आज आम्ही एकूण तेवीस मैल असे चाललो होतो.

आम्ही पांढऱ्या पाण्यात पोहचलो. हे गाव अगदी छोटंसं आहे. गावात हेंगिष्टे नावाचे एक अतिशय अगत्यशील गृहस्थ होते. त्यांनी आम्हाला खूपच मदत केली. शाळेला सुटी होती. आम्ही शाळेत मुक्काम ठोकला. आज पहाटे ५।।। वाजल्यापासून आम्ही सतत अकरा तास धो धो पावसात भिजत होतो. आम्ही शेकोटी पेटवली. कपडे वाळत घातले. जवळच एक भला मोठा ओढा वाहत होता. त्या ओढ्यावर जाऊन आमचे बूट धुऊन, विसळून आणले.

खाणं-पिणं झालं. गावकरी मंडळीही जमा झाली. आज आषाढ वद्य प्रतिपदा होती. बाजीप्रभूंची तीनशेपाचवी पुण्यतिथी आम्ही तिथं साजरी केली. मु. गो. गुळवणी यांच्या अध्यक्षतेखाली अप्पासाहेबांचं आणि नंतर माझं भाषण झालं. सायंकाळचे सात वाजले होते. याच सुमारास तीनशेपाच वर्षांपूर्वी पांढऱ्या पाण्यापासून

अडीच मैलांवर असलेल्या घोडखिंडीत बाजीप्रभू झुंजत होते. महाराज विशाळगडावर चढत होते.

रात्री झोपेतही बाजीप्रभूंच्या वाटेवर आम्ही घेतलेले अनुभव पुन्हा डोळ्यांपुढून सरकत होते. रात्री दोनच्या सुमारास मी जागा झालो. बाहेर पाऊस आणि वारा भयंकर थैमान घालीत होता. मी दार उघडून बाहेर आलो. निसर्गाचं तें संतप्त रूप बघण्यासारखं असूनही बघवत नव्हतं. आभाळातून घागरी सांडत होत्या. वाऱ्याचा आवाज छातीत धडकी भरवीत होता. झाडेझुडे गदगदा हलत असलेली दिसत नव्हती, पण जाणवत होती. जवळचा ओढा रोरावत होता. हजारो बेडकं तालात ओरडत होती. रातकिडयांनी कर्कश्श सूर धरला होता. अंधार दाट दाट होता.

—अशाच मध्यरात्री महाराजांना घेऊन मावळे पालखी पळवीत होते. बाजीप्रभू धावत होते. मागोमाग शत्रू पाठलागावर होता. मावळे पळतच होते. चिखलात पावलं चबुक् चुबुक् वाजत होती. अजून विशाळगड पंधरा मैल दूर होता......... ते इतिहासाचं अग्निपृष्ठ माझ्या डोळ्यांपुढून सरकत होतं. मी खांबाला टेकून उभा होतो. समोरचं तांडव पाहात होतो. माझ्या अंतश्चक्षूंपुढून पालखी धावत होती. बाजीप्रभूंची ती दिंडी धावत होती.

किती तरी वेळ मी ते निसर्गाचं उग्र रूप पाहत होतो. ते रौद्र संगीत ऐकत होतो. तीनशेपाच वर्षांच्या दाट धुक्यातून चाललेली ती महाराजांची धावती पालखी निरखीत होतो.

पहाटे उठलो. आता जायचं होतं खुद्द पावनखिंडीत. वाटाडचे दोन घेतले होते. पुण्याहून वासुदेवराव भिडे यांच्याबरोबर आलेल्या सातजणांच्या तुकडीला आधी बरोबर घेऊन सहा वाजता मी खिंडीकडे निघालो. एक वाटाडचा बरोबर घेतला. अप्पासाहेब दुसऱ्या तुकडीसह मागोमाग येत होते.

आमची तुकडी वाटाडचामागोमाग जंगलातून चालू लागली. वासुदेवराव भिडे आणि त्यांचे हे सात सौंगडी—विलक्षण काटक आणि उत्साही. मी त्यांना नेहमी संबोधतो 'सेव्हन मॅग्निफिसंट' म्हणून. ही मंडळी फक्त पावनखिंडीपर्यंतच येणार होती. तेथून ती परत मलकापूरला जाऊन पुण्याला जाणार होती. त्यांना रजा नव्हत्या. बाकीचे आम्ही खिंडीतून पुढे विशाळगडला जाणार होतो.

ओरडत, गर्जत आम्ही पावनखिंडीकडे अक्षरश: धावत होतो. किर्रर्र जंगल लागलं आणि आमची गती आपोआप रोखली गेली. दगडाची फरसबंद वाट जंगलात मधून-मधून दिसत होती. ही घोडखिंडीची शिवकालीन वाट. याच वाटेवरून खिंडीकडे बाजी व महाराज धावले. ही फरसबंदी आता जागोजाग जंगलाने बुजली आहे. ह्या जंगलातले ओढे भयंकरच आहेत. धुक्याने सारे जंगल गुरफटून टाकले होते. कमरे-



**अर्घ्य द्यावा तद्‌वत्.... विलोभनीय पण तितकाच भयप्रद....**

इतक्या भरधाव ओढ्यातून आम्ही चाललो होतो. मला जरा संशय आला. मी वाटाड्याला म्हणालो,

"गड्या, खिंडीची वाट ही नसावी ! जरा खालच्या अंगानी चल !"

गडी हसला. म्हणाला,

"म्या बरोबर नेतो खिंडीत. या माझ्या मागनं असं न्याहार. वाट हीच हाये !"

आम्ही चालत होतो. घनदाट अरण्यातून आणि कमरेइतक्या पाण्यातून आम्ही चाललो होतो. धुक्याने दिशा समजत नव्हत्या. दीड तास चाललो ! खिंडीचा पत्ता नव्हता ! वाटाड्या आता मात्र गोंधळला होता. भयंकर दऱ्या ओलांडीत आम्ही चाललो होतो. अखेर एका खोल खोल कड्याच्या टोकावर आलो. धुकं दाट होतं. अर्घ्य द्यावा तद्वत् एक मोठा थोरला धबधबा खाली खोल दरीत कोसळत होता. ते

दृश्य विलोभनीय आणि भयप्रद होतं – पण खिंड कुठं राहिली ? वाटाड्या रस्ता चुकला होता ! भलतीकडेच आम्ही आलो होतो. वाटाड्याने कसासाच चेहरा करून कबुली दिली.

" धनी, म्या वाट चुकलो ! ह्या पावसानं आन धुक्यानं वाट भुलली. "

तो रानात आडवा-तिडवा घुसून खिंडीचा मागोवा शोधू लागला. त्याला वाट सुधारेना. आता आला का घोटाळा ! कानटे फार. ती पटापट चिकटून रक्त शोषू लागली. वाटाड्या बावरला. मी त्याला म्हटलं,

" गड्या, तुला गजापूर अन् विशाळगडचा मोहरा उमगतोय का ? कुणीकडे आहे गड ? "

" जी व्हय ! ह्यो ह्या अंगाला गड हाये ! "

" मग चल, गडाचा रस्ता काढ शोधून ! "

आणि मग धावपळ करून ती न्याहार रानवाट त्याला गवसली. मग म्हटलं,

" चल आता, फीर माघारी अन् घोडेमाळाचा रस्ता धर. घोडेमाळ उमगेल का तुला ? "


" जी व्हय ! ही वाट अशी घोडेमाळाकडं जाती. "

आम्ही पुन्हा रान तुडवीत घोडेमाळाकडे निघालो. आम्ही घोडेमाळावर आलो आणि अप्पासाहेबांच्या टोळीतील लोकांनी घातलेल्या शिळा आम्हाला ऐकू येऊ लागल्या. आम्हीही आरोळ्या आणि शिळा सुरू केल्या. अप्पासाहेब आधीच खिंडीच्या तोंडावर येऊन पोहोचले होते. ते काळजी करीत होते. आम्ही आवाजाच्या रोखाने धावत सुटलो अन् अखेर खिंड गवसली ! भर पावसात गर्द झाडीने गुरफटलेली, रोरावत्या लोंढ्याने घुमत असलेली, धुक्याने धुंदावलेली ती खिंड दिसली. अप्पासाहेब अन् सारेजण आम्हाला पाहताच एकदम ओरडले अन् मग जयजयकारांनी ती खिंड दुमदुमून गेली. आम्ही झुडपांची पाने, शेंडे तोडले आणि त्या खिंडीत उधळीत ओरडलो,

" हर हर हर हर महाऽऽदेव ! "

• • •

[ ब. मो. पुरंदरे यांच्या वरील लेखाचा उत्तरार्ध– ' किल्ले विशाळगड– ' पुढील अंकात. ]



# नेहरू आणि सुभाष

## दोन थोर व्यक्तिमत्त्वांचा संघर्ष

वा. दा. रानडे

नेहरू आणि सुभाष, भारतीय जनतेचे दोघेही अत्यंत आवडते व प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे नेते. दोघेही समाजवादी विचाराचे. हे दोन थोर नेते एकत्र का आले नाहीत ? त्यांची एकजूट झाली असती, तर डाव्यांच्या चळवळीला आणि एकंदर भारतीय राजकारणालाच काही निराळी दिशा लागली असती का ? भारताच्या राजकारणातील हा एक महत्त्वाचा प्रश्न असून त्याचा सविस्तर व सखोल विचार आतापर्यंत फारसा झालेला नाही. नेताजी सुभाषचंद्र बोस ऑगस्ट १९४५ मध्ये विमान-अपघातात निधन पावले, त्या घटनेला या महिन्यात वीस वर्षे होत आहेत. तसेच पंधरा ऑगस्टला आपल्या स्वातंत्र्यास अठरा वर्षे पुरी होत आहेत. त्या निमित्ताने या प्रश्नाचे काहीसे सविस्तर विवेचन करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. नेहरू किंवा सुभाष यांपैकी कोणाचाही मी अंधभक्त नसून, राजकीय अभ्यासकांच्या भूमिकेवरून वस्तुनिष्ठ दृष्टीनेच हे विवेचन मी करीत आहे.

नेहरू आणि सुभाष दोघेही व्यापक अर्थाने समाजवादी विचाराचे असले, तरी धोरण आणि कार्यक्रमाबाबत त्यांच्यात मतभेद होते. त्यांचा स्वभाव व कार्यपद्धतीही भिन्न होती. असे असले तरी व्यापक धोरण व कार्यक्रमाच्या पायावर त्यांनी एकत्र यावयास हरकत नव्हती. तसे ते का येऊ शकले नाहीत, याचा विचार करताना या दोन थोर नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कशी होत गेली, त्यांच्यावर विशेष प्रभावी संस्कार कोणाचे झाले, हेही लक्षात घेतले पाहिजे.

नेहरू आणि सुभाषबाबू दोघांचेही वडील वकील होते. वकिलीच्या व्यवसायात दोघांनीही प्रतिष्ठा व मानाचे स्थान मिळविले होते; पण जानकीनाथांपेक्षा (सुभाषबाबूंचे वडील) मोतीलालजींची आर्थिक परिस्थिती केव्हाही अधिक चांगली होती. मोतीलालांचे कुटुंब छोटे. जवाहर व त्यांच्या दोन बहिणी एवढीच मुले. जवाहर अकरा वर्षांचा होईपर्यंत घरात दुसरे मूल नव्हते. त्यामुळे त्याचे बरेच लाड झाले. या उलट जानकीनाथांचे कुटुंब मोठे. सुभाष हा त्यांचा सहावा मुलगा व नववे मूल. वडील सर्वांत छोट्या मुलाशी लडिवाळपणाने वागत, पण बाकीच्या मुलांशी त्यांची वागणूक अलिप्तपणाची असे. सुभाषला आईवडील दोघांचाही धाक वाटे. मोठ्या कुटुंबात प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष दिले जात नाही. सुभाषबाबूंना लहानपणी

[ पृष्ठ ५५ वर चालू ]



# तिळ

आनंद रामचंद्र फुले

प्रमोद अभ्यंकरचा मी विचार करू लागतो, तेव्हा मला ' रिडर्स डायजेस्ट ' मधल्या ' मोस्ट अनफरगेटेबल कॅरॅक्टर आॅय हॅव एव्हर मेट् ' ह्या कोटीतल्या व्यक्तिचित्रणांची आठवण येते. पम्याचं व्यक्तित्व एका अर्थानं असंच होतं.

पम्या आणि मी तसं पाहिलं तर कमालीच्या परस्परविरोधी स्वभावाच्या व्यक्ती, पण गोष्ट अशी की आम्ही तब्बल साडेचार वर्षं रूमपार्टनर्स म्हणून एकत्र राहिलो. अनेक वर्षांच्या सहवासानं निर्माण होणाऱ्या जवळीकीनं बांधल्या गेलो.

पम्या मेडिकलला आला मुंबईहून तर मी अमरावतीहून ! योगायोगानंच आम्हाला रूमपार्टनर्स बनविलं. लॉटस् काढण्यात आल्यानं होस्टेल अकोमोडेशनच्याबाबतीत तक्रारीला जागा नसते. फर्स्ट एम्. बी. बी. एस्. नंतर आम्ही रेक्टरला भेटून एक रूम मिळवली. एव्हाना माझी एक हुशार विद्यार्थी म्हणून व पम्याची काही वेगळ्याच कारणांनी पोच वाढली असल्यामुळं व आमची जोडगोळी कॉलेजच्या परिसरात सर्वांना ठाऊक असल्यामुळं आम्हाला रूम मिळावयास फारशी अडचण आली नाही. सेकंड एम्. बी. बी. एस्. नंतर आम्हाला सिंगल कॉटची रूम मिळत असताना आम्ही डबल कॉटस्ची रूम घेतली होती.

पम्याच्या एका प्रकरणाबद्दल जेव्हा इतरेजनात "शुक सांगतात मुनिजन हो–" अशी कुजबुज असायची तेव्हा प्रत्यक्षात "इतिश्री रेवाखंडे अध्यायः समाप्तः" झालेले असायचे.

*

पम्या तसा एका विद्यार्थ्यांच्या पंढरीचा वारकरी होता. एका मतप्रणालीचा अनुचर होता. त्याचा पंथ काऊबॉय पॅन्टस्टेडी वापरणाऱ्यांचा. त्याचे विचार 'कॉफी हाउस' कल्चरचे. इतकंच की त्या 'हाय् हाय्' कल्चरचा पम्या फॅशनेबल् अभिसार करणारा नसून त्याला पटलेलं, मानवलेलं ते वातावरण होतं.

पम्याला शैक्षणिक पूर्वरम्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी म्हणून जरी मानता आले नसते, तरीही तो बुद्धिवान होता, तल्लख होता. पण सर्व लहान मोठ्या परीक्षांची दखल पम्यानं शेवटच्या एक दोन महिन्यांत व्यवस्थितपणं सांभाळून तडीपार होण्यापत घेतली. इंटरला जो काय थोडा नेट धरून त्यानं फर्स्ट क्लास मिळविला तेवढाच. स्कॉलर म्हणून काही पराक्रम करायची पम्याला हौस नव्हती की शिक्षणेतर कार्यक्रमात निदान मिरवायची. "वडील चीफ सेक्रेटरी असल्यामुळं मला वशिल्याची कोणतीही जागा मिळू शकते. शिवाय मला प्रॅक्टिसच करायची आहे. तेव्हा अभ्यासाचा नसता त्रास घ्या कशाला ?" या पार्श्वभूमीवर पम्याची कुठंच गती नव्हती. तसा तो सुखासीन होता. उगाच नसती दगदग त्याच्या मनोवृत्तीला मानवत नव्हती. पम्या ना हुशार विद्यार्थी ना खेळाडू, ना इतर कुठल्याही क्षेत्रात गती. तरीही पम्याचा बोलबाला साऱ्या कॉलेजात होता, कोणाही हुशार विद्यार्थी किंवा खेळाडूंपेक्षा जास्तच होता. पम्याविषयी झाडून साऱ्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांना एक प्रकारचं आकर्षण होतं; कुतूहल होतं.

पम्या तसा मोठा नशीबवान होता. पम्या फर्स्ट इंटरला आला तेव्हाच त्याच्या मेहुण्यांना सरकारनं घटनाकायद्यांचा उच्च अभ्यास करण्यासाठी अमेरिकेला तब्बल चार वर्षांसाठी पाठविलं. ते सहकुटुंब गेले. त्यांची फियाट पम्याला मिळाली.

पम्या दिसायला विलक्षण देखणा होता. त्याच्या बांध्याला स्त्रैण नाजूकपणा ठाऊक नव्हता, की रानगट आडदांडपणा. पम्याला कपड्यांची विलक्षण पोच होती. रूमच्या बाहेर नुसत्या चहासाठी रात्री बाराला जरी निघायचं म्हटलं तरी त्याच्या जाम्यानिम्यात निदान पंधरा मिनिटं तरी मोडत. साध्या हवाई चपलांचीच गोष्ट. त्याचा उपयोग बायरूम वगैरेला जाण्यापुरताच होई; पण त्यांचा तळभाग पम्या दररोज लक्सनं पांढरा स्वच्छ करून ठेवीत असे.

पम्याचं इंग्रजी वडं फर्ड होतं. अन् मॅनर्स अगदी अॅज पर टेक्स्ट बुक ! ह्यामुळं पम्या 'अंग्रेज' ठरला होता.

पम्याविषयीचं जे आकर्षण इतरांना होतं, ते मुख्यत्वेकरून मुलींच्या बाबतीत–संदर्भात ! तरुण कितीही देखणा व गुणवत्तेचा असो. मुलींच्या बाबतीत जर त्याच्याजवळ एक प्रकारची धडाडी वृत्ती नसेल, तर तो मुलींच्या सहवासाच्या बाबतीत खंकच राहतो. ह्या उलट ना गुण ना देखणेपणा, असे कित्येक तरुण ह्या धडाडीच्या भांडवलावर लेडीज मॅन किंवा लेडी किलर म्हणून गाजतात. पम्याजवळचं हे सर्वात मोठं भांडवल होतं.

पम्या ह्या बाबतीत साऱ्यांपेक्षा आघाडीवर होता. त्याच्या नावाबरोबर मीरा कर्णिक, अमिता वधवानी, डॉली डबोईवाला, रूपा दीपचंदानी, उर्मिला मिश्रा वगैरे अनेक नावं येत होती. पम्याचं 'पात्र' दर दोन–चार महिन्यांआड बदलत होतं. पम्याच्या एका प्रकरणाबद्दल जेव्हा इतरांत 'शुक सांगतात मुनिजन हो–' अशी कुजबुज असायची, तेव्हा प्रत्यक्षात 'इतिश्री रेवाखंडे......अध्याय: समाप्त:' झालेलं असायचं. पम्याची पात्रं अगदी कुठल्याही शाळा–कॉलेजांत असणं संभाव्य होतं.

पम्याचा ह्या संदर्भातला आणखी एक विशेष होता. असे महाभाग भयंकर वाचीवीर असतात–एक हात काकडी तर नऊ हात बी ! पम्या मात्र सहसा बोलत नसे. माझ्याशीसुद्धा नाही. तेव्हा पम्याच्या पत्राला पम्याकडून किंवा दुसऱ्याकडून बदनामीचा किंवा ब्लॅक मेलिंगचा यत्किंचितही धोका नव्हता.

मला सतत झुलविणारा प्रश्न होता, की पम्याची अशी कीर्ती साऱ्यांना ठाऊक असताना, पम्याच्या जीवनाशी संलग्न होण्याची फाजील महत्त्वाकांक्षा न बाळगणारी अशी समंजस पात्रं पम्याला आपसुक मिळतात तरी कशी ?पम्याच्या भाषेतले–गेम पार्टनर्स ! पम्या अशा प्रश्नावर मोठा गर्भित हसायचा. "बर्डस् ऑफ सेम फेदर्स...समान शीलेषु व्यसनेषु..." असं काही पुटपुटायचा !

मात्र तेवढंच खरं, की पम्याचं एकही पात्रं रूमवर पम्याकडं वा पम्याच्या पश्चात रूमपार्टनर म्हणून माझ्याकडं मुसमुसत आलं नव्हतं. एकही नाही. एकदाही नाही.

पम्या कॉलेजच्या व कॉफी–हाउसच्या परिसरात प्रिन्स, किंग, लेडी किलर वगैरे नावांनी गाजत होता. बोरीस (श्रीकान्त नायक : संदर्भ : पॅस्टरनॅक), चॅट (श्रीनिवास चॅटर्जी), चुक्की (विद्याधर पिंपळखुटे), लल्ला (शरद भोपे), बंटी (प्रभू ताम्हणे), लच्छ्या (विजय घुर्डे), एमिल (विनायक ब्राह्मणकर) वगैरेंच्या वर्तुळात पम्याचं महत्त्व काही औरच होतं. पम्याच्या एका शब्दावर कुणालाही ब्ल्यू फिल्मस् पाहता येत होत्या. लेन्झ, टोरसो, ल्युर, फ्रॉलीकस्, पेन्स ओन्ली वगैरे मासिकं पाहता येत होती.

पम्याच्या व माझ्या मनोवृत्तीत जमीनअस्मानाचा फरक होता. मी मध्यमवर्गीयवर्गाचं बाळकडू प्यालो होतो. नेटानं अभ्यास–चांगलं यश–चांगली नोकरी ! ! त्यामुळं माझे–पम्याचे मार्ग वेगवेगळे होते. आमची विश्वे एकाच कॉलेजात–रूममध्ये राहून अलग अलग होती. मित्र वेगवेगळे होते. तरीही आम्ही खूप जवळ आलो

होतो. पम्या तसा समंजस होता. सारी थेरं पम्यानं बाहेर केली–निस्तरली होती. आमची रूम पम्याच्या ह्या संदर्भात अलिप्त राहिली होती. म्हणूनच आमची दोस्ती कायम होती.

पम्याच्या मैत्रीची लाज मला कधीच वाटली नाही. हेही तेवढंच खरं, की पम्याच्या ह्या अफलातून जीवनाबद्दल मला कधीही आकर्षण वाटलं नाही.

ह्या सर्व पार्श्वभूमीवरही पम्याचा विचार फक्त एका दृष्टिकोनातून मी कधीही करू शकलो नसतो.

पम्याचं स्थळ मी केव्हाही, कुणालाही सूचवू शकलो नसतो, की कुणी मला ह्या बाबतीत विचारलं असतं, तर मी कधीही कोणालाही उत्तेजन दिलं नसतं. विचारणारी व्यक्ती ओळखीची वा नात्यातली असती, तर हा विचार मनातून काढून टाकावयाचा सल्ला दिला असता. अगदी निश्चितपणं. ह्यात अगदी तिळमात्र संदेह नव्हता. पम्याचा विचार ह्या दृष्टिकोनातून होणं ही अशक्य कोटीतील गोष्ट होती. पम्याच्या मैत्रीची लाज मला कधीही वाटली नव्हती, वाटत नव्हती, पण म्हणून ह्या दोन गोष्टींची गल्लत करता येत नव्हती. होऊ शकत नव्हती.

नियतीच्या मनात मात्र वेगळंच होतं !

पम्याचा विचार त्याच दृष्टिकोनातून मला करायचा होता. करणं अपरिहार्य होतं. टाळता न येणारं होतं.

नियतीनंच माझी क्रूर थट्टा केली होती !

पम्याच्या विचार मला माझ्या सख्ख्या बहिणीच्या संदर्भात करावयाची पाळी आली होती. मृणालच्या बाबतीत. बाबांच्या पत्रांना तसं उत्तर द्यायचं होतं. तसं म्हणजे मला अमुक वेळी रजा मिळू शकते, ह्या अर्थाचं–तसा मुहूर्त निघणार होता.

गोष्ट ह्या थरावर इतकी पुढं गेली होती.

मी माझ्या टेंटमध्ये कंदिलाच्या प्रकाशात हातात तीन पत्रं घेऊन बसलो आहे. एक बाबांचं – रजा केव्हा मिळू शकते ह्याची विचारणा करणारं. एक मृणालचं – तिनं नाशिकला मावशीकडं गेल्याची हकीकत कळविली होती. तिथंच पम्या आपल्या आत्याकडं सहज म्हणून आला होता. पम्याच्या आत्याचा व माझ्या मावशीचा ब्लॉक अगदी एकाच बिल्डिंगमध्ये समोरासमोर होता. पम्याच्या आत्याला बेबी – म्हणजे मृणाल – पसंत पडली, म्हणून त्यांनी मावशींना विचारलं होतं. मग ही गोष्ट घरी पोचली. बाबा आणि आई नाशिकला जाऊन आले होते. पम्याच्या वडिलांना बाबांनी पत्र लिहून पुढची बोलणी सुरू केली होती.

पम्याचं पत्र होतं – " जया, घरनं साऱ्या गोष्टी तुला कळल्या असतीलच. एक महिन्यापूर्वी मी आत्याकडं येण्याआधी असं कधी स्वप्नातही घडू शकेल, ह्यावर माझा विश्वास बसला नसता. गोष्टी विलक्षण वेगानं अनपेक्षित वळणं घेत गेल्या. मला सप्तश्रृंगीला जायचं होतं. मृणालनी सप्तश्रृंगी पाह्यली नव्हती. माझ्याबरोबर

जाण्याची कल्पना तुझ्या मावशीचीच. पण मृणालचा नकार मला अनपेक्षित होता. मला नकार मिळू शकतो ह्यावर माझा स्वत:चाच विश्वास बसेना. ज्या वेळी ही लग्नाची बोलणी घडवून आणण्यासाठी अनेक घटना वेगानं धावत होत्या, त्यावेळी मृणाल तुझी बहीण असल्याचं मला किती तरी उशिरा कळालं.

मृणाल माझ्या नजरेत भरली ती तिच्या नकाराच्या मांडवलावर ! म्हणूनच आत्यानी विचारल्यावर मी माझी पसंती सांगितली. नंतर कळलं की मृणाल तुझी बहीण आहे. पण एव्हाना फार उशीर झाला होता. गोष्टी पुढच्या थरावर पोहोचल्या होत्या. अक्का – विभा – विज्जलाला मृणाल आवडली होती. बाबा-आईला पसंत पडली होती.

माझी पसंती सर्वांनी जमेला धरल्यागतं आहे. म्हणूनच तुला पत्र लिहीत आहे.

जया, माझं जीवन तुझ्यासमोर बारीकसारीक तपशिलासह उभं आहे. तुझ्या घरचे सारे लोक त्या दृष्टीनं अंधारात आहेत. जया, केवळ तुझ्या मतावर मी तुझ्या वडिलांना पत्र लिहिणार आहे. तुझ्या मतावर त्या पत्राचं स्वरूप अवलंबून आहे. पत्र दे ! ”

माझी मात्र मोठी विचित्र परिस्थिती झाली होती. वडिलांच्या पत्रात सुटी लवकरात लवकर घेण्याचा आग्रह, तर बेबीचं पत्र लग्नाच्या भावनेनं हुरळून गेलेलं. तिला पडणाऱ्या स्वप्नांची कल्पना पत्रात प्रतिबिंबित झालेल्या तिच्या मनोवृत्तीवरून करता येत होती. तर पम्याचं हे असं पत्र.

पम्याच्या घरच्या लोकांना मी ओळखत होतो. लग्न झालेल्या अक्का – एच्. एस्. झालेली विभा – बी. एस्सी. होमसायन्सच्या परीक्षेत लहान मुलाच्या टिफीनसाठी पुरणाच्या पोळीची पाकक्रिया लिहिणारी व व्हायव्हामध्ये, ‘मी माझ्या मुलांच्या टिफीनमध्ये पुरणाची पोळी का देऊ शकणार नाही,’ असं खणकावून सांगणारी विज्जला, ह्या साऱ्यांना मी ओळखत होतो. आय्. सी. एस्. होऊनदेखील ‘पपा,’ ‘डॅडी’ न झालेल्या पम्याच्या बाबांचा मनमोकळा, अगदी सहजगत्या वय विसरून दुसऱ्याशी समरस होणारा स्वभाव मला ठाऊक होता. हे सारं ठीक होतं, पण पम्याचं उघडं चारित्र्य ! इथंच माझं उत्तर गुदमरत होतं !

हुरळून गेलेल्या हळव्या बेबीचं मन मोडता येत नव्हतं. वडिलांना उत्तर लिहिता येत नव्हतं. माघार न घेण्याप्रत गोष्टी पुढं सरकल्या होत्या.

पत्राचं उत्तर तर द्यावंच लागणार होतं. माझं उत्तर न जाणं म्हणजे पम्याचा नकार ठरल्यागत होता.

●

“ आज कितीतरी दिवसांनी मी चौपाटीवर येतो आहे ! ”

आम्ही दोघं चौपाटीच्या वाळूत बसलो. तसा पम्या म्हणाला,

“ आश्चर्य आहे. मुंबईत राहूनदेखील चौपाटीवर यायला तुला जमत नाही ?”

“ तसं नाही जया ! पण यांवसंच वाटत नाही ! मृणाल बऱ्याचदा आग्रहानं

मला घेऊन येते, पण इथं आलं, की मन विलक्षण अस्वस्थ होतं. गुदमरू लागतं. मी सारखा घरी जाण्यासाठी चुळबुळू लागतो. बिचारी मृणाल हिरमुसली होते. तिला समुद्राचं विलक्षण वेड आहे. साधारणपणं प्रत्येकालाच असतं. समुद्राची भरती, काठावर सरसरत चढणाऱ्या लाटा पाहून मन बहरून येतं. कितीही उदास–दुःखी जीव चैतन्यानं मोहरून येतो. तेच संध्याकाळी ओहोटीच्या वेळी माणसाचं मन विपादानं–विषण्णतेनं व्यथित होतं. सारंगीच्या माखामुलतानी आलापाची पुटं मनावर चढू पाहतात. मृणालला माझं दुःख कळत नाही. तसं माझं जीवन मी आडपडदा न ठेवता तिला सांगितलं, पण तिच्या ते गावीच नाही. तिनं ते मनावरच घेतलं नाही. तिला दुखवायचं नाही म्हणून मी चौपाटीवर येतो, पण फार वेळ मला बसता येत नाही. माझं चुळबुळणं तिच्या लक्षात येतं. मग तिच्या मनोवृत्तीला आलेलं उत्साहाचं उधाण–भरतं पार ओसरून जातं. ती हिरमुली होते. माझ्यापासून लपविण्याचा प्रयत्न करते. "चला आता, कंटाळा आला," असं म्हणत माझा मार्ग मोकळा करते. मला ते जाणवतं. वाटतं, म्हणावं तिला, "बसू या. एवढी कोणती घाई आहे?" पण तसं होत नाही. मी मुकाट्यानं उठतो. पाठोपाठ तीही."

"हे स्मशान पाहिले का? त्याजवळची ती भिंत?" मृणाल म्हणते, की जरा त्या भिंतीकडच्या बाजूला निवान्त ठिकाणी बसू या. इथं ह्या भेळवाल्याच्या पेट्रोमॅक्सच्या भणभण प्रकाशात बरं वाटत नाही. तसा मी तिला म्हणतो, की असू दे. मग ती माझ्याबरोबर बसते. वाळूच्या थरावर बोटांनी रेघोट्या ओढत."

"मी समुद्राकडे तोंड करून बसलेला असतो. क्षणापूर्वीचा हिरमोड विसरून मृणाल रंगात येऊन मला इकडच्या तिकडच्या गप्पा सांगत असते. एव्हाना माझ्या पाठीला आठवणीचे डोळे फुटलेले असतात–"

"आयुष्यात पहिल्यांदा अवन्तिका सारंगपाणीला घेऊन मी या चौपाटीवर आलो होतो. त्या स्मशानालगतच्या भिंतीलगतच्या निवान्तात बसलो होतो, त्यावेळी सहा-सात प्रेतं धडधडत होती. चितेच्या त्या भकभकत्या उजेडात ......"

"शिवाजी पार्कच्या कोपऱ्यावर आम्ही आलो तेव्हा एक वरात जात होती. होती कोण्या अडाण्या घरची. सतरा अठरा वर्षांचा पोरसवदा नवरा व तेरा-चौदाची परकरी मुलगी. त्या दोघांच्या मनात निनादणाऱ्या उत्सुकतेची–नवथरतेची–पावित्र्याची आम्ही पायमल्ली केली होती. अपराधी भावनेनं आम्ही ती वरात पाह्यली होती–"

"एका क्षणापुरती वाटलेली ती अपराधीपणाची भावना नंतर मी आणि अवन्तिका सोईस्करपणं विसरलो–"

"तीच भावना पुनः जागली. परत एकदा. मंगळागौरीसाठी मृणाल माहेरी गेली होती. अवन्तिकादेखील माहेरी आली होती. आठवणीनं मला भेटायला आली. मला वाटलं होतं, की तिचं आता लग्न झालं आहे. मागचं सारं झालं गेलं ती विसरली असेल. स्वतःची जबाबदारी तिला ठाऊक असेल, पण नाही. त्या घटनेचा

चटका तिला लागला नाही. लागली होती चटक. म्हणून ती माझ्याकडं धावत आली. माझ्या घरी, मृणालच्या घरी, पण व्यर्थ. मृणाल माहेरी होती, पण तिच्या व्यक्तिमत्त्वाचा वारसा ठेवून गेली होती. तिच्या चांगुलपणाचा आरसा ठेवून गेली होती.–"

"मृणालच्या निरागस निष्पाप चांगुलपणानं माझ्यावर वचक बसविला होता. सारी अनुकूलता असून अवन्तिका तशीच परत गेली होती. तिला जावं लागलं होतं. माझ्यावर तिला हक्क सांगता आला नव्हता."

"लग्न होण्यापूर्वी मला माझ्या आयुष्याची कधीही लाज वाटली नव्हती. घृणा आली नव्हती, पण लग्नानंतर पहिल्यांदा मोठ्या उत्साहानं मृणालला घेऊन चौपाटी-वर आलो त्या क्षणी माझ्या मनात अपराधीपणाची भावना जागली होती. निवान्त जागी बसण्याचा तिचा निष्पाप आग्रह ऐकून मी स्वत:वर चिडलो होतो."

"जया, मी वाहवत जाणारं जीवन जगलो. त्याचं समर्थन केलं. अवन्तिकेला फिरवल्याचा पौरुषार्थ बाळगला होता, पण मी फसलो होतो. अवन्तिकेनं मला फस-विलं होतं. माझा उपयोग करून घेतला होता. माझ्या लग्नानंतर स्वतः विवाहिता असतानाही ती पुनः माझ्याकडे आली होती ! मोहाचे आमीष दाखवून पुनः फसवायला. असंच साऱ्यांच्या बाबतीत झालं. माझा पैसा लुटला गेला होता, देखणेपणा लुटला गेला होता. मला माध्यम म्हणून उपयोगात आणलं गेलं होतं. एक भ्रम दूर झाला होता. पूर्वी अभिमान वाटत होता. आता मला लाज वाटू लागली आहे..."

किती वेळ तरी पम्या आपलं मन हलकं करीत होता.

●

"नमस्कार !"

आवाजानं मी चपापलो. "कोण तुम्ही ?"

एकदम मी म्हणालो.

तारापोरवाला मत्स्यालयाच्या कॅन्टीनमध्ये अगदी उजव्या हाताच्या खिडकीलगत मी बसलो होतो. पम्या–बेबी मत्स्यालय पाहात होते. मला कंटाळा आला होता, म्हणून मी कॅन्टीनमध्ये येऊन ह्या खिडकीलगत बसलो होतो.

दुसऱ्या राउन्डच्या दहीवड्याचा आस्वाद घेत मी मजेनं वेळ घालवीत होतो. वेळ कसा जात होता, हेच कळत नव्हतं. त्याचवेळी कानी आलेल्या या आवाजानं मी चमकलो.

शशी देशमुखाच्या नमस्काराला तसं उत्तर देण्याआधीच माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले होते––

"कोण ? तुम्ही ?"

"का ? आश्चर्य वाटलं !"

"अर्थातच ! किती अनपेक्षितपणं भेटताहात तुम्ही मला ?"

" खरंच ! "

" या ! बसा ! काय घेणार ? "

" काही नको ! "

" दहीवडा सांगतो तर मग ! " असं म्हणत मी ऑर्डर दिली.

शशी इन्टरला माझ्याच वर्गात होती. सीनियर केम्ब्रिज करून आल्यामुळे तिचा वर्गात, विशेषत: इंग्रजीच्या तासाला भलताच भाव असायचा. तिचे वडील त्यावेळी मध्यप्रान्ताचे गृहमंत्री होते. कॉलेजच्या प्रांगणात कधीच कुणाची मोटार नसायची, पण शशी आल्यापासून तिची शेव्हरलेट गाडी प्रांगणातच राहू लागली. कॉलेजच्या प्रांगणात गाडी उभी न करता येण्याचा दंडक शशीसाठी लागू नव्हता.

शशी हुशार होती. शिवाय केंब्रिज होऊनदेखील कॉन्व्हेन्टच्या अर्धांग्ली वातावरणात पिवळी झालेली नव्हती. स्पष्टवक्ती म्हणून तिचा लौकीक होता. " तुमचं अभिनंदन करायला हवं ! "

" कशाबद्दल ! माझ्यासारख्या विद्यार्थ्यानं एम्. एस् व्हायचं सोडून कमिशन घेतलं म्हणून ! इमर्जन्सी संपवल्यावर एम्. एस्. होणारच आहे मी ! "

" त्याबद्दल तर होतंच. पण......जाऊ द्या ते ! "

" मलाही तुमचं अभिनंदन करायला हवं होतं ! तुमच्यासारख्या विद्यार्थिनीनं लष्करात कमिशन घेऊन स्त्री-डॉक्टरांपुढं आदर्श ठेवला आहे......"

"पुरे पुरे. अगदी स्वागतपर भाषण होतं आहे ! एवढं कौतुक करण्यासारखं त्यात काहीच नाही. उलट गेले नसते तर आमच्या घराण्याच्या परंपरेला गालबोट लागलं असतं ! "

"तुम्ही स्पष्टवक्तेपणाबद्दल ख्यातनाम आहात. तरीही एक गोष्ट तुम्ही मला अद्याप सांगितली नाही. तुम्ही माझं अभिनंदन केलं, ते मी वेगळचाच संदर्भात घेतलं, पण तुम्हाला अभिप्रेत अर्थ वेगळाच होता! "

मला थांबवीत शशी म्हणाली होती –

"अभ्यंकरांचं चारित्र्य तुमच्यापासून थोडंदेखील लपलं नसताना तुम्ही आपली बहीण त्यांना कशी दिली ? मला कळलं तेव्हा आश्चर्यानं वेड लागण्याची पाळी आली होती. ..."

शशीच्या प्रश्नानं मी अवाक झालो; पण क्षणभरच.

" तुम्ही कदाचित भाबडेपणा म्हणाल. पण......"

सारं सांगून झाल्यावर मी म्हणालो, " पण माणसाच्या चांगुलपणावर आणि त्याचा प्रभावावर माझी श्रद्धा आहे. साऱ्या गोष्टी अगदी नियतीच्या पूर्वसंकेतानुसार घडत आल्या. म्हणून मी मोडता घालू शकत नव्हतो. शिवाय मनात विचार आला, की पम्याचं चारित्र्य मला मा हीत होतं हे खरं. पण दुसऱ्या व्यक्तीच्या बाबतीत चौकशी करणार किती न् कशी ? अन् समजा, ती व्यक्ती लग्नाआधी धुतल्या

तांदळासारखी आहे म्हणून काय लग्नानंतर तिच्यात असा बदल घडू शकत नव्हता काय ? "

" माणसाच्या चांगुलपणावर व त्याच्या प्रभावावर माझी श्रद्धा आहे. मृणालच्या चांगुलपणावर व निष्पाप आयुष्यावर माझी निष्ठा होती म्हणून तिचा संसार सुखाचा होईलच असंच मला वाटत होतं. योगायोगावरही माझा असीम विश्वास आहे अन् तरीही मला सुटी मिळत असताना ती मिळत नाही हे भासवून मी मृणालच्या लग्नाला हजर राहिलो नाही. मनात सलणाऱ्या त्या भीतिपोटी पम्याचे मित्र मला हसतील म्हणून. मृणालला आपण सारं माहीत असूनही फसवीत तर नाही ना, ही शंका मनात ठाण मांडून बसली होती म्हणून. आता मी मृणालचा संसार पाहून आलो आहे. आता ती सल माझ्या मनात राहिलेली नाही. ......"

शशीच्या बोलण्यात एक गोष्ट मला कळाली. पम्यानं शशीच्या बाबतीतही तसा प्रयत्न केला होता.


"मला माफ करा ! मला वाटलं नव्हतं– तुम्ही इतक्या दूरवरचा विचार केला असेल म्हणून ! आय् टेंडर माय अॅपॉलॉजी..."

" त्यात माफी मागण्यासारखं काहीच नाही ! "

"पम्या– बेबी आता कॅन्टीनमध्ये येतील."

"असं ! पण मी आतां थांबत नाही. तुम्हाला पाहिलं म्हणून आत आले. पुनः केव्हातरी भेटू... " असं म्हणून शशी झपाटयाने निघून गेली पम्या तिथे येण्यापूर्वीच...!





प्रवासी बन्धूंनों...
आपलें सहकार्य
गाडींत लागणारी
आग
टाळूं शकेल.
निर्देशित
आगप्रतिबन्धक नियमांचें
पालन करा.
पेटती सिगरेट फेकण्यापूर्वी विझवा किंवा राखदाणीचा (ॲश् ट्रे) उपयोग करा.
डब्यांत स्टोव्ह पेटवूं नका.
आपल्या सामानांत ज्वालाग्राही पदार्थ नेऊं नका.
प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतूने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित



# सामाजिक प्राण्याची गोष्ट

व. ल. देशपांडे

घोंगावण्याचा आवाज आला. रस्त्याच्या दोन्ही डाव्या बाजू येणाऱ्या व जाणाऱ्या बाजारू माणसानं भरभरून वाहात होत्या. रस्त्याच्या कडेकडेनं नालाही वाहत होता; पण नाला कसा व्यवस्थित होता. बांधीव प्रवाहानं पुढे जात होता.

परवा रात्रीच्या पावसानं वातावरणात आणलेला कोवळेपणा अजूनही कायम होता. सकाळचे अकरा वाजत आले, तरी ऊन कोवळंच वाटत होतं. बाजारातील जमिनीवरचा फुफ्फूटा अजूनही दबूनच होता. शेडवरील पत्र्यावरची मलीनता धुऊन निघाल्याची चिन्हं अद्यापही दिसत होती. ओटयांच्या फाडचा न्हालेल्या आदिवासीसारख्या निर्मळ नि काळ्याकुळकुळीत दिसत होत्या. मागे एकदा एका दोस्तावरोबर चांगली 'रेड अॅन्ड व्हाईट' ब्रॅन्डी घेतली होती. एकच पेग–भर उन्हाळ्यात–म्हणजे वर एकशे चौदा टेंपरेचर असताना–दिवसभर उघडचा डोक्यानं

'घोड्याचे खाणे खाणार, त्याला अमेरिका देणार' ... हॅऽऽहॅ. माझे स्वतःचे विनोद, दोस्ताचे विनोद असेच फसफसलेल्या आंबट दह्यासारखे असतात. मला ओळखलंत? मीच तो सामाजिक प्राणी– Social Animal !

*

हिंडलो. असंच कोवळं वाटलं सारं. सायकलवरून खाली उतरलो नि गर्दी दिसते म्हणून घंटी वाजवीत निघालो.

समोरच्या मोठ्या वडापाशी थोडी गर्दी होती. सहज पाय उचलून पाहिलं. हाताच्या पंज्यांची चित्र झाडाच्या बुंध्याला लटकावून, रेषांचा पिंजरा उभा करून एक खुजा, आंधळा वाटणारा, चेहऱ्यावरून बावळट वाटणारा ज्योतिषी बसला होता. त्याच्यासमोर खांद्यावर उपरणं टाकलेला एक खेडूत उकिडवा बसला होता. ज्योतिषी "महाराजा" संबोधून त्याला त्याचं भविष्य सांगत होता. ज्योतिष्याच्या शेजारीच एक केळंवाला डोक्यावरली चुंबळ सारखी करीत, टोपलीतील छिटचाछिटचांची केळी इकडेतिकडे करीत बसला होता. वेल्डिंगवाल्यानं गजांच्या वस्तू बनवाव्यात, तसा ज्योतिष्य हस्तरेषांवरून काही शब्दन् काही अर्थ बनवीत होता. फक्त वेल्डिंगवाल्याच्या वस्तू टिकाऊ असतात. गंध लावलेला, बिनगुंड्यांचा सदरा घातलेला ज्योतिषी आत्मविश्वासानं त्या वडाखाली चंद्रमंगळाविषयी बोलत होता, फल सांगत होता.

'या–या रेषांची तिरडी होते, तरी रेषांचा अर्थ कळत नाही.' मी मनात म्हणतो. तिरस्कारानं नाकातून श्वास झटकतो. शाई उतरत नसताना फाउंटनपेनला झटका द्यावा तसा.

जवळच एक पानपट्टी असते. दोन–चार शौकीन सिगारेट ओढीत असतात. पलीकडे एक मोसंबीवाला बसला होता. ठेल्यातील एक–एक मोसंबी काढीत होता नि सदऱ्याच्या समोरच्या भागावर घासत होता नि चमकवून परत ठेल्यात ठेवत होता. ज्योतिष्याच्या मागे दोन कुष्ठरोगी हातापायाला बोंद्रा बांधून सरपटत होते. त्यांना भविष्यच नसते; कारण– कारण त्यांना हातच नाहीत नि हात नसल्यामुळे रेषाही नाहीत!

मी सायकल पुढे दामटली, घुसवली. पुन: गर्दी थांबलेली दिसली व लाऊडस्पीकरवरचा गिऱ्हाइकं पटविणारा आवाज ऐकू आला. 'तेरा गुणी' तेलाबद्दल एक शीख डाव्या हातातील माईकजवळ तोंड नेऊन नि डोळे गिऱ्हाइकांकडे लावून बोलत होता. त्याच्या गळ्याच्या शिरा फुगल्या होत्या, निळसर झाल्या होत्या. खूप पंप मारून पेटवलेल्या स्टोव्हसारखा त्याचा आवाज एकसुरी होता. सारं रक्त मानेकडे चढत

होतं. गॅस होण्यासाठी. 'नंबर एक, नंबर दो' करीत तो तेलाचा एक एक गुण सांगत होता. समोर विविध रंगांच्या बाटल्या भरल्या होत्या. अनेक व्याधींपासून मुक्त होण्याची शक्ती या बाटलीत कशी आहे, हे तो मुद्द्यामुद्द्यानं, स्पष्ट उच्चारात सांगत होता. त्याचे माध्यम फक्त हिंदी होतं, अन्यथा शास्त्राची अनिश्चितता गृहीत धरली, तरी ते चांगल्या मेडिकल कॉन्फरन्समधील अभ्यासपूर्ण वक्तव्य होतं.

घंटी वाजवली नि माणसांना, त्यांच्या हातातील पिशव्यांना चुकवत मी पुढे जाऊ लागलो. साऱ्या गोष्टींशी मला काहीच करायचं नसतं. ज्योतिषावर माझा विश्वास नसतो, तसा माणसाच्या हाती त्याचं भविष्य आहे, ह्याही तत्त्वज्ञानावर भरवसा नसतो. मी प्रयत्नानं भविष्य बनविण्यासाठी वर्तमान राबवला असतो नि प्रत्यक्ष भविष्यात काहीच घडलं नसून, जे घडलं असतं, ते पुष्कळदा ज्या भविष्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली असते, त्या भविष्यापेक्षाही चांगलं घडलं असतं, कधी कधी नेमकं उलट घडलं असतं, कधी–कधी काहीच घडलं नसते नि काही घडलं नाही म्हणून समाधानही लाभलं असतं. मला त्या तेरागुणी तेलाशी काहीच करायचं नसते. चांगले चांगले आंतराष्ट्रीय कीर्तीचे डॉक्टर पाहिले असतात नि मागे लिहून दिलेल्या औषधांचे अवगुण व नवीन औषधांचे गुण ऐकले असतात. मला पुढे घुसणं माहिती असते.

एका जुन्या मोटारीच्या सांगाड्यासमोर लालसर, गंजलेल्या, जुन्या लोखंडी वस्तूंचे दुकान दिसते. निरनिराळ्या यंत्रांचे भाग दिसत होते. मोटारीच्या चौकटीसह असणारा काच मोटारीच्या सांगाड्याला टेकवून ठेवली होती. सुदर्शनचक्राच्या काट्यासारखे काटेकाटे असलेली चाकं ठेवली होती. नट होते, बोल्ट होते, काही टी-कपलिंग, निप्पल. सारं गंजलेलं जुनाट, मग आठवलं. काही लोक यालाच अगदी Made in U. S. A. टाईप बनवतात, ओळखू येत नाही इतके बेमालूम ! कोठलं तरी वाक्य अचानक डोक्यात घुसते – 'Learning makes good man best and ill man worst' – वाक्य आठवते एवढं खरं. का कुणास ठाऊक !

रथातून गावात फेरफटका मारायला निघालेल्या सिद्धार्थासारखा मी आजूबाजूला पाहत सायकलच्या चाकाबरोबर दोन पाय पुढे ढकलतो. एक मोडकळीस आलेलं उदासवाणं शेड लागतं. शेडची टिनं गंजलेली असतात. झिजून झिजून त्यांना चिवट्या काढलेल्या वाळल्या पत्रावळीसारखी जाळी लागलेली असते. त्यांचं जोतं ढासळलेलं असतं. शेडला जुनी कलतानं, बोंद्रा लावण्याचा नि लाज राखण्याचा, निवारा करण्याचा फाटका, कुजका प्रयत्न लक्तरत होता. त्या सडलेल्या घाग्याच्या निवाऱ्यात काळे, खंगलेले, कुष्ठ, भिकारी असे अनेकजण राहत होते. मी भीत भीत, बिचकत आतमध्ये पाहिलं. एक स्त्रीलिंगी शरीर कपडे बदलत होतं नि फुटल्या मेंथलासारखी स्तनं उघडी पडली तरी त्याची तिला पर्वा नव्हती. ओळीनं मोडक्या, झोळणा झालेल्या खाटा होत्या. जागजागी आडव्या, तिरप्या दोऱ्या बांधल्या होत्या

व दोऱ्यावर घाणेरडे, कळकटलेले, फाटके कपडे पडले होते. काही दोऱ्यांचा पाळण्यासारखा उपयोग केला होता. एक दाढीवाला साधू बनून भीक मागत असावा. तो खाटेच्या झोळण्यावर खोकलत होता. खोकलताना साऱ्या अंगाला, खाटेला हिसके देत होता. दोनचार दगडाविटांच्या चुली धांड्याकाड्यानं पेटविल्या गेल्या होत्या नि उबग येणारा धूर लक्तरावरून, आडव्यातिडव्या दोऱ्यांच्या कुजक्या, मळक्या जाळ्यांतून, झोळणा होऊन खोकलण्यानं हिसके बसणाऱ्या बाजेवरून, ओंगळ नि चिपाड स्तनावरून, मांड्यावरून, सटवी झालेल्या, पोटाच्या नगाऱ्यावरून, पोरावरून वाहत होता. मळका काळसर धूर सर्वांना चाटत बाहेर निघत होता.

म्हटलं, आता कुठला गौतम बुद्ध! चार टायरवर बसले की दोन टांगांना विसरणारे लोक! ती सुंदर पत्नी नि उत्तुंग राजवाडा सोडून गेला! आता...... आता......

बटाटे–कांदे यांच्या पोत्यानं भरलेले ट्रक रांगेने उभे होते. प्रत्येक ट्रकवर डोक्याला फडकं गुंडाळून नि लांडी चड्डी अजून वर सरकवून हमाल पोती उतरवीत होते. आपसात हसीमजाक करीत होते, गाणे म्हणत होते, भांडत होते. आपापल्या ट्रकसमोर उभं राहून ड्रायव्हर विड्यांचे झुरके मारीत होते. ट्रकच्या दोन्ही बाजूनं मांडामांडी चाललेल्या दुकानांत हे कांद्याबटाट्यांचे कट्टे जात होते.

"पंधरा और सोला रुपाया कट्टा, होना क्या, बोलो!"

कट्ट्याकडे बोट दाखवून, जसं नुसतं बोट दाखविलं, की मालाचा नमुना समजतोच. दलालानं दुकानदाराला आव्हानपूर्वक सुरात विचारलं. "भेज दो भाई."

बेफिकीरपणे दुकानदारानं त्याचं आव्हान खोडून काढलं. बटाटेवाला चांगले व वाईट बटाटे निवडून काढीत होता. दोन्ही मालाचा त्याला भाव येणार असतो. वाईट माल पुसून ठेवत होता. तो माल खपण्यावर नफा अवलंबून असतो. कांदेवाला कांद्याच्या राशीतून कांदे काढून त्यावरचा पाचोळा काढीत होता. अंड्यासारखे कांदे दिसू लागल्यावर पलीकडे ठेवत होता. अर्थात पाचोळा काढण्यानं कमी झालेलं वजन तो भाव वाढवून भरून काढणार असतो. पलीकडे एक खेडूत बाई सांभाराचं टोपलं घेऊन उभी होती. या ट्रकच्या लाईनकडे, दलालाकडे पाहात होती.

मी पुढेच चाललो होतो. दोनचार ठिकाणी भाव विचारले. मग मी माझा भाव सांगितला. उद्धटपणे दुकानदारानं पुढे जा म्हणून सांगितलं. पुढे चाललो होतो. एका भाजीवालीनं मी सांगितलेला भाव कबूल केला नि किती भाजी पाहिज विचारलं. मी पावभर पाहिजे म्हटल्यावर तिनं नाक उडवलं, तुच्छतादर्शक उच्छ्वास बाहेर फेकला नि माझ्याकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या गिऱ्हाइकाशी बोलू लागली. मी पिशवी झटकली नि तणतणत समोर गेलो.

"या बाजारात फक्त माणसाचा भाव नाही, बाकी सडक्या अंड्याला भाव आहे, सडल्या कांद्याच्या वासाला भाव आहे, कोंबड्याला भाव आहे नि टांगलेल्या

बकऱ्याच्या मटणाला भाव आहे. विकणारा नि विकत घेणारा हे मात्र विनभावाचे आहेत !" मी चिडून अर्थात मनातल्या मनात म्हणतो. गौतमबुद्ध चिडला नव्हता, तो अंतर्मुख झाला होता. कारण...कारण त्यानं ते कधीच पाहिलं नव्हतं नि मी दर बाजारी हेच पाहात आहे. पिशवी जड करीत मी बाजाराच्या टोकाशी येतो. एका मोठ्या वडाखाली दोन पोलीस हत्यारबंद असे उभे होते. वडाच्या भोवती कुंपणाची काटेरी लोखंडी तार लावली होती. तारेच्या आत पोत्यांची थप्पी लावलेली होती. तारांबाहेर एक मोठा काटा लावला होता. काटयापलीकडे ढकलगाडया उभ्या होत्या नि त्यातून हमाल पोती आणीत होते. वडासमोर एखाद्या सुस्त अजगरासारखी रांग लागली होती. दर रविवारी येथे खेडुतांना धान्य मिळते म्हणे !

'सोशॅलिस्टिक पॅटर्न ऑफ भिका !' मी मनातल्या मनात म्हणतो.

रांग वेटोळे–वेटोळे घालून सुस्तावली असते. चांगली पाचसातशे फुटांची असेल. लुगडेवाल्या होत्या, परकरी होत्या, साड्या होत्या, धोतरं होती, लांड्या चड्डया होत्या, पट्टयापट्टयांचे पैजामे होते...काही ठिकाणी नुसते डबे रांग धरून बसले होते– डबेवाला कुठं तरी बाहेर गेला असावा. कुणाचा आंबट विनोद चालला होता, कुणाची 'मेल्याचं तळपट होवो,' या धर्तीची आदळआपट चालू होती...

"एक दिवस, फक्त रविवारी मिनिस्टरला रांगेत उभं केलं पाहिजे !" एक विचार मनात येतो.

'घोडयाचं (घोडयाचा दाणा) खाणार, त्याला अमेरिका देणार !'

एका मित्रानं गंमत म्हणून सांगितलेली म्हण आठवली.

माझे स्वतःचे विनोद, दोस्तांचे विनोद सर्व फसफसलेल्या आंबट दह्यासारखे असतात.

पिशवी जड झालेली असते नि परतण्याचा विचार चालू असतो, तोच बँड ऐकू येतो. अगदी कोपऱ्यावर गर्दी दिसते. वाटलं, असेल काही चित्रपटाची वगैरे जाहिरात. सायकलच्या शिंगात दोन्ही पिशव्या लटकावून गर्दीबरोबर मीही ओढला गेलो.

चित्रपटातील लोकप्रिय गाण्याची धून वाजत होती. लक्ष लावून बँडवाले वाद्ये वाजवीत होते. वरती झोपाळयावर सर्कससुंदरीच्या उडया सुरू असाव्यात व खाली मंद नि तालबद्ध सुरात बँड वाजत राहावा तसा.

जिराफासारखी मान ताठ करीत मी पाहतो. पाहून मागेच सरकतो. तिरडीवर एक प्रेत ठेवलं होतं. त्यावर फुलं चढविली होती. आजूबाजूचे लोकं एखाद्या 'सोशल फंक्शन'मधील स्वयंसेवकांसारखे धावपळ करीत होते.

"काय आहे हो !"

मी अशुभ पाहिलं तर खरं, पण उगाच उसनं अवसान आणून जवळच्या प्रेक्षकाला विचारलं.

माझ्याकडे पाहून हसला.

" येथला भिकारी मेला आहे. "

" भिकारी ?"

" भिकारीच. "

हताशपणे हसलो. का कुणास ठाऊक, मकास वाटू लागलं. लोकांच्या हौसेचं नवल वाटू लागलं. यालाही त्यांनी 'सोशल फंक्शन'चं स्वरूप दिलं होतं. कार्यकर्ते धावपळ करीत होते. वर्गणी जमवली असेल साऱ्यांनी. मग एकानं धावत जाऊन बांबू, दोऱ्या आणल्या असतील. एकानं लाल कपडा, एकानं फुलं.....दूध, साखर आणून खीर करणाऱ्या कुत्र्यामांजराच्या गोष्टीसारखं......

साऱ्याच प्रसंगाचा थोडा न् थोडा अर्थ लावू शकलो, पण याचा अर्थ काय ?

हौस करण्यासाठी प्रेतयात्रा ही चीज शिल्लक आहे!

छे:, छे:, अर्थ फार अशुभ, कटु आहे. कटु आहे, पण सत्य आहे का ?

मी परतण्यासाठी वळणार, तोच कुणाची तरी थाप खांद्यावर पडली. एकात एक अडकलेले शब्द कानी पडले. भयंकर स्वप्न पडल्यानंतर दचकून उठावं नि आपल्याला उठवणाऱ्याला ओळखू नये, त्याच्या हाक मारण्याचे शब्द ऐकू येऊ नयेत–तसं झालं.

" कमाल आहे बुवा तुझी !" त्यानं माझा खांदा हलवीत म्हटलं.

मी हळूहळू जागा होत होतो. स्वत:ला ओळखू लागलो. मी स्वत:लाही विसरलो होतो.

बाजाराचा घों ऽ घों ऽ ऽ आवाज ऐकू आला. बँडचा आवाज घुमू लागला. गिऱ्हाइकं पटविणारा आवाज चिरकत होता.

" भले, कोणच्या तंद्रीत उभे होते महाराजा !" खांद्यावर अजून एक थाप मारीत ठोंबरे विचारीत होता.

मी खजील झाल्यासारखं हसतो. करू नये ते करताना सापडल्यासारखा चेहरा करतो.

" काही नाही रे, फालतूच हिंडत होतो. "

ठोंबरे हसला, जोरजोरानं हसला. एखाद्या सुधारण्याच्या पलीकडे गेलेल्या द्वाड पोराबद्दल त्याच्या बापानं हताश सूर काढावा, तशा सुरात ठोंबरे उद्गारला, " फिलॉसफर आहेस झालं !"

मीही हताश हसतो नि नेहमीप्रमाणे स्वत:ला, स्वत:च्या मनाला सूचना देतो, " Be a social Animal ! "

• • •




# नाझी

उत्तरार्ध

लेखांक : १० वा

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री




**२२ जूनला** पहाटेच हिटलरने मुसोलिनीला आदल्या दिवशी लिहिलेले प्रदीर्घ पत्र मिळाले. अखेरच्या क्षणापर्यंत रशियावर आपण हल्ला करणार आहोत, याचा सुगावा त्याने मुसोलिनीला लागू दिलेला नव्हता. या फ्यूररच्या पत्रात हिटलरने अनेक असत्य अशा प्रकारची विधाने केलेली असली, तरी या पत्राच्या ओळीओळीं-तून हिटलरने त्यांच्या कल्पनेप्रमाणे जगाची जी मांडणी अभिप्रेत ठेवली होती, त्याचे दर्शन होते. पत्र असे आहे--

डयूस ! 　　　　　　　　　　　　　　　　२१ जून १९४१

मी हे पत्र तुला अशा क्षणी लिहीत आहे, की जेव्हा महिनोमहिने उलटसुलट विचार व अत्यंत मानसिक क्लेश या अवस्थेतून बाहेर पडून मी माझ्या आयुष्या-तील अत्यंत कठीण निर्णय घेतलेला आहे.

परिस्थिती अशी आहे. इंग्लंडने युद्ध गमावले आहे. बुडत्याला काडीचा आधार

या न्यायाने जे सहाय्यक वाटेल, त्या प्रत्येकाला ब्रिटन आता कवटाळीत आहे. असे जरी असले तरी त्यांच्या सर्वच अपेक्षा काही तर्कशास्त्राला सोडून केलेल्या नाहीत. फ्रान्सचा नाश झाल्यानंतर साहजिकच ब्रिटिश-युद्धखोराची नजर आता ज्या ठिकाणी त्यांनी प्रथम युद्ध सुरू करण्याची अपेक्षा ठेवली होती, त्या स्थानाकडे लागली आहे. ... म्हणजेच सोविएट रशिया !

सोविएट रशिया व इंग्लंड या दोघांनाही प्रदीर्घ युद्धामुळे हतबल झालेला युरोप पसंत आहे. यासाठी या दोघांना उत्तर अमेरिकेची सतत चिथावणीही आहे.

असे पाहा, की सर्वच्या सर्व रशियन सैन्य आमच्या सरहद्दीवर आज उभे आहे. जर प्रसंगानुरूप मला माझे सर्व हवाईदल इंग्लंडविरुद्ध उपयोगात आणावे लागले, तर माझ्या या स्थितीचा फायदा घेऊन रशिया माझेकडून अधिक अधिक सवलती उकळू लागेल व मला हवाईदलाच्या दुर्बलतेमुळे या दडपणापुढे मान झुकवावी लागेल. इंग्लंडकडून अर्थातच तहासाठी प्रयत्न होणार नाहीत; कारण त्यांच्या आशा रशियावर खिळलेल्या राहतील. या आशा जसजसे रशियन सैन्य अधिक अधिक तयारी करू लागेल, तसतशा वाढतच जातील. या सर्वांत भर म्हणून अमेरिकेकडून येणारे युद्धसाहित्य १९४२ पर्यंत हाती पडेल, अशी अपेक्षा ब्रिटन करीत आहे.

म्हणूनच मी सतत उलटसुलट विचार करून, या निर्णयाला आलो, की फास आवळला जाण्यापूर्वीच दोरी तोडली पाहिजे.

एकंदर परिस्थितीविषयी माझा अंदाज पुढीलप्रमाणे आहे–

(१) फ्रान्स–या देशावर विश्वास ठेवून चालणार नाही.

(२) उत्तर आफ्रिका–येथील तुमच्या वसाहतींबाबत ड्यूस एवढेच सांगता येईल, की पुढल्या हिवाळ्यापर्यंत धोका नाही.

(३) स्पेन–हा देश अजून तरी कसलाही ठाम निर्णय घेईलसे दिसत नाही. ज्यावेळी या युद्धाचा निर्णय सुस्पष्ट होईल, त्याचवेळी हा देश एका पक्षाकडून युद्धात उतरेल,

(४) इजिप्त–इजिप्तवर वसंत ऋतूपूर्वी हल्ला करणे शक्यच नाही.

(५) अमेरिका–ही प्रत्यक्ष युद्धात पडली काय किंवा नाही काय–कारण आता-देखील ती आपल्या शत्रूला सर्वशक्तीनिशी मदत करीतच आहे.

इंग्लंडपुरते बोलायचे, तर परिस्थिती चिंताजनक आहे. अन्न व कच्चा माल यांचा तुडवडा दिवसेदिवस वाढत जाणार आहे. युयुत्सु वृत्ती ही आशेच्या ओलाव्याशिवाय जिवंत राहू शकत नाही. ब्रिटिशांची आशा दोन गृहीत गोष्टींवर आधारलेली आहे– रशिया व अमेरिका. अमेरिकेचा आधार काढून घेणे आपल्याला अशक्यच आहे. परंतु रशियाचा काटा काढणे आपल्या आवाक्यातील गोष्ट आहे. रशियाचा काटा निघाला, तर पूर्व आशियात जपानला मोठा दिलासा मिळेल. जपानच्या धाकाने अमेरिकेच्या चाळ्यांना पायबंद बसू शकेल.

## मनाची टोचणी संपली

या सर्व गोष्टी विचारात घेता मी क्रेमलीनमधील सर्व ढोंगी उपद्व्याप्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरवले आहे.

ड्यूस, या पूर्वेकडच्या लढाईचे स्वरूप कठीण असणार, याची मला कल्पना आहे. परंतु त्याचबरोबर या युद्धातही अखेर आम्ही विजयी होऊ, याविषयी मला तिळमात्र शंका नाही. युक्रेनच्या धान्यकोठाराचा वापर आपल्या उभय देशांना भविष्यात करता येणार आहे.

मी या क्षणापर्यंत ड्यूस, तुला यातले काही कळवू शकलो नाही, याचे मुख्य कारण आज सायंकाळी ७ वाजताच तर यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे.

काही झाले तरी ड्यूस, आपली परिस्थिती या माझ्या नव्या पावलाने अधिक वाईट न होता सुधारणारच आहे. इंग्लंडने या घटनेपासून योग्य तो धडा घेतला नाहीच, तर एकदा पूर्वेची आघाडी निष्कंटक झाली, की नव्या शक्तीनिशी याही शत्रूचे शिरकाण आपण करून टाकू.

ड्यूस, आणखी एक गोष्ट मला सांगितली पाहिजे. हा निर्णय घेताक्षणीच माझ्या मनावरचे दडपण नाहीसे होऊन मी मुक्तीचा आनंद भोगीत आहे. सोविएट युनियनशी केलेली भागीदारी, त्याच्याशी जुळते घेण्याचे सर्व प्रयत्न मनापासून करीत असतानाही मला सारखी टोचत असे. असे करणे म्हणजे माझ्या पूर्वआयुष्याशी विसंगत तर होतेच, परंतु ही गोष्ट माझ्या कल्पनांशी व मी स्वीकारलेल्या उत्तरदायित्वाशी द्रोही ठरणारी होती. मनाची ही सर्व टोचणी आता संपल्यामुळे मी अत्यंत सुखी झालो आहे.

[ The partnership with the Soviet Union was very irksome to me, for in someway or the other, it seemed to me to be a break with my whole origin, my conception & my former obligations. I am happy now to be relieved of these mental agonies. ]

हार्दिक शुभेच्छा……

—आपला
—ॲडॉल्फ हिटलर.

पहाटे ३ वाजता म्हणजे जर्मन सैन्याने रशियन सरहद्द ओलांडण्यापूर्वी फक्त अर्धा तास जर्मनीचा इटलीतील वकील व्हॉन बिस्मार्क याने सियानोच्या हाती वरील पत्र ठेवले. यावेळी मुसोलिनी ' रिसिओने ' या गावी विश्रांतीसाठी गेलेला होता. पहाटेच फोन घणघणला. डोळ्यांवरील झोप तशीच ठेवून मुसोलिनीने पत्र ऐकण्यास सुरवात केली. पत्र संपले, तेव्हा त्याची झोप पुरती उडालेली होती. त्याने सियानोला लगोलग रशियाविरुद्ध युद्ध पुकारण्याची घोषणा करण्याच्या सूचना दिल्या. मुसोलिनीच्या

हे लक्षात आले की आता यापुढे आपण जर्मनीच्या पायात कायमचे अडकलो गेलो आहो. इटालीला आता स्वतंत्र असे विचारस्वातंत्र्यही उरले नव्हते. जर्मनीच्या भवितव्याशी ड्यूसचे भवितव्य आता पुरते जखडले गेले होते.

## २२ जून : ऐतिहासिक तारीख

**२२ जून** – बरोबर याच तारखेला १८१२ मध्ये नेपोलियनने नायमेन नदी ओलांडून मॉस्को दिशेने वाटचाल सुरू केली होती.

**२२ जून** – बरोबर याच तारखेला नेपोलियनचा बलाढ्य देश...फ्रान्स याने कोम्पेनच्या रानात नाझी जर्मनीपुढे लोळण घेतली होती.

**२२ जून** – याच तारखेला युरोपात आतापर्यंत अजिंक्य ठरलेली हिटलरची पोलादी दले नायमेन व इतर नद्या ओलांडून झपाट्याने रशियाच्या प्रदेशात खोलवर मुसंडी मारू लागली. सर्व १५०० मैलांच्या आघाडीवर रशियन सैन्य चकित झाले होते. नद्यांवरचे पूल आहे त्या अवस्थेत जर्मनींच्या हाती पडले. प्रतिकार उभा होण्यापूर्वीच जर्मन सैन्य त्यांच्या अंगावरून पुढे सरकून निघून गेले. सर्व आघाड्यांवर गोंधळ उडाला होता. सरहद्दीवरील रशियन ठाण्यांतून मॉस्कोला संदेश सारखे जात होते–

"We are being fired on. What should we do ?"

[ आमच्यावर गोळीबार सुरू झाला आहे. आम्ही काय करावयाचे आहे ? ] शेकडो रशियन विमाने विमानतळावरून उडण्यापूर्वीच जर्मनांनी ताब्यात घेतली. पोलंडमध्ये ज्याप्रमाणे झाले तसेच रशियात घडू लागले. अजस्र संख्या असलेल्या रशियन फौजा झपाट्याने कोंडल्या गेल्या व शरण येऊ लागल्या.

सुरवातीच्या काही तासांत व काही दिवसांत जर्मनांनी इतक्या झपाट्याने मुसंड्या मारल्या, की हाल्डरने ३ जुलैला आपल्या दैनंदिनीत लिहिले–

"In a matter of weeks it will all be over."

[ काही आठवड्यांतच सगळा मामला पुरा होईल ]

फील्ड मार्शल बॉशच्या फौजांनी १५, जुलै १९४१ ला स्मोलेन्स्क गाठले. बॉशच्या फौजा मध्यभागातून पुढे सरकल्या होत्या. बियालीस्टॉक ते मॉस्को हे अंतर ६५० मैलांचे आहे व स्मॉलेन्स्क हे मॉस्कोपासून केवळ २०० मैलांवर आहे. याचा अर्थ तीन आठवड्यांत जर्मन सैन्याने मध्य रशियात ४५० मैलांचे अंतर काटलेले होते. १५ पॅन्झर तुकड्या व ३० इन्फन्ट्री तुकड्यांचे एकंदर नेतृत्व बॉश करीत असला तरी पॅन्झर तुकड्या जनरल गुडेरीनच्या नेतृत्वाखाली आघाडीवर होत्या.

उत्तरेकडे रेटा देणाऱ्या २१ इन्फन्ट्री व सहा स्वयंचलित तुकड्यांचे नेतृत्व फील्ड मार्शल लीबकडे होते. लेनिनग्राडच्या दिशेने लीबने २५० ते ३०० मैल अंतर काटले होते.

दक्षिणेकडे २५ इन्फट्री डिव्हिजन्स, ५ पॅन्झर डिव्हिजन्स, ४ डोंगरी डिव्हिजन्स व ४ स्वयंचलित डिव्हिजन्स एवढे जर्मन सैन्य फील्ड मार्शल रूडन्स्टेन्ड याने युक्रेनची राजधानी कीव्ह, तिच्या दिशेने पुढे काढले होते.

## मॉस्कोपेक्षा युक्रेन महत्त्वाचे !

लेनिनग्राड, मॉस्को व कीव्ह या तीन महत्त्वाच्या शहरांच्या दिशेने जर्मन सैन्य रशियन फौजांची शरणागती स्वीकारीत पुढे जात असताना–उलट दिशेने गाड्या भरभरून रशियन युद्धकैदी पोलंडमधे पाठवले जात होते.

जुलै महिना संपला. ऑगस्ट उजाडला. रशियन सैन्याने आता काही ठिकाणी प्रतिकाराची चुणूक दाखवायला सुरवात केली. जर्मन सैन्ये जसजशी पोलिश सरहद्दीपासून लांब लांब जाऊ लागली, तसतसा त्यांचा वेगही मंदावणे साहजिकच होते. कारण जिंकलेल्या मलखात कबजा करून रसदीची तरतूद करण्यास आता अधिकाधिक वेळ लागू लागला होता.

जुलैच्या १६ तारखेला स्मॉलन्क्स सर केल्यानंतर हिटलरने पूर्वी आखून दिलेल्या आज्ञेनुसार, बॉशच्या सैन्याने मॉस्कोच्या दिशेने न जाता उत्तरेकडे लेनिनग्राड व दक्षिणेकडे कीव्ह या दोन्ही लढाया जिंकण्याच्या दृष्टीने रशियन सैन्ये कोंडीत पकडण्याची हालचाल करावयाची होती. हॉल्डर, कमांडर इन चीफ, ब्राऊश, फील्ड मार्शल बॉश व जनरल गुडेरीन या सर्वांनी यावेळी हिटलरला असे सुचवले, की आता लेनिनग्राड किंवा कीव्ह या लढायांना फारसे महत्त्व न देता बॉश व गुडेरीन यांनी सरळ मॉस्कोपर्यंत जावे व राजधानी हस्तगत करावी. रशियातील सर्व वाहतुकीचे जाळे मॉस्कोमधून उगम पावते. शस्त्रास्त्रांचे मोठाले कारखाने मॉस्कोच्या परिसरातून आहेत. शिवाय ती राजधानी असल्याने मॉस्कोचे महत्त्व अनन्यसाधारण राहणार, अशा अनेक कारणामुळे मॉस्कोच्या दिशेनेच गुडेरीनने पुढे जावे, असा आग्रह या सर्वांनी धरला.

परंतु आता सुप्रीम कमांडर झालेल्या फ्यूररने आपल्या सेनापतीचा हा विचार धुडकावला. हिटलरचे लक्ष मॉस्कोपेक्षा युक्रेनचे धान्यकोठार व त्यापलीकडे कॉकेशसमध्ये असलेल्या रशियाच्या तेलखाणींवर अधिक होते. डीनेपर नदीच्या दक्षिणेस मार्शल बुडेनी याच्या हाताखाली लढणाऱ्या लाल सैन्याने कीव्हच्या लढाईत अजून जर्मनांना दाद दिलेली नव्हती. युक्रेनमध्ये जर्मन सैन्ये घुसलेली होती, परंतु कीव्ह अजून पडत नव्हते व लेनिनग्राडचा कबजा केल्याखेरीज फिनलंडमधील जर्मन सैन्याशी हातमिळवणी होणार नव्हती. या दोन्ही गोष्टी तातडीने घडाव्या व मग मॉस्कोवर चालून जावे, असा हिटलरचा ठाम निर्णय होता.

बॉशच्या तडाख्यातून सुमारे ५०,००० लाल सैन्य निसटले होते व मार्शल टिमोशिको याने या सैन्यानिशी मॉस्कोच्या परिसरात निकराचा प्रतिकार सुरू केला होता.

हिटलरने २१ ऑगस्टला फर्मान सोडले–

" डिनेपरवरील सोविएट सैन्याचा प्रथम संपूर्ण नाश करून युक्रेन व क्रिमियाचा कबजा झाला पाहिजे व लेनिनग्राडला वेढा देऊन फिनलंडशी हातमिळवणी झाली पाहिजे. हे झाले की मगच टिमोशिकोच्या सैन्यावर हल्ला चढवून विजय मिळ-वण्यासारखी परिस्थिती निर्माण होणार आहे. "

हिटलरने सांगितलेली ही आज्ञा चुकीची आहे, ती बदलून घेतली पाहिजे, यासाठी जनरल गुडेरीन आघाडी सोडून २३ ऑगस्टला फ्यूररला येऊन भेटला. यावेळी हिटलरने काढलेले उद्‌गार गुडेरीननेच लिहून ठेवले आहेत.

हिटलरने गुडेरीनला सांगितले, की रुमानियातील तेलखाणी वाचवायच्या असतील, तर क्रिमियातून रशियनांना हाकलले पाहिजे. गुडेरीनची जेव्हा समजूत पटेना, तेव्हा हिटलरने सांगितले–

" My generals know nothing about the economic aspects of war."

[ माझ्या सेनानींना युद्धाच्या आर्थिक बाजूसंबंधी काहीही कळत नाही. ]

गुडेरीन सांगतो– " हिटलरने हे वाक्य उच्चारताच तिथे हजर असलेल्या काय-टेल्, जोडल् आदींनी लगेच मानेने हिटलर म्हणतो, ते खरे असल्याचे मान्य केले माझा दृष्टिकोन माझेजवळच राहिला.

जनरल गुडेरीनचे हिटलरजवळ चांगले वजन होते. फ्रान्सच्या लढाईत त्याने जो पराक्रम केला, त्याचा हा परिणाम होता. अर्थात गुडेरीनमार्फत हिटलरचे मतपरि-वर्तन करण्याचा प्रयत्न फसताच सर्व सेनानी हिटलरच्या आज्ञेनुसार लेनिनग्राड व कीव्ह येथील लढायांच्या दिशेने, बॉशच्या सैन्याने काय करावयाचे याचा आराखडा लगेच ठरवू लागले.

## कीव्ह पडले

गुडेरीन मध्यभागातून आपल्या पॅन्झर तुकड्या काढून घेऊन, कीव्हच्या दिशेने वळला. कीव्हची लढाई चालूच होती, तरी रूडन्स्टेन्डच्या फौजा कीव्हच्या पलीकडे १५० मैल पुढे गेलेल्या होत्या. गुडेरीनच्या पॅन्झर तुकड्यांनी दणका देताच, १९ सप्टेंबर, १९४१ ला कीव्ह पडले. सहा लाख पासष्ट हजार रशियन सैन्य येथे जर्मनांनी कोंडले होते. ते सर्व शरण आले.

कीव्ह पडले. जनरल रेनहार्ड याच्या नेतृत्वाखाली जर्मन टँकदले लेनिनग्राडकडे गेली होती. लेनिनग्राडवर दडपणही वाढले. परंतु पॅन्झर तुकड्या सोडून गेलेले फील्ड मार्शल बॉशचे सैन्य आता मॉस्कोपासून २०० मैलांवर जवळजवळ २ महिने एकाच ठिकाणी थांबून राहिले. १६ जुलै ते १९ सप्टेंबर बॉशची सेना स्मॉलेन्क्सपाशीच थबकली होती.

कीव्ह् पडताच गुडेरीनच्या पॅन्झर तुकड्या मोकळ्या झाल्या. रेनहार्ड ह्यादेखील आपले टँक्स घेऊन पुन: बॉशला येऊन मिळाला. हिटलरने आता आदेश दिला–

" Get started on the central front. Encircle them, beat and destroy them."

[ आता मध्य आघाडीवरील रेटा सुरू करा. त्यांना कोंडीत धरा, मारा आणि नामशेष करा. ]

टँकदलाची व पॅन्झर तुकड्यांची डागडुजी होईपर्यंत २ ऑक्टोबर उजाडला. या दिवशी मॉस्कोच्या दिशेने जर्मनांचा प्रचंड रेटा आता सुरू झाला. १५ ऑक्टोबर-पूर्वी जर्मन सैन्याने रशियन सेना दोन ठिकाणी घेरल्या. व्हॅझमा (Vyazma) व ब्रियान्स्क (Bryansk) च्या दरम्यान पुन: साडेसहा लाख रशियन सैन्य, पाच हजार तोफा व बाराशे टँकसह शरण आले. एवढ्या प्रचंड पराभवामुळे लाल सैन्याने एकदम फार मोठे अंतर जर्मनांसाठी मोकळे केले. २० ऑक्टोबरला मॉस्कोपासून चाळीस मैलांवर जर्मन सैन्ये येऊन थडकली.

मॉस्कोहून सरकारी कचेऱ्या हलवण्यात येऊ लागल्या. व्होल्गा नदीच्या तीरावरील कुश्बिशेव्ह् (Kuibyshev) या ठिकाणी राजधानी हलवण्यात आली.

जनरल हाल्डर यावेळी घोड्यावरून पडून मानेचे हाड मोडल्यामुळे हॉस्पिटल-मधे दाखल झाला होता. हिटलरच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरच कीव्ह् घेऊन मॉस्कोची लढाईदेखील आठवडाभरात आटोपणार, अशी हाल्डरची आता खात्री होऊ लागली. हिटलरच्या लष्करी ज्ञानापुढे त्याने मनोमन शरणागती दिली असली पाहिजे.

– कारण हाल्डर आघाडीपासून दूर होता !

प्रत्यक्ष मॉस्कोच्या परिसरात मात्र आता पावसाला सुरवात झाली. रशियात पाऊस पडला, की सर्वत्र चिखल माजतो. मॉस्कोचा परिसर चिखलमय होऊ लागला. दारूगोळा भरभरून येणाऱ्या मोटारी चिखलातून बाहेर ओढण्यासाठी आघाडीवरील रणगाडे मागे आणावे लागू लागले. रुतून बसलेली चाके बाहेर काढण्यासाठी लाग-णाऱ्या ' कपलिंग'चा तुटवडा पडू लागला. ट्रॅक्टर्स तर कासवाच्या गतीने जेमतेम पुढे सरकू शकत होते. यावरून किती अडचण झाली असेल, याची कल्पना करता येईल. तोफा पुढे ओढायला चाकांची वाहने जोडावी, तर चाकांच्या आरीपर्यंत ती चिखलात रुतून बसत.

## जर्मन सैन्याची पहिली माघार

जर्मन टँकदले व स्वयंचलित दले अडचणीत सापडलेली पाहताच रशियनांचा प्रतिकार अधिक अधिक तीव्र होऊ लागला. ब्लुमेंट्रिट (Blumentrilt) हा जर्मन सेनानी त्यावेळची परिस्थिती सांगताना म्हणाला —

" And now when Moscow was already in sight, the mood both of commander & troops began to change. Winter was about to begin, but there was no sign of winter clothing. Far behind the front, the first partisan units were begining to make their presence felt in the vast forests. Supply columns were frequently ambushed..."

[ आता मॉस्को अगदी दृष्टीच्या टप्प्यात आले असनाना, सैन्याचा व सेनानींचा नूर बदलू लागला. हिवाळा तोंडावर आला होता, परंतु हिवाळी कपड्यांचा अजून पत्ता नव्हता. आमच्या आघाडीच्या मागे घनदाट जंगलातून रशियन देशभक्तांनी सुरू केलेल्या सशस्त्र प्रतिकाराची सुरवात याचवेळी जाणवू लागली. आमची रसद अनेकवेळा मध्येच तोडली जाऊ लागली. ]

दक्षिणेकडच्या आघाडीवरही जरा निराळीच परिस्थिती निर्माण झाली होती. फिल्ड मार्शल रूडन्स्टेन्ड याने मायूस नदीच्या तीरावरच हिवाळाभर तळ ठोकण्याचे ठरवले होते. परंतु हिटलरच्या हुकमाप्रमाणे त्याने तो विचार पालटून डॉन नदीपर्यंत मुसंडी मारून, २१ नोव्हेंबरला रोस्टोव्ह हे शहर काबीज केले. डॉ. गोबेल्सने आपल्या प्रचारयंत्रणेमधून या घटनेचा मोठा गाजावाजा करून कॉकेशसचा दरवाजा आता उघडला गेला आहे, असे या विजयाचे वर्णन केले. परंतु हा दरवाजा फार काळ धरून ठेवणे जर्मन सेनेच्या आवाक्याबाहेर होते. पाच दिवसांनी जर्मन सैन्याने तेथून माघार घेतली व रशियन सैन्य पुनः रोस्टोव्हमध्ये घुसले. रोस्टोव्ह सोडल्यानंतर अधेमधे थांबण्याची सोय नसल्यामुळे रूडन्स्टेन्डचे सैन्य ५० मैल मागे हटून पुनः मायूस नदीवर येऊ लागले.

१–९–१९३९ ला लढाईची ठिणगी उडाल्यापासून जर्मन सैन्याची ही पहिली माघार होती–! पहिला पराभव होता ! ! या पहिल्याच पराभवाने हिटलर बिथरला. त्याने फिल्ड मार्शल रूडन्स्टेन्डला तार दिली–

" यापुढे इंचभरही मागे सरकू नका ! "

यावर जर्मन सेनापतीने उलट जबाब पाठवला,

" रोस्टोव्ह ताब्यात ठेवण्याचा प्रयन्य करणे हा वेडेपणा झाला असता. जर माघार घेतली नाही, तर सैन्याचा नाश होईल. आपली आज्ञा मागे घेण्यात यावी व जर ते शक्य नसेल, तर दुसरा माणूस माझे जागी पाठवावा ! "

रूडन्स्टेन्डचा हा रंगेलपणा फ्यूररला मानवणार कसा ? फ्यूररने त्याच रात्री जबाब पाठवला–

" तुमची सूचना मी स्वीकारली आहे. सेनाधिकार आपण सोडू शकता–"

एक डिसेंबरला रूडन्स्टेन्डच्या जागी फिल्ड मार्शल रिशोने याने ताबा घेतला व मायूस नदीपर्यंत माघार घेऊ द्यावी अशीच फ्यूररला विनंती केली. फ्यूररने या वेळी

मात्र ती मान्य केली.

जनरल हाल्डर आपल्या दैनंदिनीत लिहितो–

"याचा अर्थ काल आम्ही होतो तिथेच आज राहणार आहोत. फक्त या काळात बराच कालापव्यय व शक्ती मात्र खर्ची पडली व रूडन्स्टेन्डला आम्ही मुकलो..."

नेमक्या याच थंडीत बर्फ पडायला लवकर सुरवात झाली. तपमान शून्य बिंदू-खाली वारंवार जाऊ लागले. ६–७ ऑक्टोबरलाच पहिल्याप्रथम वर्फ पडले. तीन नोव्हेंबरला थंडीची पहिली मोठी लाट आली. गुडेरीनला ७ नोव्हेंबरला पहिला अहवाल मिळाला, की सैन्यात (frosbite) शीताघाताने अनेकजण आजारी झाले आहेत. हिवाळी कपडयांची तरतूद अजूनही झालेली नव्हती.

२१ नोव्हेंबरपर्यंत रशियात आलेल्या ३० लाख जर्मन सैन्यापैकी ७,४३,११२ म्हणजे जवळजवळ २३ टक्के सैन्य हे निकामी झाले. यात मारले गेले व जखमी-आजारी झालेल्या जर्मनांचाच हिशेब धरलेला आहे.

**क्रेमलीनचे मनोरे दिसत होते ... पण !**

मॉस्कोपर्यंत हिवाळ्यापूर्वी धडक देण्याचे जर्मन स्वप्न खरे करण्याची ताकद होती फक्त गुडेरीनच्या पॅन्झर तुकडयांत ! परंतु या पॅन्झर तुकडयांचा हा पराक्रमी सेनानीच यावेळची परिस्थिती सांगतो–

"वर्फाची थंडी, कपडयांचा तुटवडा, सैनिक व सामग्री यांची दिवसेंदिवस होणारी वाताहत, पेट्रोलचा भयंकर तुटवडा या सर्वांपुढे सेनानीची चाकरी हे भयंकर दिव्य झाले आहे. हे असे किती दिवस चालणार आहे कुणास ठाऊक ! दिवसेंदिवस वाढणाऱ्या माझ्यावरील या प्रचंड जबाबदारीमुळे मी मात्र खचत जात आहे–"

अशा परिस्थितीतही मॉस्को शहराच्या उत्तर, दक्षिण व पश्चिम या तिन्ही दिशांनी जर्मन सैन्ये २५–३० मैलांच्या परिसरात तुंबळ रणकंदन करीत होती. आघाडी-पासून दूर प्रशियात समोर नकाशा मांडून बसलेल्या फ्यूररला मॉस्कोचा घास अगदी हातात आला आहे, याबद्दल मुळीच शंका नव्हती. पाचशे मैल अंतर काटले होते. फक्त २० मैल उरले होते. हिटलर जोडलूला सांगत होता–

"एक धक्का और दो–One final heave & we shall triumph."

दोन महिन्यांपूर्वी जेव्हा जर्मन सैन्याने रशियात ४०० मैलांची मुसंडी मारलेली होती, तेव्हाच हिटलरने जर्मन जनतेला सांगितले होते–

"I declare today, & I declare it without any reservation, that the enemy in the East has been struck down & will never rise again."

[मी आज जाहीररीत्या सांगतो, कसलाही आडपडदा न ठेवता सांगतो, की आपला पूर्वेकडील शत्रू आता चीत झाला आहे व तो पुन: केव्हाही उठू शकणार नाही.]

मॉस्कोमध्ये स्वस्तिक निशाण फडकायचा समय आता तर अगदी समीप आला

होता. १ डिसेंबर, १९४१ ला मॉस्कोवरील अखेरची धडक सुरू झाली. २ डिसेंबरला खिमकी (khimki) हे मॉस्कोचे उपनगर जर्मन सैन्याच्या हाती पडले. क्रेमलीनचे मनोरे येथून दिसत होते...परंतु मॉस्कोचे हे जर्मनांना झालेले पहिले व शेवटचे दर्शन होय ! ३ डिसेंबरला रशियन सैन्याने जर्मनांना तेथून हुसकले ! !

मॉस्कोच्या उत्तर-दक्षिण बगलांवर अनुक्रमे जनरल हॉम व गुडेरीन यांच्या फौजा रेटा देत होत्या, तर मध्यभागी म्हणजे मॉस्कोच्या पश्चिमेकडून फील्ड मार्शल बॉश सैन्य मॉस्कोची आराधना करीत होते.

रशियन सैन्याने जर्मनांना तिन्ही दिशांना रोखण्यात यश मिळवले होते. शून्याखाली ३१ अंश पारा गेल्यामुळे गुडेरीनच्या टॅंक्स जागच्याजागी अडकल्या होत्या. १ डिसेंबरपासून फील्ड मार्शल बॉश अती थंडीमुळे पोटात येणाऱ्या कळांनी जमीनदोस्त झालेला होता.

दि. ३ व ४ डिसेंबर या दोन दिवशी लाल सैन्याने जो प्रखर प्रतिकार केला, त्यामुळे मॉस्को घेणे आता हिवाळ्यातील बर्फमय थंडीने अशक्य झाले आहे, ही गोष्ट बॉशच्या ध्यानात येऊन चुकली होती. त्याने बर्लिनला फोनवरून सांगितले, की मॉस्कोपासून सैन्य मागे घेण्यातच शहाणपण आहे.

हातातोंडाशी असलेला घास सोडावा लागतो आहे, ही गोष्ट फ्यूररला पटणे शक्य नव्हते. त्याने माघारीस नकार दिला.

५ डिसेंबरला मॉस्कोभोवती २०० मैलांच्या अर्धवर्तुळाकृती आघाडीवर जर्मनांना रेसभर पुढे सरकणे लाल सैन्याने व बर्फाने अशक्य करून टाकले. गुडेरीनने आघाडीवरून मागे बॉशला संदेश पाठवला—

"आपण केवळ अडवले गेलेलो नसून, आता माघार सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाही–!"

बॉशने मागे हाल्डरला बर्लिन येथे फोनवरून सांगितले—

"आमची शक्ती संपत आली आहे—Our strength is at an end–!"

### ताज्या दमाचे नवे रशियन सैन्य

जनरल जॉर्जी झुकोव्ह याने मॉस्कोच्या मध्य आघाडीवर टिमोशिंकोकडून दीड महिन्यापूर्वी सूत्रे हाती घेतलेली होती. जर्मनांना पुढे येणे अशक्य झाले, याचा अर्थ त्यांची लष्करी यंत्रणा धोक्यात आलेली आहे, ही गोष्ट झुकोव्हने जाणली व प्रतिकाराचा पवित्रा सोडून ६ डिसेंबरला त्याने २०० मैलांच्या अर्धवर्तुळाकार रणात नव्या दमाच्या १०० डिव्हिजन फलटणी ओतल्या व जर्मनांना माग रेटण्यास सुरवात केली.

रशियाजवळ एवढे सैन्य आले कुठून ? हे सर्व १०० डिव्हिजन सैन्य ताज्या दमाचे व पूर्वी माघार घेतलेले अनुभवी होते. कडक थंडीत व बर्फात लढण्यासाठी आवश्यक ती वस्त्रप्रावरणे व अनुभव त्यांच्यापाशी होता. याउलट जर्मन सेना थंडीने



जनरल झुकोव्ह

व बर्फाने काकडत होती—थकलेली होती—निराशाजनक अवस्थेत होती.

जर्मनांचा अंदाज चुकला होता !

रशियाजवळ फक्त २०० डिव्हिजन सैन्य असावे, असा जर्मनांचा युद्धाच्या सुरवातीचा अंदाज होता. आतापर्यंत ३६० डिव्हिजन संरक्षकसैन्याशी तर त्यांची प्रत्यक्षच गाठ पडली होती व ज्यावेळी मॉस्कोजवळ निकाली युद्धाचा क्षण आला, तेव्हा झुकोव्ह याने ताज्या दमाचे आणखी १०० डिव्हिजन सैन्य आणून लढाईत उभे करताच, जर्मनांना हा ठोसा सहन करणे अशक्यच झाले.

शिरर लिहितो—

"The blow which this relatively unknown General now delivered was such a formidable force of infrantry, tanks, cavalry & planes, which Hitler has not faintly suspected existed, was so sudden & so shattering that the German army and third Reich never fully recovered from it."

[आतापर्यंत जवळजवळ अज्ञात असलेल्या या रशियन सेनानीने यावेळी जो निकराचा ठोसा चढवला, तो इतक्या अनपेक्षितपणे व इतका मर्मी बसला, की जर्मन सेना व तिसरे राईश या प्रहारातून पुन: कधीच सावरले गेले नाहीत. झुकोव्हने

दिलेल्या या प्रहारात–इन्फ्रट्री, टँक्स, घोडदळ व विमाने याची सुसज्जता आढळून आली. या गोष्टी रशियनांपाशी आहेत, असे चुकूनदेखील कधी हिटलरला वाटले नव्हते. ]

सबंध डिसेंबर महिना व जानेवारीचे सुरवातीचे दिवस–कडक थंडीत रशियन सैन्याने जर्मन सैन्यात वारंवार खिंडारे पाडूनही–ज्याला ससेहोलपट किंवा वाताहत म्हणता येईल, अशी परिस्थिती जर्मन सैन्याच्या नशिबी आली नाही, याला मुख्य कारण सर्वसाधारण जर्मन सैनिकाने दाखवलेले मनोधैर्य व बहादुरी होय.

वाताहत झाली नाही, परंतु अपयश मोठेच होते. लाल सैन्य मॉस्कोपर्यंतच्या रेटचात फक्त पांगळे झालेले होते. परंतु त्याचा पुरता नाश तर झालेलाच नव्हता. मॉस्को पडत नव्हते, लेनिनग्राड व स्टॅलिनग्राडही अजून झुंझतच होती. रोस्टोव्ह सोडून जर्मन सैन्य मागे गेले होते व कॉकेशसचा दरवाजावर आता धडकाही बसत नव्हत्या. दोन वर्षांच्या अप्रतिहत लष्करी विजयानंतर हिटलरची सैन्ये अधिक चांगल्या सैन्यापुढे आता प्रत्यक्ष मार खाऊ लागली होती.

## आत्मविश्वास ढासळला

एवढयानेच भागले नव्हते. यातून महत्त्वाची अशुभ गोष्ट घडली होती. सैन्याच्या मनोधैर्यावर परिणाम झाला होता. यशासारखे यश नसते, या न्यायाने आतापर्यंत जर्मन सैन्याचा आत्मविश्वास प्रतिदिनी द्विगुणित होत गेला. परंतु या पहिल्या पराभवाने स्वतःच्या अद्वितीयत्वाचा जर्मन सैन्याचा खोटा विश्वास ढासळला. ६ डिसेंबर १९४१ ला खाल्लेल्या या पहिल्या पराभवानंतर पुनः जर्मन सैन्याने काही विजय रशियातही मिळविले, परंतु पराभवाची नांदी सांगणारा ६ डिसेंबर १९४१ हा दिवस तिसऱ्या राईशच्या कालखंडात कायमचा अशुभच राहिला.

लष्करी सर्वाधिकारी मंडळ (High command) व आघाडीवरील जर्मन सेनानी यांच्यात या पराभवामुळे हिटलरने मोठाले फेरफार केले.

रोस्टोव्ह खाली केल्याबद्दल फील्ड मार्शल रूडन्स्टेन्डला डच्चू मिळालेला होताच. मॉस्कोच्या परिसरात लढणाऱ्या फील्ड मार्शल बॉकला १८ डिसेंबरला रजा देण्यात आली व फील्ड मार्शल क्लजने त्याची जागा घेतली.

पहिल्या पराभवाने माथे फिरलेल्या फ्यूररने आतापर्यंत ज्याने जर्मन सैन्याची शान व इभ्रत सतत वाढवली, त्या जनरल गुडेरीन या पॅन्झर तुकडीच्या सेनानीला २४ डिसेंबरला अधिकार सोडण्यास सांगितले.

आता सुप्रीम कमांडर झालेल्या फ्यूररला, रशियन स्वारीचे नेतृत्व करणारा कमांडर–इन्–चीफ फील्ड मार्शल ब्राऊश हादेखील आता डोळ्यांसमोर नको होता. १५ डिसेंबरला जातीने मॉस्कोपर्यंत जाऊन आघाडीचे निरीक्षण करून आल्यावर ब्राऊशची खात्री झाली होती, की तेथील परिस्थिती निराशाजनक आहे. मॉस्को लवकर घेणे शक्य नाही. त्याने हिटलरला ही गोष्ट १९ डिसेंबरला प्रत्यक्ष भेटीत

सांगितली. ब्राऊशला हिटलरने अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली व तो खोलीतून जाताच तो गोबेसजवळ उद्गारला—

" He is no soldier. He is a man of straw. It Branchitsch had remained at his post for another few weeks, things would have ended in catastrophe–"

( हा कसला सैनिक ? हा रडतराऊत आहे. हा आपल्या जागेवर आणखी थोडे आठवडे जरी राहिला असता, तरी आपले वाटोळे झाले असते. ]

कमांडर–इन–चीफची जागाही खाली झाली ! ब्राऊशच्या जागी कोणी येण्याचा प्रश्नच उत्पन्न होणार नव्हता. हिटलरने हे पदही आपल्याकडेच ठेवण्याचे ठरवले. १९ डिसेंबरला हिटलर कमांड–इन–चीफही झाला. व्हिएन्नाच्या रस्त्यात भटकणारे हे उनाड पोर–आता जर्मनीचा सर्वाधिकारी, युद्धमंत्री, सर्व सैन्याचा सुप्रीम कमांडर व लढणाऱ्या सैन्याचा आता कमांडर–इन–चीफ झाला.

## माघार नाही... हिटलरचा अघोर निश्चय

प्रत्यक्ष लढाईची सूत्रेही हिटलरच्या हाती जाताच आतापर्यंत सेनानींना प्रत्यक्ष रणांगणावर तरी जे स्वातंत्र्य होते, तेदेखील संपुष्टात आले. आता हे सेनानी म्हणजे हिटलरच्या आज्ञा खाली पोचवणारे फक्त पोस्टमन झाले.

हिटलरने सूत्रे हाती घेताच आज्ञा सोडली, 'वाटेल ते झाले तरी यापुढे सैन्य मागे घेतले जाता कामा नये.' सर्व आघाडयांवर यापुढे मागे हटण्याचा विचारच रहित झाला. या असुरी आज्ञेमुळे जी सैन्ये माघार घेऊन कदाचित वाचली असती व पुढे लढाईत अधिक उपयोगी पडली असती, ती जागचे जागी कोंडीत पकडली गेली व शरण गेली, अथवा मारली गेली! या आज्ञेबद्दल अनेक सेनानींनी युद्धानंतर हिटलरला दोष दिला आहे. परंतु काही सेनानींनी नेमक्या याच निर्णयाचा गौरव केलेला आढळतो.

प्रत्यक्ष आघाडीवर जनरल ब्रुमेंट्रिट लिहितो–

" हिटलरची ही काहीशी आक्रस्ताळी आज्ञाच त्या परिस्थितीत योग्य होती. कारण जर माघार घ्यायचे ठरवले असते, तर बर्फातून परतताना सर्व आघाडीच कोसळून जे नेपोलियनच्या सैन्याचे झाले, तेच जर्मन सैन्याचे झाले असते."

जर्मन सैन्यातील दुसरा एक सेनानी टिपलस्कर्श सांगतो.—

" It was Hitler's one great achievement. If they had once begun a retreat, it would have turned into a panic flight–"

[ हिटलरची ही आज्ञा त्याचे मोठे कर्तृत्वच ठरते. कारण जर एकदा माघार सुरू झाली असती, तर त्याला दाणादाण होऊन केल्या जाणाऱ्या पळापळीचे स्वरूप येणे शक्य होते. ]

१९४२ चा सबंध जानेवारी व फेब्रुवारी महिना हिटलरची सैन्ये मॉस्कोच्या

परिसरातून मागे रेटली जात होती. इंचाइंचाने जर्मन सैन्य मागे यत होते. मोठी माघार अशी मात्र नव्हती व पळापळी झालेली नव्हती. हिटलरच्या आज्ञेनुसार सैन्य मागे रेटले गेले, तरच मागे हटत होते. यासाठी सैनिकांची मोठी किंमत वेचली जात होती. जखमींची संख्या वाढत होती.

२८ फेब्रुवारी, १९४२ ला जर्मन सैन्य मॉस्कोपासून ७५ ते २०० मैलांच्या अंतरावर वेगवेगळ्या दिशेने मागे हटलेली होती. २,०२,२५१ सैनिक मारले गेले होते. ५,२५,६४२जखमी झाले होते व ४६,५११ बेपत्ता होते.

लढाई आता हिवाळ्यामुळे मंदावली होती व दोन्ही बाजू हिवाळ्यानंतरच्या लढायांचे आराखडे आता तयार करीत होत्या.

१९४२ साल हिटलरच्या कुंडलीत असे अशुभ उगवले. १९४१ साली वर्षअखेरीस फ्यूररचे सर्वच ग्रह एकदम फिरले होते. अशा अवस्थेत असताना जपानने हिटलरला मोठाच धक्का दिला. जपानला फक्त ब्रिटन व रशियाविरुद्ध युद्धात ओढण्याच्या हिटलरच्या प्रयत्नांना दाद न देता, जपानने ७ डिसेंबर, १९४१ रोजी अमेरिकेच्या पर्ल हार्बर बंदरावर अचानक हल्ला करून जगात हाहाकार उडवला होता. जे नको ते नेमके घडले होते–

–ब्रिटनच्या वतीने अमेरिका युद्धात ओढली गेली होती !

[ अपूर्ण ]

---

१ सप्टेंबर १९६५ : नाझी भस्मासुराने आरंभिलेल्या दुसऱ्या महायुद्धाला या दिवशी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. १ सप्टेंबरच्या येत्या 'माणूस' अंकात या चालू लेखमालेचा मोठा हप्ता यानिमित्त देण्यात येईल.–संपादक.

---

# नेहरू आणि सुभाष

## दोन थोर व्यक्तिमत्त्वांचा संघर्ष

[पृष्ठ २३ वरून चालू]

तोच अनुभव आला व ते काहीसे लाजाळू, संकोची व अंतर्मुख वृत्तीचे बनले. लाजाळूपणा पुढे त्यांनी प्रयत्नाने घालविला.

नेहरूंचे शालेय व कॉलेज शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. पाश्चात्त्य संस्कृतीचे व वातावरणाचे त्यांच्यावर लहानपणासून संस्कार झाले. सुभाषबाबूंचे प्राथमिक शिक्षण एका इंग्रजी माध्यमाच्या मिशनरी शाळेत अँग्लोइंडियन व युरोपियन मुलांबरोबर झाले. पुढचे शिक्षण मात्र कटकच्या दुसऱ्या शाळेत आणि कॉलेज-शिक्षण कलकत्त्यास झाले. आय. सी. एस् परीक्षेसाठी ते इंग्लंडला गेले आणि नेहरूंप्रमाणेच केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी त्यांना मिळाली. शाळेत सुभाषबाबूंचा क्रमांक बहुतेक पहिला असे; पण खेळांत ते फारसा भाग घेत नसत. उलट नेहरूंना खेळांची आवड होती. आपले दोष, आपल्या उणिवा प्रयत्नपूर्वक सुधारण्याचा निर्धार सुभाषबाबूंमध्ये लहानपणापासूनच दिसतो. प्राथमिक शिक्षण मिशनरी शाळेत झाल्याने सुभाषबाबूंचे इंग्रजी सुधारले, पण मातृभाषा बंगालीत ते मागे पडले. दुसऱ्या शाळेत गेल्यावर पहिल्याच दिवशी शिक्षकांनी बंगालीमध्ये एक निबंध लिहायला सांगितला. सुभाषबाबूंच्या निबंधात व्याकरणाच्या एवढ्या चुका होत्या, की शिक्षकांनी तो वाचून दाखविला, तेव्हा त्यातील चुकांना सारा वर्ग हसताना पाहून त्यांना फार वाईट वाटले. बंगाली सुधारण्याचा त्यांनी निर्धार केला आणि वार्षिक परीक्षेत त्या विषयात सर्वात जास्त गुण त्यांनी मिळविले. नेहरूंच्या शालेय जीवनात अशी प्रयत्नपूर्वक धडपड आढळत नाही.

### सुभाषबाबूंचा मानसिक संघर्ष

शालेय जीवनाची पाच-सहा वर्षे सुभाषबाबूंनी मानसिक संघर्षात घालविली. मानवी जीवनाच्या मुळाशी कोणते मध्यवर्ती तत्त्व आहे, याचा शोध घेण्याची त्यांना ओढ लागली. याच काळात स्वामी विवेकानंदांची पुस्तके त्यांनी वाचली. स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या संबंधीचेही वाङ्मय वाचले. समाजसेवेसाठी, मोक्षासाठी सर्व ऐहिक सुखांचा त्याग करण्याचे ध्येय त्यांनी डोळ्यांपुढे ठेवले. योगसाधनेचे प्रयोग केले. यात्रा केल्या. साधूंच्या नादी लागले. शाळेच्या अभ्यासात त्यांचे मन रमेना. तरीही मॅट्रिक परीक्षेत सबंध विद्यापीठात ते दुसरे आले. असा मानसिक झगडा व ध्येयवादी जीवनाची ओढ नेहरूंच्या शालेय जीवनात दिसून येत नाही.

सुभाषबाबूंचा गुरूचा शोध कॉलेज–जीवनातही चालू होता. त्यासाठी त्यांनी यात्रा केल्या, पण गुरूचा लाभ झाला नाही. अभ्यासाकडे विशेष लक्ष न देताही इंटरच्या परीक्षत त्यांनी पहिला वर्ग मिळविला. बी. ए. साठी तत्त्वज्ञान हा आवडीचा विषय सुभाषबाबूंनी घेतला आणि प्रथमच त्यांना अभ्यासात गोडी वाटू लागली. पण एका घटनेने त्यांच्या आयुष्याला निराळे वळण लागले. एका ब्रिटिश प्राध्यापकाने सुभाषबाबूंच्या काही सहकाऱ्यांना मारहाण केली. वर्गाचा प्रतिनिधी या नात्याने सुभाषबाबूंनी प्रिन्सिपॉलपुढे त्या विद्यार्थ्यांची बाजू घेतली. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला. काही दिवसांनी काही विद्यार्थ्यांनी त्या ब्रिटिश प्राध्यापकावर हल्ला केला. सुभाषबाबूंचा त्यात संबंध नव्हता. तरीही या प्रकरणाचे पर्यवसान कॉलेजमधून त्यांना काढून टाकण्यात झाले. त्यांच्या शिक्षणात खंड पडला, पण लढ्याच्या नेतृत्वाचा अनुभव त्यांना मिळाला. दोन वर्षांनी दुसऱ्या एका कॉलेजात त्यांना प्रवेश मिळाला. यावेळी त्यांनी यू. टी. सी. मध्येही प्रवेश केला. या लष्करी शिक्षणाचा पुढे आझाद हिंद फौजेचे नेतृत्व करताना त्यांना उपयोग झाला.

बी. ए. झाल्यानंतर एम्. ए. साठी सुभाषबाबूंनी मानसशास्त्र हा विषय घेतला होता; पण काही महिन्यांनी वडिलांनी त्यांना इंग्लंडला आय. सी. एस. साठी पाठविले. केंब्रिज विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळाला. तेथेही त्यांनी यू. ओ. टी. सी. मध्ये प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला, पण हिंदी विद्यार्थी म्हणून आपणास प्रवेश नाकारला जात आहे, असा अनुभव त्यांना आला. आय. सी. एस. परीक्षेसाठी इंग्लिश, संस्कृत, तत्त्वज्ञान, इंग्लिश कायदा, राज्यशास्त्र, अर्वाचीन युरोपचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास, अर्थशास्त्र व भूगोल असे नऊ विषय होते. यांपैकी युरोपच्या इतिहासाच्या अभ्यासाचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अंतःप्रवाह समजून घेण्याचे दृष्टीने त्यांना फार उपयोग झाला. एक पेपर पुरा लिहून झाला नसताही परीक्षेत त्यांचा चौथा नंबर आला.

## आय्. सी. एस्. चा राजीनामा

आय्. सी. एस्. चा अभ्यास करीत असतानाच त्यांच्या मनात संघर्ष चालू होता. वडिलांच्या इच्छेनुसार ते या परीक्षेसाठी आले होते. परीक्षा पास झाल्यावर मोठा पगार व अधिकाराची जागा त्यांना मिळाली असती, पण ब्रिटिश सरकारची नोकरी करायची नाही, त्या यंत्राचे एक चाक व्हावयाचे नाही; राजकारण व सार्वजनिक कार्यास वाहून घ्यावयाचे असा निर्णय घेऊन त्यांनी आय्. सी. एस्. चा राजीनामा दिला.

सुभाषबाबूंच्या मानाने नेहरूंचे कॉलेज–जीवन संथ व शांत गेले. 'फारसे खळबळजनक काही न घडता पार पडलेली तीन शांत वर्षे,' असे त्याचे वर्णन नेहरूंनी स्वतःच आत्मचरित्रात केले आहे. सुभाषबाबूंचा तत्त्वज्ञानाकडे ओढा, तर नेहरूंचा

विज्ञानाकडे ओढा. रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र व वनस्पतिशास्त्र हे विषय त्यांनी घेतले होते. त्यावेळच्या आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनाबद्दल पंडितजी आत्मचरित्रात लिहितात, "मी त्यावेळी उथळ होतो. कोणत्याही गोष्टीचा सखोल विचार करीत नसे. जीवनातील सौंदर्याकडे मी आकर्षित होई...पूर्ण आणि अनेकांगी जीवनाची, तसेच धोका आणि साहसाची मला आवड होती." ठराविक चाकोरीतून जाणाऱ्या सुरक्षित जीवनाचे आकर्षण दोघांनाही नव्हते हे खरे, पण तरी दोघांच्या वृत्तीत फरक होता. सुभाषबाबू शालेय जीवनापासूनच ध्येयवादी होते व त्यासाठी प्रयत्नपूर्वक सर्वांगीण तयारी करीत होते. नेहरूंच्या जीवनात अजून ध्येयवादाने प्रवेश केलेला नव्हता. नेहरूंनी आय्. सी. एस्. ला जावे, अशी सूचना करण्यात आली होती; पण एक तर नेहरूंचे वय कमी होते. आय्. सी. एस्. साठी त्यांना आणखी तीन–चार वर्षे इंग्लंडमध्ये थांबावे लागले असते. तसेच आय. सी. एस्. झाल्यावर दूरच्या ठिकाणी नेमणूक होण्याचा संभव होता. इतकी वर्षे दूर राहिल्यानंतर आईबापांना मुलगा जवळ हवा होता. म्हणून त्यांनी बॅरिस्टर होण्याचे ठरविले; पण आय्. सी. एस्. होऊन ब्रिटिश नोकरशाहीच्या यंत्राचे एक चाक होण्याची कल्पना त्यावेळी तरी त्यांना वावगी वाटली नव्हती, हे नेहरूंनी स्वतःच्या आत्मचरित्रात कबूल केले आहे.

## काँग्रेसचा संशोधन विभाग असावा.

आय्. सी. एस. चा राजीनामा दिल्यानंतर पुढे काय करावयाचे याचा सल्ला घेण्यासाठी सुभाबाबूंनी चित्तरंजनदास यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेसबद्दलच्या आपल्या काही स्पष्ट कल्पना मांडल्या आहेत. काँग्रेसचा एक कायम स्वरूपाचा संशोधन व माहिती विभाग असावा. देशापुढील प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर संशोधनपूर्वक माहिती जमा करून काँग्रेसने आपले धोरण निश्चित करावे. काँग्रेसचे एक प्रचारखाते असावे. निरनिराळ्या प्रश्नासंबंधी काँग्रेसचे धोरण विशद करणारी पुस्तके सर्व प्रादेशिक भाषांत या खात्याने प्रसिद्ध करावीत अशा सूचना त्यांनी या पत्रात केल्या आहेत. ब्रिटिश राजवट खाली ओढण्याच्या कार्यात काँग्रेस गुंतली असल्याने सध्या रचनात्मक किंवा विधायक कार्य करणे शक्य नाही, या युक्तिवादास उत्तर देताना चित्तरंजन दास यांना लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात सुभाषबाबू म्हणतात, "विनाशाचे कार्य आता सुरू असतानाच निर्मितीचे कार्य आता सुरू केले पाहिजे राष्ट्रीय जीवनाच्या कोणत्याही प्रश्नावर धोरण ठरविताना दीर्घकाळ विचार व संशोधन करावे लागेल. तेव्हा आतापासूच संशोधनाला सुरवात केली पाहिजे. काँग्रेस पूर्ण कार्यक्रमाची आखणी करू शकली, तर स्वराज्य मिळाल्यावर एखाद्या प्रश्नावर कोणते धोरण स्वीकारावयाचे याची काळजी आपणास करावी लागणार नाही." सुभाषबाबूंचे हे पत्र १९२१ सालचे आहे. वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी सुभाषबाबू काँग्रेसच्या चळवळीचा आणि देशाच्या भवितव्याचा केवढ्या दूरदृष्टीने विचार करीत

होते, याची यावरूनच कल्पना येईल. नेहरूंनी काँग्रेसच्या चळवळीत भाग घेण्यास सुरवात केली होती, पण ते अजून या यादृष्टीने विचार करू लागले नव्हते.

काँग्रेसच्या संशोधन – विभागाची कल्पना सुभाषबाबूंनी मांडली खरी, पण त्यांनाही ती मूर्त स्वरूपात आणता आली नाही. ही कल्पना मांडल्यावर १७ वर्षांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली, तेव्हा त्यांनी राष्ट्रीय नियोजन समिती स्थापन केली व नेहरूंना तिचे अध्यक्ष नेमले, पण काँग्रेसच्या चळवळी व तुरुंगवासामुळे या कार्यात खंड पडला. सुभाषबाबूंची ही योजना मूर्त स्वरूपात आली असती तर स्वातंत्र्यात निर्माण झालेले अनेक प्रश्न आपण यशस्वीरीतीने सोडव शकलो असतो.

## सुभाष-गांधी मतभेद

भारतात परल्यावर आपल्या राजकीय कार्याला सुरवात करण्यापूर्वी सुभाषबाबूंनी जुलै १९२१ मध्ये प्रथम महात्मा गांधींची भेट घेतली. दोघांचे मतभेद त्या पहिल्या भेटीतच स्पष्ट झाले. अहिंसा ही महात्माजींची जीवननिष्ठा होती, पण परकीय सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी शस्त्रबळाचा वापर करणे आवश्यक आहे, असे सुभाषबाबूंचे मत होते. आपली मते लपवून न ठेवता त्या पहिल्याच भेटीत त्यांनी गांधीजींपुढे स्पटपणे मांडली होती. सुभाषबाबूंना गांधीजींनी पुढे विरोध केला; त्याचा उगम या पहिल्या भेटीत आहे. सुभाषबाबूंचा शस्त्रबळावर विश्वास असला तरी गांधीजींच्या असहकारचळवळीचे महत्त्व ते कमी लेखीत नव्हते. या चळवळीत ते स्वत: सामील झाले, पण या चळवळीचे यशाला मर्यादा आहेत, याची जाणीव होती. शस्त्रबळावर त्यांचा विश्वास असला तरी दहशतवादी मार्गाकडे ते वळले नाहीत, हेही लक्षात घेतले पाहिजे. शस्त्रबळाचा वापर त्यांना कोणत्या प्रकारे अभिप्रेत होता, हे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद फौज उभारून त्यांनी दाखवून दिले. नेहरूंनाही गांधीजींची अहिंसा पूर्णपणे पटत नव्हती, पण आपण कितीही शस्त्रे जमविली, तरी ब्रिटिशांच्या प्रबळ लष्करी सामर्थ्यापुढे आपला सशस्त्र प्रतिकार तोकडाच ठरणार असे त्यांना वाटत होते. सशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाबद्दल सुभाषबाबूंइतका खोलवर विचार त्यांनी केला नव्हता.

भारतात आल्यावर पहिली काही वर्षे चित्तरंजनदास यांचे सहकारी म्हणून सुभाषबाबूंनी कार्य केले. बंगाल नॅशनल कॉलेजचे प्रिन्सिपॉल, बंगाल प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रसिद्धी अधिकारी व स्वयंसेवक दलाचे प्रमुख अशा जबाबदारीच्या जागांवर त्यांनी काम केले, पण तुरुंगवासामुळे या कामात खंड पडला. मुक्ततेनंतर स्वराज्य पक्षाच्या 'फॉरवर्ड' पत्राचे ते व्यवस्थापक झाले व बंगाल प्रदेश काँग्रेस कमिटीच्या चिटणीसपदी त्यांची निवड झाली. स्वराज्यपक्षाने विधिमंडळाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थातही प्रवेश करण्याचे ठरविले. कलकत्ता कॉर्पोरेशनच्या मार्च १९२४ मधील निवडणुकीत स्वराज्य पक्षाने प्रचंड विजय मिळविला. चित्तरंजनदास यांची

मेयरपदी निवड झाली आणि सुभाषबाबूंची कॉर्पोरेशनचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून नेमणूक झाली. दास-बोस जोडीने कॉर्पोरेशनचे स्वरूपच पालटून टाकले, पण हे कार्य त्यांना फार दिवस करता आले नाही. सरकारने ऑक्टोबर, १९२४ मध्ये सुभाषबाबूंना अटक केली, पण कलकत्ता कॉर्पोरेशनचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर या जागेवर काम करताना त्यांना एक नवा अनुभव मिळाला. निर्णय घेणे सोपे असते, पण त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी फार कठीण असते. कार्यक्षम अधिकारी कसा असावा, याचा आदर्शच सुभाषबाबूंनी घालून दिला. नगरपालिकेच्या क्षेत्रात नेहरूंनीही कार्य केले. अलाहाबाद नगरपालिकेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती, पण त्यांना मिळालेला अनुभव लोकनियुक्त प्रतिनिधीच्या कार्याचा होता. सुभाषबाबूंप्रमाणे एखाद्या मोठ्या जागेवर प्रशासक–अधिकारी म्हणून कार्य करण्याचा अनुभव व संधी नेहरूंना मिळाली नव्हती. तशी ती मिळाली असती, तर नोकरशाही मनोवृत्तीचे दर्शन त्यांना अधिक जवळून झाले असते आणि स्वातंत्र्यानंतर नोकरशाहीची पुनर्घटना करण्याची आवश्यकता पटली असती. आपल्या राज्यकारभारातील अनेक दोष हे आवश्यक सुधारणा न केल्यामुळे निर्माण झालेले आहेत. सुभाषबाबूंनी ही सुधारणा केली असती, असे वाटते.


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे २

**म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करोनि प्राप्त ।**
**ते कर्म हेतुरहित । आचर तूं ।। श्रीज्ञानेश्वरी**

### स्वतंत्र भारत चिरायु होवो

स्वातंत्र्यदिनाच्या मंगल प्रसंगी आमच्या सर्व भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा. बृहन्महाराष्ट्रातील मध्यम वर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वीरीतीने चालू असलेला हा साखर व स्पिरिटचा कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय !

**गो. श्री. वाळिंबे,** बी. कॉम.
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

**शं. ल. लिमये,** बी. एस्सी. एल्एल्. बी.
अध्यक्ष.

## डाव्या–उजव्यांचा पहिला झगडा

नेहरू-सुभाष सहकार्याला सुरवात १९२७-२८ पासून झाली. १९२७ च्या मद्रास काँग्रेसमध्ये नेहरू, सुभाषबाबू आणि कुरेशी यांची सरचिटणीसपदी निवड झाली. इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या स्थापनेतही हे दोन नेते एकत्र आले. संपूर्ण स्वातंत्र्य हे तावडतोबीचे व मूलभूत ध्येय म्हणून काँग्रेसला मान्य करायला लावणे, हा या लीगच्या स्थापनेचा उद्देश होता. १९२८ साली कलकत्ता काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वातंत्र्य की वसाहतीचे स्वराज्य, या प्रश्नावर डाव्या-उजव्यांचा पहिला मोठा संघर्ष झाला. सर्वपक्षीय नेहरू-रिपोर्टांत शिफारस केल्याप्रमाणे ब्रिटिश सरकारने एक वर्षात वसाहतीचे स्वराज्य दिले नाही, तर काँग्रेस अहिंसात्मक असहकाराचा लढा सुरू करील, असा ठराव महात्मा गांधींनी मांडला. त्यावर वसाहतीचे स्वराज्यास विरोध करणारी उपसूचना सुभाषबाबूंनी मांडली. नेहरूंनी तिला पाठिंबा दिला. उपसूचना ९७३ विरुद्ध १३५० मतांनी फेटाळली गेली. ठराव फेटाळला गेला, तर गांधीजी काँग्रेसमधून निवृत्त होतील, असा प्रचार गांधीजींच्या अनुयायांनी केला होता. त्याचाही परिणाम ठरावाचे बाजूने अधिक मते पडण्यात झाला; पण डाव्या गटाचे वजन व सामर्थ्यही बरेच असल्याचे दिसून आले.

## गांधीनिष्ठा की तत्त्वनिष्ठा

सुभाषबाबूंच्या उपसूचनेस नेहरूंनी पाठिंबा दिला खरा, पण गांधीजींबद्दलची निष्ठा आणि आपली तत्त्वे यात संघर्ष उद्‌भवला, तर नेहरू तत्त्वाचा आग्रह सोडून गांधीनिष्ठेला बळी पडतात, असे लवकरच दिसून आले. लाहोर काँग्रेसपूर्वी काही महिने लॉर्ड आयर्विन यांनी गोलमेजपरिषदेची घोषणा केली. तिचा विचार करण्यासाठी दिल्लीस राजकीय पुढाऱ्यांची बैठक झाली. त्यांनी एक जाहीरनामा काढून काही अटींवर सहकार्याची तयारी दर्शविली. सुभाषबाबूंनी या जाहीरनाम्यावर सही करण्याचे स्पष्टपणे नाकारले. नेहरूंनीही प्रथम नकार दिला, पण अखेर गांधीजी व वडिलांच्या दडपणामुळे सही केली, पण तत्त्वापासून आपण माघार घेतली, यामुळे त्यांचे मन अस्वस्थ होते. गांधीजींना पत्र लिहून काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शविली, पण गांधीजींनी त्यांना शांत केले. नेहरू आणि सुभाषबाबू यांच्या मनोवृत्तीमधील भेद या घटनेत स्पष्टपणे दिसून आला. आपली भूमिका तत्त्वत: बरोबर असूनही गांधीजींना विरोध करण्याचा प्रसंग आला, की नेहरू कच खात, माघार घेत. सुभाषबाबू मात्र ठामपणे विरोध करीत.

लाहोर अधिवेशनातच याचे प्रत्यंतर आले. संपूर्ण स्वातंत्र्य हे आपले ध्येय असल्याचे काँग्रेस जाहीर करीत असून, ते साध्य करण्यासाठी विधिमंडळावर बहिष्कार, सविनय कायदेभंग व करबंदीची चळवळ हाती घेण्यात येईल, अशा आशयाचा ठराव गांधीजींनी मांडला. 'संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटनशी पूर्णपणे संबंध तोडणे,' अशी दुरुस्ती सुभाषबाबूंनी सुचविली. सविनय कायदेभंगाच्या जोडीला स्थानिक

काँग्रेस कमिट्यांवर आधारलेली प्रतिसरकारे स्थापन करण्यात यावीत आणि लढ्यासाठी कामगार, शेतकरी व युवकांची परिणामकारक संघटना उभारावी, असा लढ्याचा कार्यक्रम त्यांनी सुचविला होता. ब्रिटिश सरकारशी कोणत्याही परिस्थितीत वाटाघाटी करावयाच्या नाहीत, असा त्यांचा आग्रह होता. यापैकी प्रतिसरकारची कल्पना गांधीजींनी अव्यवहार्य म्हणून अमान्य केली. अवघ्या एक हजार खेड्यांतसुद्धा काँग्रेसध्वज फडकत नाही, असा शब्दांत काँग्रेसच्या मर्यादित सामर्थ्याकडे त्यांनी लक्ष वेधले. या महत्त्वाच्या चर्चेत नेहरू काहीच बोलले नाहीत. सुभाषबाबूंच्या भूमिकेबद्दल त्यांना सहानुभूती होती, पण काँग्रेस अध्यक्ष या नात्याने गांधीजी व वर्किंग कमिटी यांना उघड विरोध करणे त्यांना अवघड वाटले. गांधीजींचा ठराव पास झाला. सुभाषबाबूंनी 'काँग्रेस डेमोक्रेटिक फॅक्शन' नांवाचा काँग्रेस-अंतर्गत गट स्थापन केला.

नेहरूंनी चर्चेत भाग घेतला नाही, तरी अध्यक्षीय भाषणात त्यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले. आपण समाजवादी व प्रजासत्ताकवादी असल्याचे त्यांनी सांगितले. समाजवादाचा पूर्ण कार्यक्रम काँग्रेस आता हाती घेऊ शकत नाही, पण भारताला त्या दिशेने जावे लागेल, असे त्यांनी प्रतिपादले. वसाहतीचे स्वराज्यास त्यांनी विरोध केला, पण ब्रिटनशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा मार्ग मोकळा ठेवला. साम्राज्यवादाचे पूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय भारत कॉमनवेल्थचा समान दर्जाचा सभासद होऊ शकणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. अहिंसेच्या प्रश्नावर गांधीजींशी आपले मतभेद दर्शविताना ते म्हणाले, "आपल्यापैकी बहुसंख्य लोक या प्रश्नाचा विचार नैतिक भूमिकेवरून नव्हे तर व्यावहारिक भूमिकेवरून करतात. हिंसेच्या मार्गाने भरीव यश मिळण्याची शक्यता आज दिसत नाही, म्हणूनच तो आम्ही फेटाळतो, पण हिंसेच्या मार्गानी दास्यातून आपली मुक्तता होईल असे काँग्रेसचे मत झाले तर ती त्या मार्गांचा अवलंब करील याबद्दल मला शंका नाही. हिंसा वाईट आहे पण गुलामगिरी त्यापेक्षाही वाईट आहे."

### विचार दिले, कार्यक्रम दिला नाही

सुभाषबाबूंनी सुचविलेली प्रतिसरकारची कल्पना त्यावेळच्या परिस्थितीत अव्यवहार्य असेल, पण ती त्याज्य होती, असे म्हणता येणार नाही. कायदेभंगाच्या चळवळीच्या मर्यादा स्पष्ट दिसू लागल्या होत्या. प्रतिसरकारची स्थापना आणि कामगार, शेतकरी व युवकांची परिणामकारक संघटना हा सुभाषबाबूंचा कार्यक्रम चळवळीचा निश्चितच पुढचा टप्पा सुचवीत होता. नेहरूंनी अध्यक्षीय भाषणात समाजवादाचा पुरस्कार केला, पण कामगार-शेतकऱ्यांच्या संघटना उभारण्यावर भर दिला नाही. हिंसेच्या मार्गाने यशाची शक्यता आज दिसत नाही, म्हणूनच आम्ही अहिंसा स्वीकारली, अशी स्पष्ट कबुली त्यांनी दिली. नेहरूंनी देशाला विचार दिले, पण ते कृतीत आणण्याचा कार्यक्रम दिला नाही, त्याचे प्रत्यंतर त्यांच्या


लाहोर भाषणापासूनच येते. नेहरू समाजवादी असले तरी कृतीने गांधीवादी मार्गाच्या पुढे जाण्यास तयार नव्हते. सुभाषबाबूंनी कामगार, शेतकरी व युवकांच्या संघटना उभारण्यावर दिलेला भर चळवळीच्या यशाचे दृष्टीने महत्त्वाचा होता. समाजवादाचा केवळ विचार मांडून न थांबता समाजवादी चळवळीच्या कार्यक्रमाचे दिशेने ते पुढे जाऊ इच्छित होते.

संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटनशी पूर्णपणे सबंध तोडणे, असे सुचविण्यामागें सुभाषबाबूंना काय अभिप्रेत होते ? भारताने कॉमनवेल्थचे सभासद राहू नये असे त्यांना वाटत होते. साम्राज्याचे उच्चाटन झाल्याशिवाय कॉमनवेल्थमध्ये समान दर्जाचा सभासद म्हणून भारत राहू शकणार नाही, असे मत नेहरूंनी मांडले; पण ही भूमिका त्यांनी शेवटपर्यंत टिकविली नाही. भारत स्वतंत्र झाला तेव्हा इतर अनेक ब्रिटिश वसाहती परतंत्र होत्या तरीही कॉमनवेल्थचे सभासदत्व त्यांनी स्वीकारले. तसे करण्याची आवश्यकता होती काय ? शेजारचा ब्रह्मदेश कॉमनवेल्थबाहेर पडल्याने त्याचे काही विशेष नुकसान झाले आणि भारताचा काही विशेष फायदा झाला असे म्हणता येणार नाही. आपल्या सभासदत्वाला ब्रिटन काही महत्त्व देत होते असेही नाही. सुएझ आक्रमणाच्या योजना आखताना भारताला पूर्णपणे अंधारात ठेवण्यात आले. कॉमनवेल्थबाहेर पडण्याने जागतिक राजकारणात आपणाला अधिक स्वतंत्र स्थान व प्रतिष्ठा मिळविता आली असती. तेव्हा सुभाषबाबूंची भूमिका योग्यच होती.

## निर्णय घेण्याचे सामर्थ्य नाही

ऑगस्ट १९३३ मध्ये तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर नेहरूंनी पुण्यास गांधीजींची भेट घेतली. त्यावेळी झालेल्या चर्चेत अंतिम ध्येय एक, पण मार्गाबद्दल दोघात मतभेद दिसून आले. सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी सक्ती करणे भाग पडेल, असे नेहरूंचे त्यावेळी मत होते, तर मतपरिवर्तनानेच हे बदल घडवून आणले पाहिजेत, असा गांधींचा आग्रह होता. साध्य—साधनांचे वादात साधनशुचितेवर गांधीजींचा भर होता तर नेहरू साध्याला अधिक महत्त्व देत होते. तात्त्विक चर्चेचा प्रत्यक्ष ज्वलंत प्रश्न सोडविण्यास काही उपयोग नाही, अशी टीका सुभाषबाबूंनी केली. नेहरूबद्दलच्या आपल्या अपेक्षा व्यक्त करताना ते लिहितात, " महात्माजींच्या खालोखाल नेहरूंइतकी लोकप्रियता कोणी मिळविलेली नाही. देशबांधवांमध्ये अढळ प्रतिष्ठा त्यांनी मिळावली आहे. त्यांचे विचार स्पष्ट असून आधुनिक जागतिक चळवळीचे त्यांना अद्ययावत ज्ञान आहे."

**" अशा परिस्थितीत निर्णय घेण्याचे व त्यासाठी प्रसंगी लोकांच्या अप्रियतेस तोंड देण्याचे सामर्थ्य हा नेत्याचे अंगी आवश्यक असणारा गुण त्यांच्यात आढळू नये, हे निराशाजनक आहे. "**



सुभाषबाबूंनी नेहरूंवर केलेली ही टीका किती बरोबर होती, याचा प्रत्यय पुढे अनेक प्रसंगी आला.

## अध्यक्ष डावा, पण सूत्रे उजव्याकडे

काँग्रेसच्या अध्यक्षपदी १९३६ साली नेहरूंची निवड झाली. अध्यक्षीय भाषणात आपली समाजवादी भूमिका त्यांनी पुन: एकदा मांडली, पण लाहोर भाषणापेक्षा एक पाऊल पुढे जाऊन राष्ट्रीय चळवळीने कामगार व शेतकरी संघटनांशी सहकार्य करून साम्राज्यशाहीविरोधी संयुक्त आघाडी उभारली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. इंग्लंडमधील मजूर पक्षाप्रमाणे कामगारसंघटना व किसानसभा यांना काँग्रेसचे सामुदायिक सभासदत्व द्यावे, असा ठराव त्यांनी मांडला, पण तो फेटाळला गेला. संस्थानी प्रजेच्या चळवळीत काँग्रेसने प्रत्यक्ष भाग घ्यावा, हा नेहरूंचा प्रयत्नही असफल होऊन चळवळीला अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याची गांधीजींची भूमिकाच मान्य करण्यात आली. अध्यक्ष डाव्या मताचा, पण धोरणाची सूत्रे उजव्याकडे, असे दृश्य लखनौला दिसले. उजव्या गटाचे हे प्रभुत्व लक्षात घेता नेहरूंनी वर्किंग कमिटीतही उजव्या गटाला प्रभुत्व दिले; पण एवढ्यानेही उजव्या गटाचे समाधान झाले नाही. नेहरूंनी आपल्या भाषणातूनसुद्धा समाजवादाचा पुरस्कार करू नये, अशी त्यांची अपेक्षा होती. काँग्रेसने समाजवादाचा स्वीकार केलेला नसता असा पुरस्कार करणे देशहिताचे नाही, असे पत्र लिहून राजेंद्रप्रसाद, पटेल वगैरे वर्किंग कमिटीच्या सहा सभासदांनी राजीनामे पाठविले. नेहरूंना हे पत्र एवढे लागले, की त्यांनी स्वत:च राजीनामा देण्याचे ठरविले, पण गांधीजींच्या मध्यस्थीने हा पेचप्रसंग त्यावेळी मिटला. १९३७ साली नेहरूंची पुन: अध्यक्षपदी निवड झाली. सरदार पटेल उभे राहणार होते, पण गांधीजींच्या इच्छेनुसार त्यांनी माघार घेतली, पण नेहरू अध्यक्ष

झाले तरी पक्षयंत्रणेची सूत्रे उजव्या गटाचेच हाती राहतील, हे त्यांनी स्पष्ट केले. " काँग्रेसच्या अध्यक्षाला काही हुकूमशहाचे अधिकार नाहीत...काँग्रेसचे निर्णय तो अमलात आणतो. कोणत्याही व्यक्तीची अध्यक्षपदी निवड केल्याने काँग्रेस आपले अधिकार गमावीत नाही, " असे पत्रक त्यांनी काढले. आपल्या दोन वर्षांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत काँग्रेसच्या कार्यक्रमाला व कार्यपद्धतीला डावे वळण देण्याचे दृष्टीने नेहरू काही करू शकले नाहीत. १९३७ चे कायद्यास विरोध करण्याच्या धोरणाबद्दल तर त्यांना उजव्या गटाचे दडपणापुढे एकेक पाऊल मागे घ्यावे लागले. कायद्यास विरोध असता निवडणुका लढविणे त्यांना पसंत नव्हते, पण निवडणुका लढवण्याचे ठरले. अधिकारस्वीकारालाही त्यांचा विरोध होता, पण त्याबाबतीतही त्यांना माघार घ्यावी लागली.

**त्रिपुरी काँग्रेसमधील झगडा**

यापुढची दोन वर्षे सुभाषबाबूंच्या अध्यक्षपदाची होती. त्यांपैकी पहिल्या वर्षी विशेष घडामोडी झाल्या नाहीत; पण त्रिपुरी काँग्रेसचे वर्ष अध्यक्षीय निवडणुकीपासूनच डाव्या-उजव्यांच्या लढ्याने गाजले. पट्टाभींविरुद्ध निवडणूक लढवून सुभाषबाबू निवडून आले. पट्टाभींचा पराभव हा माझा पराभव आहे, असे पत्रक गांधीजींनी त्यावेळी काढले. उजव्या गटाच्या नेत्यांनी याचा घ्यावयाचा तो अर्थ घेतला आणि काँग्रेसची सूत्रे आपल्या हाती टिकविण्यासाठी हालचाली सुरू केल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारा आणि सुभाष-


४%
बचत खात्यावरील नवीन
आकर्षक व्याज.
मुदतठेवींवर-जास्तीतजास्त ७½%
मुदतीप्रमाणें
MB
657
दि बँक ऑफ
महाराष्ट्र लिमिटेड

बाबूंनी वर्किंग कमिटीची निवड त्यांच्या सल्ल्याने करावी, असा आदेश देणारा ठराव पंडित गोविंदवल्लभपंत यांनी त्रिपुरी काँग्रेसमध्ये मांडला व तो बहुमताने पास झाला. वर्किंग कमिटी निवडण्याच्या काँग्रेस अध्यक्षाच्या अधिकारावर निर्बंध घालणारा ठराव उघडउघड लोकशाही-विरोधी होता. पंडित नेहरू या ठरावावर तटस्थ राहिले. काँग्रेस समाजवादी पक्षही तटस्थ राहिला. गांधीजींना या वादात ओढण्याचे काही कारण नव्हते. पण गांधीजींवरील विश्वासाचा प्रश्न उपस्थित केल्याशिवाय डाव्यांचा पराभव आपण करू शकणार नाही, असे उजव्या गटास वाटत होते. नेहरूंचा तर सुभाषबाबूंच्या निवडणुकीसच विरोध होता. "पट्टाभींविरुद्ध तुम्ही निवडून याल, पण गांधीवादाविरुद्ध सरळ लढयात तुम्ही काँग्रेसला आपल्याबरोबर कितपत नेऊ शकाल, याची मला शंका होती," असे आपल्या विरोधाचे कारण सुभाषबाबूंना लिहिलेल्या एका पत्रात नेहरूंनी दिले आहे. तुम्ही निवडून आल्याने गांधीजींबरोबर फूट पडली असती, मला ते नको होते, असेही त्यांनी म्हटले आहे.

### ऐक्य कृतीचे हवे, निष्क्रियतेचे नव्हे

काँग्रेसची एकी टिकविण्याच्या या मुद्याबद्दल सुभाषबाबू नेहरूंना एका पत्रात लिहितात, "ज्या ऐक्यासाठी झटायचे ते ऐक्य कृतीचे हवे, निष्क्रियतेचे नव्हे. अलीकडे आपण ऐक्याचे फारच स्तोम माजवीत


बालकांना शुभ–प्रसंगी भेट देण्यास योग्य

सचित्र आणि आकर्षक मुखपृष्ठ असलेली

**सुबोध गोष्टींची नवी पुस्तके**


| | | |
|---|---|---|
| १. उत्कल–प्रसंग | : ले. श्रीपाद जोशी | रु. १·५० |
| २. मुलांचे रवींद्रनाथ | : ले. श्रीपाद जोशी | रु. १·५० |
| ३. बोलके कुत्रे आणि इतर गोष्टी | : ले. प्रभाकर बेंद्रे | रु. ०·७५ |

**अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २**

दादर बुक डेपो, रानडे रोड, मुंबई २८

आहोत. कमकुवतपणा लपविण्यासाठी किंवा प्रतिगामी तडजोडी घडवून आणण्यासाठी त्याचा उपयोग केला जाण्याचा धोका आहे. तुमचे स्वतः-चेच उदाहरण घ्या. गांधी–आर्यविन कराराला तुमचा विरोध होता, पण ऐक्यासाठी तुम्ही त्याला मान्यता दिलीत. प्रांतात अधिकारग्रहणास तुमचा विरोध होता, पण याच सबबीवर तीही गोष्ट तुम्ही मान्य केलीत." सुभाषबाबूंनी मांडलेला हा मुद्दा आजच्या परिस्थितीतही महत्त्वाचा आहे. बंगलोर येथे नुकत्याच भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत सर्व ठराव एकमताने पास करण्याची विनंती पंत-प्रधान शास्त्रींनी केली व ती मान्य झाली; पण हा ऐक्याचा पोकळ देखावा होता. सुभाषबाबूंना असे निष्क्रिय, कमकुवतपणा लपविणारे ऐक्य नको होते. नेहरू स्वतःची बाजू वास्तविक आहे, त्यापेक्षा कमकुवत सम-जतात. आपल्या स्थानाचा व शक्तीचा पूर्ण उपभोग करीत नाहीत, अशी त्यांची टीका होती. त्रिपुरीची अध्यक्षीय निवडणूक सुभाषबाबूंनी जिंकली, पण सर्व डाव्या गटांनी त्यांना साथ न दिल्याने डाव्यांच्या चळवळीच्या वाढीची मोठी संधी गमावली.

यानंतर सुभाषबाबूंनी पुरोगामी गट स्थापन केला. सर्व डाव्यांना एकत्र आणणे हा या गटाचा उद्देश होता, पण डाव्या चळवळीतला आणखी एक गट होण्यापलीकडे पुरोगामी गट काही करू शकला नाही. याचे कारण निश्चित धोरण व कार्यक्रमाच्या पायावर डाव्यांची एकजूट घडवून आणण्याचा प्रयत्न सुभाषबाबूंनी केला नाही. अशा कार्यक्रमाची स्पष्ट रूपरेषा त्यांच्यापुढेही नव्हती. काँग्रेसमधून बाहेर पडल्या-पासून आझाद हिंद फौजेच्या स्थापनेपर्यंतचे काळात सुभाषबाबू विशेष काही करू शकले नाहीत. आझाद हिंद फौज आणि आझाद हिंद सरकार स्थापून दुसऱ्या महा-युद्धात नेताजींनी भारताला स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला. या सेनेतील सैनिकांनी प्रतिकूल परिस्थितीतही गाजविलेल्या शौर्याच्या हकीकती लोकांना समजल्या, तेव्हा नेताजी हिंदी जनतेचे अत्यंत लोकप्रिय नेते झाले. १८ ऑगस्ट, १९४५ ला विमान अपघातात ते निधन पावल्याची बातमी आली, तेव्हा सारा देश हळहळला. युद्धाचे पारडे फिरल्याने नेताजींना यश आले नाही, पण त्यांचा मार्ग चुकीचा होता, असे म्हणता येणार नाही. सुभाषबाबू फॅसिस्ट, जपानचे हस्तक होते, अशी टीका कम्यु-निस्टांनी केली. जपानची मदत घेऊन स्वातंत्र्यलढा लढविण्यात जपानचे वर्चस्वा-खाली जाण्याचा धोका होता हे खरे, पण असे वर्चस्व मान्य न करताही मदत घेता येते, हे सुभाषबाबूंनी दाखवून दिले. दुसरा एखादा नेता जपानच्या वर्चस्वाखाली गेलाही असता, पण सुभाषबाबू गेले नाहीत. यातच त्यांच्या नेतृत्वाची थोरवी आहे.



देशाची सूत्रे नेताजींच्या हाती गेली असती तर ?...

## नेहरूंचा कमकुवतपणा

सरळ डाव्यांची बाजू घेण्याचे बाबतीत नेहरूंनी जो कमकुवतपणा दाखविला, त्यामुळेच सुभाष-नेहरू सहकार्य होऊ शकले नाही. डाव्यांच्या चळवळीचे नेतृत्व या दोघांनी घेतले असते, तर त्या चळवळीला निश्चितच निराळे वळण लागले असते. नेहरूंच्या सहकार्याभावी गांधीजींचा प्रभाव देशाच्या राजकारणावर फार काळ टिकला असता, असे वाटत नाही.

टोकिओहून केलेल्या एका भाषणात आपल्या भावी सरकारच्या कार्यक्रमाची रूपरेषा नेताजींनी मांडली होती. भारत स्वतःच्या पायावर उभा राहीपर्यंत काही हुकूमशाही अधिकार असलेले प्रबळ सरकार स्थापन करावे लागेल, अराजक टाळण्यासाठी व देशात ऐक्य राखण्यासाठी लष्करी शिस्तीचा प्रबळ पक्ष हवा, असे विचार त्यांनी या भाषणात मांडले होते. देशाची सूत्रे नेताजींच्या हाती गेली असती, तर काही काळ देशात हुकूमशाही आली असती, असे यावरून वाटते. संरक्षणाच्या बाबतीतही सरकार गाफील राहिले नसते. लाचलुचपत व काळाबाजाराविरुद्ध कडक उपाय योजले गेले असते. कारण नेताजी हे नुसतेच नेते नव्हते, तर कार्यक्षम प्रशासकही होते. अल्पकाळासाठी स्थापन झालेली हुकूमशाही रशियात कायमची स्थिरावली तसे भारतात घडले असते काय ? नेताजींनी तसे होऊ दिले नसते, कारण ते लोकशाहीचेच पुरस्कर्ते होते.

● ● ●

# विनोबा उवाच

## लेखन–वाचन

चार लेखक एकत्र जमले, की खालील दोनतीन प्रश्नांवर चर्चा चालते. कोण संपले, कोण जिवंत आहेत, यांचा पंचनामा होतो. विनोबांची सोपी उत्तरं ही अशी आहेत.

### ● साहित्य म्हणजे काय ?

मला वाटते, व्याकरणाचे शास्त्र बनू शकते, गणिताचेही उत्तम शास्त्र बनू शकते, परंतु साहित्य आणि शास्त्र ह्या दोन भिन्न वस्तू आहेत. साहित्यिकाला जे सुचते, ते शास्त्र होय. एखाद्याची आई मरण पावली, तर दुःख कसे करावयाचे, याचे शास्त्र होऊ शकत नाही. त्याला जे सुचते, तेच तो करतो.

साहित्यामध्ये प्रधान स्थान कोणाला ? रसाला की तत्त्वाला ? याची चर्चा करावयाची असेल, तर रस म्हणजे काय, तत्त्व म्हणजे काय, याची चर्चा करावी लागेल. हे तीन शब्द असे आहेत, की त्यांची चर्चा करायला लागलो, तर कित्येक महिने निघून जातील; तरीसुद्धा निर्णय होणार नाही. मनुष्याचा आनंद कोणत्या वस्तूत आहे, त्याची व्याख्या होत नाही.

एखाद्या विषयात पुरी एकाग्रता साधली, तर आनंद होतो. गाढ झोप आली, तर त्या गाढ झोपेचा आनंद वाटतो, कारण गाढ झोपेत पुरी एकाग्रता साधते. मुले खेळण्यात एकाग्र होतात. खेळात त्यांची एवढी एकाग्रता होते, की त्यांना भूक लागली असली आणि त्यांची आई सारखी हाका मारीत असली, तरीसुद्धा मुले जात नाहीत. म्हणतात, 'आता येतो. आता येतो.' भूक लागली आहे, परंतु तिचे त्यांना भान नाही, कारण मुले एकाग्र झालेली असतात.

आता प्रश्न आहे की ज्यात आनंद वाटतो, त्यात एकाग्रता होते, की ज्यात एकाग्रता होते, त्यात आनंद वाटतो ? लाडू खाताना मुलाला जग म्हणजे काहीच चीज नाही. त्याला त्यात आनंदानुभूती आहे. तो आनंद त्यांच्या एकाग्रतेत आहे, त्याच्या भुकेत आहे, की गोडी चाखण्यात आहे, हे सांगता येत नाही. रसाचे स्थान कोणते, हे बरोबर सांगणे कठीण. त्याचा निर्णय करता येत नाही.

### ● दुःखातही आनंददायक मस्ती...

मनुष्य दुःखातही एकाग्र होतो का ? दुःख उत्कट असले, तर त्याला स्वतःच्या दुःखाशिवाय दुसरे काही सुचत नाही. साधारण दुःखाला कोण विचारतो ? आता त्यात आनंदानुभूती आहे की नाही, हा सवाल आहे. तीव्र दुःखाच्या उत्कटतेत मस्ती आहे. ताप जोराचा येतो, तेव्हा त्यात मस्ती असते. ताप कमी झाला, की मनुष्य

कमजोर पडतो. ढिला पडतो. परंतु तापात मस्ती आहे, तशी तीव्र दु:खातही मस्ती आहे. मग प्रश्न येतो तो असा, की कोणत्या प्रकारच्या दु:खात आनंद वाटतो ? जर दु:खाचे कारण असे असेल, की ज्यामुळे आत्म्याला प्रतिष्ठा लाभते, तर त्यामुळे काव्य लिहिले जाईल. अशा काव्यात रस आहे, की तत्त्व आहे, हे सांगणे कठीण.

रामनामात रस निर्माण होटो. भक्ताला रामनाम गाण्यात मस्ती येते. सांसारिक मनुष्याला संसारात मस्ती येते. मुलाला खेळण्यात मस्ती येते. देशभक्ताला फासावर लटकण्यात आनंद वाटतो. अशीही माणसे आहेत, की ज्यांना उद्या फासावर चढायचे आहे, तरीदेखील आज रात्री ते आनंदात असतात. असे लोक जगात झाले आहेत. त्यांच्या चित्तात निष्ठा होती; म्हणून त्यांना दु:खातही सुखाची अनुभूती आली.

## ● साहित्याचा स्पर्श कुठे होतो ?

साहित्य बुद्धीला स्पर्श करते की हृदयाला, याचा निर्णय आपण करू शकत नाही. बुद्धीला स्पर्श करील, तर ते तत्त्व होईल. हृदयाला स्पर्श करील, तर तो रस होईल. हृदय आणि बुद्धी दोहोंनाही स्पर्श करील, तर ते दोन्ही होईल.

आनंदाचाही कधीकधी थकवा येतोच. आनंदाचा थकवा येतो, तेव्हा त्यातून दु:खनिर्मिती होते. आजकाल तऱ्हेतऱ्हेचे आनंद लोकांना दिले जातात. हे आनंद अगदी सतावतात. असे आनंद सौम्य नसतात. आनंद सौम्य राहिला पाहिजे आणि सतत राहिला पाहिजे. तीव्र झाला तर त्रास होतो. आनंद असा असावा, की त्याचा थकवा येऊ नये.

## ● लेखन केव्हा थांबवावे ?

मी तुम्हाला असे विचारीन, की तुम्ही साहित्य लिहिता, त्याने तुम्हाला थकवा येतो की नाही ? कितीही लिहिले तरी थकवा नाही आणि लिहीतच जावे असे वाटते, की आता थकलो असे वाटते ? जर थकवा वाटत असेल तर मी सल्ला देईन, की थकवा येईपर्यंत लिहू नका. आनंद वाटत असेल, तेथवरच लिहा.

## ● साहित्यिक कसा असावा ?

साहित्यिक पूर्ण सत्यनिष्ठ आणि अहिंसक असावा. सत्यनिष्ठ म्हणजे स्वत:ला जी अनुभूती आली आहे, ती सोडून आपली गोष्ट तो सांगणार नाही. जगात खरे लोक फार थोडे. चांगले अधिक. जे चांगले आहेत, ते ढोंगी चांगले आहेत आणि जे वाईट आहेत, ते खरे वाईट नाहीतच. उघड वाईट कोण आहेत ? जे वाईट करतात ते. आज वाईट केले जाते, परंतु त्याला झाकले जाते. खरे चांगले कोण ? जे समजून-उमजून अनुभूतिपूर्वक चांगले करतात, ते खरे चांगले. परंतु आज जे चांगले आहेत, ते भयामुळे चांगले आहेत, खरे वाईट नाहीत. भले लोकही खरे भले नाहीत. दुनियेमध्ये जे चांगले आहेत, त्यात फार थोडे खरे चांगले आहेत आणि जे वाईट आहेत, त्यात फार थोडे खरे वाईट आहेत. चांगले लोक अधिक आणि वाईट कमी आहेत

आणि वाइटात खरे वाईट फार कमी आहेत. एकंदर खरे लोक फार कमी आहेत. साहित्यिक खरा असतो. तो दारू पिईल, तरी तो उघडपणे पिईल.

एकदा मी दारूवर व्याख्यान दिले. त्यात दारूपासून काय तोटे होतात, ते सांगितले होते. एकाने विचारले, 'तुम्ही दारूवर व्याख्यान दिलेत, परंतु तुम्ही कधी दारू प्याला आहात काय ? दारू पिऊन तर पाहा, मग द्या व्याख्यान.' त्या दिवसापासून मी दारूवर व्याख्यान देणे सोडून दिले. मला वाटते, खरेपणाशिवाय साहित्य असू शकत नाही. जो आपल्या हृदयातील अनुभूतींशी निष्ठावान राहणार नाही, त्याच्या मुखातून निघणारा शब्द प्राणवान असणार नाही.

समजा, मी ऐकले की आपण भूदान यज्ञासाठी एखादी कादंबरी लिहीत आहात. मी असं म्हणेन, की आपण भूदानासाठी लिहीत असाल, तर त्यात साहित्य समाप्त आहे. आपल्या अनुभूतीने, जीवनाला अनुभूतीने लिहा आणि अशा कुशलतेने लिहा, की बाबालाही पत्ता लागता कामा नये, की ते भूदानासाठी लिहिले आहे.

## ● 'मेड टू ऑर्डर' साहित्याची निर्मिती होऊ शकते का ?

तुम्ही विचारले, की चिनी आक्रमणासारख्या संकटकाळी साहित्य तदनुकूल निर्माण झाले पाहिजे का ? 'साहित्य असे निर्माण व्हावे,' असे साहित्यिकाला सांगता येईल काय ? चीनचे आक्रमण झाले आहे, त्याविरुद्ध असे साहित्य निर्माण व्हावे, की ते वाचून प्रत्येकाला इच्छा व्हावी, की आपण बंदूक घ्यावी आणि देश-रक्षणासाठी बाहेर पडावे. साहित्यिक असे करणार नाही. साहित्य हे 'टु ऑर्डर' निर्माण होऊ शकत नाही.

## ● संगीताचा 'कान' निराळाच असायला हवा का ?

पुष्कळ लोक संगीत गाणारे असतात. ते संगीत गातात आणि आम्हाला त्यात रस वाटला नाही, तर आम्हाला अरसिक समजतात आणि म्हणतात, की आस्वाद घेण्यासाठी कान तयार हवा. सूर्य उगवतो तेव्हा त्याचे सौंदर्यग्रहण करण्यासाठी संस्कारित डोळ्यांची गरज पडत नाही. मग सुंदर संगीतासाठी कानाची गरज का पडावी ? एखाद्याचे कान तयार नाहीत, म्हणून त्याला तुमचे संगीत ऐकण्यात आकर्षण वाटत नसेल, तर तुमच्या कलेत कमतरता आहे. कला अशी असली पाहिजे, की तिने स्वाभाविकतः लोकांचे लक्ष खेचून घेतले पाहिजे. म्हणूनच म्हटले आहे, की 'इन सायन्स द मॉडर्नेस्ट अ‍ॅन्ड इन लिटरेचर द ओल्डेस्ट.' साहित्याची परीक्षा काळ करतो. जर साहित्यात सार नसेल, तर ते कोण वाचील ? उलट हजार वर्षे झाली, तरीसुद्धा पुस्तक चालते. याचा अर्थ असा, की कालपुरुषाच्या कसोटीला ते उतरले.

साहित्यामध्ये शाश्वत आणि अशाश्वत अंशाला कोणते स्थान असावे, असा प्रश्न आहे. कोणी म्हणेल, की शाश्वत अंशाला प्राधान्य देईन आणि अशाश्वताला किंमत देणार नाही; तर त्यात रक्त आणि मांस राहणार नाही. म्हणून अशाश्वतही

साहित्याचे अंग आहे. त्यालाही साहित्यात स्थान हवे. अशाश्वत दोन प्रकारचे असते. एक शाश्वत अशाश्वत आणि दुसरे अशाश्वत अशाश्वत. अशाश्वत अशाश्वताचा नमुना म्हणजे वर्तमानपत्र. हॅम्लेटमध्ये जो अशाश्वताचा अंश आहे, तो शाश्वत अशाश्वताचा. साहित्याची देवता गणेश आहे. ते साहित्याचे रूपक आहे. गणेशाला दोन गण्डस्थळे असतात. त्याप्रमाणे शाश्वत आणि अशाश्वत दोन्ही असल्याशिवाय साहित्य होऊ शकत नाही; पण त्यात जे अशाश्वत असते, ते अशाश्वत अशाश्वत नसावे. अन्यथा वर्तमानपत्रासारखी अवस्था होईल.


### ● साहित्यिक 'संपतो' म्हणजे काय ?

एका सज्जनाने मला सांगितले, की आपण एक नियतकालिक काढले होते. तो त्यात एकटाच लिहीत असे. एकच माणूस लेख लिहितो, हे ठीक नाही. म्हणून अलग अलग नावे घेऊन लिहीत असे; पण दोनतीन महिन्यांनी लोकांनी ओळखले, की हा एकच माणूस लिहितो. साहित्यिकाचे जे स्वतःचे शब्द असतात, त्यावरून तो पकडला जाईल. सर्वोदयवाल्यांना मी नेहमी सांगत असतो, की तुमचे शे-दीडशे शब्द आहेत, तेवढे वगळून लिहीत जा. मग जर तुम्ही लिहू शकाल, तर तुम्ही लेखक आहात. साहित्यिकाला जर कोणी पकडू शकला, की त्याचे अमूक अमूक शब्द आहेत, तर तो साहित्यिक समाप्त झाला.

### ● चित्र खेचणारे सर्वश्रेष्ठ साहित्यिक

साहित्यिकाची दृष्टी संन्यस्त आहे. तो सर्वांचे नाव घेऊ शकतो. परंतु सर्वांपासून अलग असतो. हे व्यासाला साधले. व्यासाहून अधिक कलावान साहित्यिक मी पाहिला नाही. रामायणातही कला आहे, परंतु ती सर्वप्रकारे प्रकट आहे. महाभारतात तसे नाही. काही अंदाजच लागत नाही, की कृष्ण केव्हा काय आदेश देईल ? धर्मराज मोक्यावर खोटे बोलले, हे कोण सांगू शकतो ? पात्रांकडून जागोजाग अशा कृती घडवल्या आहेत, की त्यांचा अंदाज लागत नाही. अत्यंत प्रौढ पात्रे अत्यंत दीन होतात आणि अत्यंत दीन पात्रे अचानक प्रौढ होतात. गुणवान मोक्यावर अवगुणी होतो आणि अवगुणी गुणवान बनतो. भरवसा करण्यासारखा कोण आहे ? प्रतिज्ञा करून तोडणारेही आहेत. भीष्मासारखा ज्ञानी मनुष्य मागचापुढचा विचार न करता प्रतिज्ञा करतो आणि तरीसुद्धा म्हणतो, की "अर्थस्य पुरुषोदासः" दुर्योधनाची नीती त्याला पसंत नाही, पण तो म्हणतो, की मी अर्थाचा दास आहे. दुर्योधनाचे मीठ खाल्ले आहे म्हणून त्याला सोडू शकत नाही; पण माझे अन्तःकरण मात्र पांडवांबरोबर आहे. यापेक्षा अधिक काय असू शकते ? एवढे सांगूनही त्याने ते ढोंग मरेपर्यंत चालविले. मरेपर्यंत ढोंग तर त्यामध्ये सुसंगतपणा असेलच; मग ते ढोंग कसे म्हणता येईल ? इथे एकदम चित्त खेचले जाते. ●

[ 'साधना' साप्ताहिकावरून संकलित ]



# सत्यजित-स्पर्श नसलेला चित्रपट

## का पुरुष–ओ–महापुरुष

सत्यजित रॉयचा नवा चित्रपट 'का पुरुष–ओ–महापुरुष' यात दोन निरनिराळ्या लेखकांच्या दोन कथांचे चित्रीकरण आहे. का पुरुष ही प्रेमेन मित्र यांची कथा असून, त्यात एका भ्याड तरुणाचे चित्रण आहे. उलट राजशेखर बोस या प्रसिद्ध बंगाली लेखकाच्या 'बिरींचीबाबा' या विनोदी दीर्घकथेवर आधारित 'महापुरुष' या कथेत बुवाबाजी करणाऱ्या एका गृहस्थाच्या ढोंगाची कथा आहे.

'का पुरुष' मध्ये अमीत रॉय हा चित्रपटकथालेखक नव्या चित्रपट-कहाणीसाठी माहिती गोळा करण्याच्या उद्देशाने आसामात फिरत असताना त्याची टॅक्सी बंद पडते आणि नाइलाजाने बिमल गुप्ता नावाच्या चहाच्या मळेवाल्याच्या घरी तो जातो. तिथे जाताच त्याला मोठा धक्काच बसतो. बिमल गुप्ताची पत्नी करुणा ही अमीत रॉयची प्रेयसी असते. बिमल गुप्ता मनमोकळ्या स्वभावाचा असतो. रात्री मद्यपान झाल्यावर तो काहीही आडपडदा न ठेवता आपल्या आयुष्याविषयी बोलतो. खाणे, पिणे व झोपणे यातच त्याचा सर्व वेळ जातो. यावरून करुणेचे सांसारिक आयुष्य समाधानी नसल्याचे अमीतला कळून येते. एकेकाळी त्याच्याशी लग्न करायला तयार असलेली करुणा बिमल गुप्तासारख्या माणसाशी जुळवून कशी घेते, याचे त्याला आश्चर्य वाटते. नवऱ्याच्या विश्वात तिला प्रवेश नसतो. बायकोला श्रीमंतीत ठेवली की झाले, अशा विचाराने गुप्ता खूष असतो. अमीत करुणेला तिचे सांसारिक आयुष्य सुखाचे आहे का म्हणून विचारतो, परंतु ती त्याला उत्तर द्यायचे टाळते.

नुसते हसतमुखाने त्याचे आगत-स्वागत करीत राहते. हे हास्य, स्मित, शब्दांपेक्षा अधिक बोलके असते.

## 'खरेच का ती येईल?'

अमीतला झोप येत नाही. त्याला जुने प्रसंग आठवतात. श्रीमंत घरची करुणा. तिच्या बापाची पाटण्याला बदली झालेली असते. ती अमीतला भेटते आणि लग्नासंबंधी विचारते. आपण गरीब आहोत, तिचे श्रीमंती लाड आपण पुरवू शकणार नाही, असे तो तिला सांगतो. लग्नाला नकार देतो. फ्लॅशबॅक पद्धतीने हे चित्रण करण्यात आलेले आहे. अमीत झोप न आल्याने खोलीबाहेर येतो. करुणापण आपल्या खोलीत फेऱ्या मारीत असते. काळोखात धक्का लागून अमीत अडखळतो. आवाज होतो. करुणा बाहेर येते. त्याला झोप यावी म्हणून गोळ्या देते. तिला नवऱ्यापासून दूर घेऊन जाण्याइतपत धैर्य आता त्याच्या अंगी प्राप्त झालेले असते; पण तिच्या शांत चेहऱ्यावर कसलेच भाव प्रकट होत नाहीत. बाह्यत: ती सुखी स्त्रीच दिसते, पण ती फार समाधानी नाही, हे तिच्या वागण्यातून अधूनमधून जाणवतेच.

दुसऱ्या दिवशी तिघे सहलीला जातात. यावेळी करुणेच्या नवऱ्याला झोप लागते. तो उठण्याआधी अमीत घाईघाईने ब्रेडच्या कागदावर, " अजूनही जर तुझे माझ्यावर प्रेम असेल, तर तू स्टेशनवर ये. मी तुझी वाट पाहतो. या वेळी मात्र मी तुला दगा देणार नाही," असा मजकूर लिहितो.

अमीत रात्री स्टेशनवर करुणेची वाट पाहतो. यावेळी 'खरेच का ती येईल?' शेवटी ती येते. तिला पाहून अमीत पुन: घाबरतो. त्याचा भ्याडपणा पुन: डोके काढतो. त्याची मन:स्थिती द्विधा होते. परंतु करुणा त्याच्याबरोबर पळून जायला आलेली नसते. झोपेच्या गोळ्यांची बाटली त्याला देण्यासाठी ती आलेली असते. ती त्याला बाटली देते न् गाडी हळूहळू हलते. येथेच चित्रपट संपतो. करुणा फक्त झोपेच्या गोळ्यांची बाटली देण्याकरताच आली होती का? तसे वाटत नाही. हे नुसते कारण होते. तिचे सांसारिक असमाधान तिला संसाराबाहेर खेचीत असते, याचा तो पुरावा असतो.

## अडखळणारे कथानक

ह्या चित्रपट पाहताना सत्यजित-ठसा विशेषपणाने जाणवत नाही. करुणेचा नवरा विमल गुप्ता ह्या पात्राचे खाणे, पिणे, मौज करणे, करुणेचे सांसारिक असमाधान आणि अमितचा भ्याडपणा या साऱ्या गोष्टी प्रकर्षाने चित्रित करण्यात सत्यजित फारसे यशस्वी झालेले नाहीत, असे मला वाटते. चालू कथानकात मध्येच व्यत्यय करून अमीत आणि करुणा यांचे भेटीचे प्रसंग दाखवल्याने 'जर्क' वाटतो. चित्रपटाच्या कथानकाचा प्रवाह सरळ न जाता तो अडखळल्यासारखा वाटतो. चारुलतेतील माधवी कोठे गेली, असा विचार या चित्रपटातील माधवी मुखर्जीचे काम

पाहताना मनात येतो. तरीपण नेहमीप्रमाणेच माधवीच्या कामापुढे सौमित्र चतर्जी (अमीत) फिकाच वाटतो. हरधन बॅनर्जीसुद्धा करुणेच्या नवऱ्याचे काम करताना 'ॲक्टिंग' करतो आहे, हे स्पष्ट जाणवते.

तांत्रिकदृष्टयाही या चित्रपटाने मार खाल्ला आहे. जीपमधून सहलीला जाता-नाच्या शॉट्स्‌ची सत्यजितने लांबण लावली आहे. हे शॉट्स् बॅक प्रोजेक्शन वापर-ल्याने ते अनैसर्गिक वाटतात. या प्रसंगाचे संकलनही ठीक नाही. पिकनिकला जाता-नाच्या पुऱ्या प्रवासात रस्त्यावरून एकही अन्य गाडी दिसत नाही, पण जीप थांब-वल्यावर बिमल पाणी आणण्यासाठी जातो. करुणा आणि अमीत दोघेही रस्त्याच्या दोन बाजूंना असतात. करुणा एकटी असल्याची संधी साधून, अमीत रस्ता ओलां-डण्याचा विचार करतो, पण अचानक मधून मिलिटरीच्या गाडयांचा तांडा सुरू होतो. ह्या गाडया त्यावेळीं मुद्दाम नियोजित केल्यासारख्या वाटतात.

चित्रपटातील शेवटचा प्रसंग. अमीत स्टेशनवर गाडीची वाट पाहत असतो आणि काळोखातून करुणा अचानक त्याच्याकडे येते. या वेळचा 'परिणाम' स्वप्न-प्रसंगासारखा वाटतो. अशा परिणामाची इथे मुळीच आवश्यकता नव्हती. अनोळखी माणसाला आपल्याबरोबर नेणारा, त्याला जेवू-खाऊ घालणारा बिमल गुप्ता, अमीतला अर्ध्या वाटेवर सोडतो, स्टेशनवर गाडीसाठी वाट पाहायला लावतो, हे काही मनाला पटत नाही. गाडीच्या वेळेपूर्वी काही मिनिटे तो आपल्या जीपमधून अमीत स्टेशनवर सहज पोचवू शकला असता, पण करुणेला शेवटी स्टेशनवर आणण्यासाठी ही हातचलाखी केलेली वाटते. चित्रपटातील वरील प्रसंग ओढूनताणून आणलेले वाटतात. तांत्रिकदृष्टया चित्रपट फार वरचा दर्जा गाठू शकत नाही.

## सरस 'महापुरुष'

'का पुरुष'पेक्षा 'महापुरुष' ही दुसरी कथा अधिक परिणाम साधते.

आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर ॲडव्होकेट गुरुपद मित्तर याचे मन संसारात रमेनासे झाले होते. आपल्या मुलीसह बनारसहून परत येताना, त्याच्या डब्यात अमर अशा बिरींचीबाबांची ओळख होते. गाडीमध्येच हा बाबा सूर्योदयापूर्वीच आपल्या शक्तीने सूर्याला पृथ्वीवर बोलावतो, या त्याच्या चमत्कारामुळे गुरुपद बाबांच्या भजनी लागतो.

गुरुपदची मुलगी बुचकी हिचे सत्या नावाच्या तरुणावर प्रेम असते. हा तरुण प्रसिद्ध कवींच्या प्रेमकाव्यातील काही ओळी लिहून तिला प्रेमपत्र पाठवतो. त्याच्या या मूर्खपणाला कंटाळून बुचकी बाबांची शिष्या बनू लागते. सत्या आपल्या दोस्तांच्या सहाय्याने आता बाबांच्या मागे लागतो. बाबांची समाधी लागली असताना ते आगीचा पुकारा करतात व खाडकन् समाधी उतरून बाबा धावू लागतात. गडबडीत त्यांचा पाय मुरगळतो. याच पायावर सुरवातीच्या डब्यात लोक डोकी ठेवताना पाहतो. बुचकीचे डोळे उघडतात व सत्याला प्रेयसी मिळते.

विरींचीबाबा अनेक चमत्कार करून दाखवतात. त्यांच्या या चमत्कारांवर विश्वास ठेवणारे अनेक शिक्षित लोक त्यांच्या भजनी लागतात. त्यांनी काहीही सांगितले, तरी या लोकांना पटते. मनू, येशू ख्रिस्त, प्लेटो इत्यादींनी त्यांचा सल्ला मानलेला असतो. भगवान बुद्ध लहान असताना बाबांबरोबर असायचा, आइन्स्टाइनला रिलेटिव्हिटीचा सिद्धांत त्यांनीच सांगितलेला असतो. त्यांचा शिष्य त्यांना बाबीलोनच्या बाजारात सापडलेला असतो.

चित्रपटाची सुरवातच फार छान केली आहे. स्टेशनवर या बाबांच्या डब्यासमोर खूप गर्दी झालेली असते. गाडी चालू होते. बाबा सर्वांना आशीर्वाद देतात आणि आपला उजवा पाय पुढे करतात. लोक त्या पायाला स्पर्श करतात. त्यांच्या अंगठ्याचे चुंबन घेतात. बाबांचा मोठेपणा दाखवण्यासाठी सत्यजितनी अनेक शॉट्स् घेतले आहेत. त्यांपैकी अंगठ्याचे चुम्बन घेण्याचा शॉट गाडीतून घेतल्यामुळे प्लॅटफॉर्मवर धावणारी माणसेही दिसतात. हाच पाय अखेर मुरगळतो व बाबांची फटफजिती होते.

या उपहासात्मक चित्रपटात संवाद खूप आहेत. त्या संवादातून चित्रपट



'चारूलते'तील माधवी कोठे गेली ?



[ 'चारूलते'त माधवी मुकर्जी आणि सौमित्र चटर्जी ] →

द्रुतगतीने पुढे जातो. या चित्रपटाचे खास वैशिष्ट्य म्हणजे द्रुतसंकलन आणि अशा विनोदी चित्रपटात त्याचीच आवश्यकता असते. बाबांची व्यक्तिरेखा सत्यजितनी अगदी उत्तमरीतीने उभी केली आहे. परंतु त्यांच्या शिष्याचे (रुबी घोष) काम मात्र व्हावे तसे तडफदार होत नाही. बिरींचीबाबांची भूमिका चारुप्रसाद घोष यांनी केली आहे. प्रेमिकांची भूमिका गिताली रॉय आणि सतीन्द्र भट्टाचार्य ह्या दोघांची आहे. पैकी गिताली रॉयला संवाद नसले, तरी सतीन्द्रपेक्षा तिचा मूक अभिनय वरचढ ठरतो.

तांत्रिकदृष्ट्या हा चित्रपट पहिल्यापेक्षा उत्तम आहे. यात सत्यजित रॉयच्या दिग्दर्शनाची चमक दिसून येते.

का पुरुष आणि महापुरुष या दोन्ही चित्रपटांच्या कथा एकत्र गुंफण्यात भ्याड आणि ढोंगी पुरुषाचे दर्शन घडवण्याचा सत्यजितचा हेतू होता. पहिल्या कथेत भ्याडपणा टाकून अमीत बाहेर येतो, परंतु उशीर झालेला असतो; तर दुसऱ्या कथेतला तरुण वेळीच पुरुषार्थ दाखवून बाबांचे ढोंग उघड्यावर आणून आपली प्रेयसी मिळवतो.

" Man lives in two orbits. In one orbit he is great, in the other he is just a fraud. "

माणूस दोन निरनिराळ्या पातळ्यांवर एकाच वेळी जगू शकतो. एकामध्ये तो फार थोर दिसतो, तर दुसऱ्या पातळीवर तो ढोंगी आढळतो. एका पातळीवरून तो सहजगत्या दुसऱ्या पातळीवर जाऊ शकतो, परंतु हे जाणे-येणे यालाही कालाचे बंधन असते. ते जमले नाही तर कशालाच काही अर्थ उरत नाही.

**पुरुषोत्तम बावकर**


## गुरुशिष्य यांच्या आठवणी व चरित्र

पृष्ठे ६००) (किं. रु. ६, ट. खर्च २ रु.

आठवणीकार श्री. बापट यांनी लोकमान्यांच्या २५०-३०० आठवणी व साहित्यसम्राट केळकर यांचे रसाळ चरित्र आणि त्या दोघा राष्ट्रपुरुषां-संबंधाने अवांतर विशेष वृत्त या ग्रंथात दिले आहे. तसेच बापटांचे चरित्र-चित्र, त्यांचे लेख, भाषणे व त्यांच्याविषयीची थोरामोठ्यांची अनेक पत्रे दिली आहेत. तोटा सोसून हा ग्रंथ अल्प किंमतीस देण्यात येत आहे. प्रती फारच थोड्या काढल्या आहेत. निराशा टाळण्यासाठी त्वरित मागणी करावी.

विक्रेते--अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २ :
मे. दादर बुक डेपो, दादर, मुंबई २८.

१९७० साली

## □ आठ दिवसाला एक अणुबाँब

भारताने अणुबाँब तयार करावयाचे ठरविले तर १९७० साली आठवड्याला एक अणुबाँब तयार करण्याइतकी त्याची प्रगती होऊ शकेल, अशी माहिती ' सायन्स ' या नियतकालिकात त्या पत्राचे वार्ताहर व्हिक्टर मॅकेल्वनी यांनी दिली आहे. भारतीय अणुशक्ती मंडळाचे प्रमुख डॉ. एच्. जे. भाभा यांनी मॅकेल्वनी व चार ब्रिटिश वार्ताहारांना भारतातील अणुशक्तीच्या विकासकार्याची पाहणी करण्यासाठी निमंत्रण दिले होते. या पाहणीनंतर त्यांनी वरील मत व्यक्त केले आहे. अणुबाँबच्या निर्मितीसाठी प्लुटोनियम मोठ्या प्रमाणात लागते. आपल्या अणुशक्ती विकासकार्यक्रमाचाच एक भाग म्हणून १९७० पर्यंत भारत प्लुटोनियम मोठ्या प्रमाणात निर्माण करू शकेल. भारताचा मुख्य भर अणुशक्तीपासून वीज निर्माण करावयाचा आहे.

अणुबाँब तयार करावयाचे म्हणजे त्याबरोबर अणुबाँब नेऊ शकणारे रॉकेटस्ही तयार करावयास हवेत. भारताला अणुबाँबच तयार करायचा नसल्याने रॉकेटसच्या दृष्टीनेही काही प्रगती नाही. पण यावर्षी छोटे रॉकेटस् तयार करण्यास सुरवात होणार असून, १९७० साली तीनशे मैल उंच जाऊ शकेल एवढा रॉकेट भारत तयार करू शकेल, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

### चीनची प्रगती

चीनने अणुबाँबचे दोन स्फोट केले, यापलीकडे चीनमधील अणुशक्तीच्या विकासासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. चीनने आपल्या बाँबसाठी प्लुटोनियमचा उपयोग केलेला नसून युरेनियम २३५ चा उपयोग केला आहे. प्लुटोनियमपासून अणुबाँब निर्माण करणे शक्य असले तरी मोठ्या प्रमाणावर अणुबाँबनिर्मिती करण्याचे दृष्टीने युरेनियम २३५ अधिक उपयुक्त आहे व त्याचा उपयोग अणुबाँबनिर्मितीसाठी चीनने केला असल्याने तो या क्षेत्रात अधिक वेगाने प्रगती करू शकेल, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. " हैड्रोजनबाँब निर्माण करण्याच्या स्पर्धेत चीन आता फारसा मागे नाही. अणुबाँबनंतर हैड्रोजनबाँब निर्माण करण्यास इतर राष्ट्रांना जेवढी वर्षे लागली त्यापेक्षा कमी मुदतीत चीन हैड्रोजनबाँब तयार करू शकेल," असा अंदाज डॉ. डेव्हिड आर. इंग्लिस यांनी ' बुलेटिन ऑफ दि ॲटमिक सायन्टिस्टस् ' या मासिकाच्या फेब्रुवारी १९६५ च्या अंकातील लेखात प्रसिद्ध केला आहे. अणुबाँब

तयार केले तरी अणुशस्त्रे नेणारी रॉकेटस किंवा क्षेपणास्त्रे तयार करण्यास चीनला बरीच वर्षे लागतील, हा काहींचा अंदाजसुद्धा केवळ मनोवांछित ठरण्याचा संभव असून चीन त्या क्षेत्रातही लौकर प्रगती करील, असे मत डॉ. इंग्लिस यांनी व्यक्त केले आहे.

चीनची अशी प्रगती चालू असताना आम्ही मात्र सध्या अणुबाँब तयार करावयाचा नाही, याच निर्णयाला चिकटून आहोत.

## ● रशियात भांडवलशाही 'ट्विस्ट'

मॉस्कोनगरी सध्या एका वेगळ्याच धुंदीत बेहोष झाली आहे. ही धुंदी आहे 'ट्विस्ट' या नृत्याची. पाश्चिमात्यांच्या या नृत्यप्रकाराचे प्रस्थ रशियन युवकांत दिवसेदिवस वाढत असून हे प्रस्थ कमी कसे करता येईल, याचा विचार रशियन नेते करत आहेत.

या नृत्याच्या वेडापासून युवकांना दूर करण्यात जरी अपयश आले असले तरी हा नृत्यप्रकार 'कम्युनाईझ' कसा करता येईल, याचा ते विचार करत आहेत.

'Sovietskaya Kultura' नावाच्या काव्य-शास्त्र-विनोदास वाहिलेल्या मासिकाने नुकताच 'ट्विस्ट'मुळे रशियात निर्माण झालेल्या समस्येची सांगोपांग चर्चा करणारा लेख प्रसिद्ध केला आहे. 'ट्विस्ट'मधील बेताल पदन्यास बदलून ते आपल्या प्रतिष्ठेला साजेसे करावेत, तसेच 'ट्विस्ट'पेक्षाही उच्च दर्जाचा ठरेल असा रशियन नृत्यप्रकार शोधून काढावा म्हणजे आपोआप ही 'ट्विस्ट'ची कटकट बंद होईल, असे या लेखात सुचविण्यात आले आहे.

## ● 'माझी शाळा'

ब्रिस्टलमधील गोष्ट आहे. सेकंडरी सर्टिफिकेट परीक्षा चालू होती. स्पॅनिश भाषेच्या पेपरमध्ये आपल्या शाळेचे वर्णन करावयास सांगितले होते. एका मुलाने आपल्या निबंधात मुख्याध्यापक अगदी बुद्दू आहेत व शिक्षिका अतिशय घाणेरड्या आहेत, असे लिहिले. स्पॅनिश भाषेच्या पेपराच्या परीक्षकाला ही गोष्ट शाळा व शिक्षकांचा अपमान करणारी वाटली व त्याने संबंधित हेडमास्तरांना ही गोष्ट


# सरदार गृह

**क्रॉफर्ड मार्केटजवळ (मुंबई २, टेलिफोन ३८३३७)**

- राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
- हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह आणि अनेक प्रकारच्या सुखसोयी.
- टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

कळवली. मुलाला शाळेतून काढून टाकण्यात आले, परंतु त्याला परीक्षेत चांगले गुण मिळाले व त्याला सेकंडरी एज्युकेशन सर्टिफिकेटही मिळाले.

विद्यार्थ्याचे वडील ब्रिस्टल विद्यापीठात स्पॅनिश भाषेचे प्राध्यापक असून, त्यांनी परीक्षकाच्या कृत्याबद्दल तक्रार नोंदविली आहे. त्यांच्या मते परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे गुप्त ठेवावयाची असतात. विद्यार्थ्याला स्वतंत्र जे काही वाटते, ते न भिता त्याला मांडता आले पाहिजे. तेव्हा विद्यार्थ्याने दिलेल्या उत्तराची माहिती परीक्षकाने हेडमास्तरांना करून दिली, ही गोष्ट परीक्षेविषयक नियमांना धरून नाही; तरी सरकारच्या शिक्षणखात्याने या प्रकरणी तातडीने लक्ष घालून चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या त्यांच्या मागणीशी त्यांचे सहकारी सहमत आहेत, अर्थात परीक्षकाचा याला विरोध आहे.


परीक्षामंडळाच्या चिटणीसाने या पुढे 'माझी शाळा' या विषयावर निबंध विचारला जाणार नाही असे सांगितले, परंतु परीक्षेत विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे परीक्षकाने दुसऱ्यास सांगावीत की नाहीत, याबद्दल त्याने काहीच मत व्यक्त केले नाही.

'शाळेच्या शिस्तीत बाध आणला म्हणून आम्ही विद्यार्थ्यास शाळेतून काढून टाकले,' असे शाळाप्रमुख म्हणत आहेत.

विद्यार्थी म्हणाला, 'मला प्रश्न मुळात समजलाच नाही. कल्पनेने निर्माण केलेल्या शाळेविषयी लिहा असे मला वाटल्यावरून मी तसे लिहिले!'

## ● 'वायपर'ची कटकट संपली


बाहेर पाऊस सारखा बरसतो आहे. वातावरणात मनाला प्रसन्न गारवा आहे आणि अशा धुंद वातावरणात तुम्ही तुमची छोटीशी मोटार घेऊन फिरायला निघाला आहात. पावसाचे कोसळणे चालूच आहे. मोटारीच्या पुढील काचेतून समोरचा मार्ग दिसावा म्हणून तुम्ही 'वायपर' सुरू करता. सपक सपक करीत हा वायपर पाण्याचे तुषार दूर करू लागतो. समोर सृष्टी नखशिखान्त न्हात असते आणि मध्ये हा वायपर सारखा आडवा येत असतो. परंतु आता या 'वायपर'ची कटकट तुम्ही अगदी सुलभपणे दूर करू शकाल. कॅनडातील एका शास्त्रज्ञाने एक चिकट पदार्थ तयार केला आहे. बुटाच्या काळ्या पॉलिशसारखा दिसणारा हा पदार्थ तुम्ही मोटारीच्या पुढील काचेवर फासून ठेवलात, की मग वायपरची जरूर नाही. पावसाने किती थयथयाट केला तरी त्याला मोटारीच्या काचेवर अगदी 'प्रवेश बंद.' पावसाचा थेंब काचेवर पडताच चिकट द्रवपदार्थ काचेवर फासला असल्यामुळे त्या थेंबाचे अक्षरशः हजारो तुकडे होऊन काच जशीच्या तशी स्वच्छ व कोरडी राखली जाते. ● ●


रुपया
1
RUPEE
1962
तुमच्या पैशाला
पंजाब नॅशनल
बँकेत
निवारा, सुरक्षितता आणि
विश्वसनीयता लाभते
PR. 6526/Mar/Ad/2

# साठे

## बिस्किटें

इतकी स्वादिष्ट असतात की कांहीं विचारूच नका !



MANOOS (Fortnightly) : 15 Aug. 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



Parkerson/srp/12

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणे ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर